# तुमचा विश्वास जाहीर करा



मी तुम्हांला खचीत सांगतो की, जो कोणी ह्या डोंगराला ‘तू उपटून समुद्रात टाकला जा,’ असे म्हणेल आणि आपल्या अंत:करणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल. (मार्क 11:23)

आशीष रायचूर

**विनामूल्य वाटपासाठी**
ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

**संपर्क सूचना**

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**


अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

**आर्थिक भागिदारी**
या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे "ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी" हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

**मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती**

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Speak Your Faith)

# तुमचा विश्वास जाहीर करा

मी तुम्हांला खचीत सांगतो की, जो कोणी ह्या डोंगराला 'तू उपटून समुद्रात टाकला जा,' असे म्हणेल आणि आपल्या अंत:करणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल. (मार्क 11:23)

*येशूने त्यांना उत्तर दिले, “देवावर विश्वास ठेवा. मी तुम्हांला खचीत सांगतो की, जो कोणी ह्या डोंगराला ‘तू उपटून समुद्रात टाकला जा,’ असे म्हणेल आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल.”*

***(मार्क 11:22,23)***

# नायसिनचा मतांगीकार

पवित्र शास्त्रावर आधारित ख्रिस्ती विश्वासाच्या महान सिद्धांतांबद्दल संपूर्ण मंडळी काय विश्वास करते याची घोषणा म्हणजे नायसिन मतांगीकर. इ. स. 325 मध्ये पहिल्यांदा ते नायसियाच्या कौन्सिल मध्ये मंडळीतील बिशपांच्या सभेमध्ये स्वीकारले गेले आणि त्यानंतर शतकानुशतके विश्वासाची ठळक कबुली म्हणून वापरण्यात आलेले आहे. "क्रीड" हा शब्द लॅटिन भाषेतील शब्द 'क्रेडो' पासून आलेला आहे, ज्याचा अर्थ "मी विश्वास करतो आणि त्यावर भरवसा ठेवतो" असा होतो.

सर्वसमर्थ एकच देव जो पिता,<br>
आकाश व पृथ्वी, आणि<br>
सर्व दृश्य व अदृश्य वस्तू<br>
ह्यांचा उत्पन्नकर्ता<br>
त्याजवर आम्ही विश्वास ठेवितो.

आणि एकच प्रभू, येशू ख्रिस्त,<br>
जो देवाचा एकुलता एक पुत्र,<br>
जो युगापूर्वी पित्यापासून जनित झाला,<br>
देवापासून देव, प्रकाशापासून प्रकाश,<br>
खऱ्या देवापासून खरा देव,<br>
जो जनित आहे, घडवलेला नाही,<br>
जो पित्याशी एकरूप असून त्याच्याच सत्वाचा आहे;<br>
ज्याकडून अवघे निर्माण झाले.<br>
जो आमच्यासाठी व आमच्या तारणासाठी स्वर्गातून उतरला,

पवित्र आत्म्याच्या योगाने कुमारी मरीया हिजपासून देहधारी होऊन
मनुष्य झाला,
आणि पंतय पिलाताच्या काळी आमच्यासाठी क्रूसखांबी दिले;
तो मरण पावला व त्याला पुरिले.
तो शास्त्राप्रमाणे तिसऱ्या दिवशी पुनः उठला
तो स्वर्गात चढला
आणि पित्याच्या उजवीकडे बसला आहे.
तो जिवंतांचा व मेलेल्यांचा न्याय करायला पुनः गौरवाने येणार आहे,
आणि त्याच्या राज्याचा अंत होणार नाही
त्याजवर आम्ही विश्वास ठेवितो.

आम्ही पवित्र आत्म्यावर विश्वास ठेवितो,
जो प्रभू व जीवनदाता,
जो पिता व पुत्र ह्यापासून निघतो,
आणि पिता व पुत्र ह्यासहित ज्याची आराधना व गौरव होते,
जो संदेष्ट्यांच्याद्वारे बोलला.

एकच पवित्र, कॅथॉलिक, आणि प्रेषितीय मंडळींवर आम्ही
विश्वास ठेवितो.
पापक्षमेसाठी असलेल्या एकाच बाप्तिस्म्यास आम्ही स्विकारतो.
आणि मेलेल्यांचे पुनरुत्थान व येणाऱ्या जीवनाची आम्ही
प्रतीक्षा करीतो.

आमेन.

**टीप:** "कॅथॉलिक" या शब्दाचा अर्थ "संपूर्ण" किंवा "सार्वत्रिक" असा होतो.

# आमची घोषणा

देवाच्या वचनातून संदेश ऐकण्याआधी आम्ही सहसा आमच्या रविवारच्या भक्ति दरम्यान एकत्रितपणे हीच घोषणा करतो:

हे देवाचे वचन आहे.

ह्याद्वारे देव माझ्याशी बोलतो.

देव जे माझ्याबद्दल बोलतो तो मी आहे.

देव जे म्हणतो की मी करू शकतो ते मी करू शकतो.

देवाने जे अभिवचन दिलेले आहे त्याप्रमाणे मी सर्वस्व बनेन.

मी तारला गेलो आहे, बरा झालो आहे, सुटका पावलो आहे,
मुक्त झालो आहे.

मी आशीर्वादित, विजयी, समृद्ध, विजयी आहे.

मी देवाचा सेवक असून ख्रिस्ताचा दास आहे

आणि अनेक लोकांसाठी त्याच्या आशीर्वादाचे माध्यम आहे.

मी त्याचे वचन ग्रहण करतो, मी त्याच्या वचनावर विश्वास ठेवतो
आणि  मी त्याच्या वचनानुसार जगतो.

ख्रिस्त माझा स्वामी आहे आणि मी त्याला पूर्णपणे शरण झालो आहे.

येशूच्या नावाने. आमेन.

# देवाच्या वचनाची माझ्या जीवनावर असलेली माझी घोषणा

तुमच्या जीवनातील विविध क्षेत्रांवर देवाच्या वचनावरील तुमचा विश्वास तुम्ही कसा जाहीर करू शकता यासाठी ही उदाहरणे म्हणून दिली आहेतदिली आहेत. देवाच्या वचनावर मनन करा. देवाच्या वचनामुळे तुमच्या हृदयात विश्वास निर्माण होऊ द्या. मग, तुमचा विश्वास जाहीर करा.

## अधिकार आणि प्रभुत्व

येशूने मला त्याचे नाव वापरण्याचा, त्याच्या वतीने कार्य करण्याचा आणि त्याला जे करायचे आहे ते करण्याचा अधिकार दिला आहे. त्याच्या नावाने, मी भुते काढतो आणि आजाऱ्यांना बरे करतो. येशूने मला शत्रूच्या सर्व सामर्थ्यावर अधिकार दिला आहे,आणि मला काहीही कोणत्याही प्रकारे हानी करणार नाही. मी प्रभुत्व आणि अधिकाराच्या ठिकाणी, येशू ख्रिस्तामध्ये पित्याच्या उजवीकडे बसलो आहे. (मार्क 16:17,18; लूक 10:19; इफिस 2:6)

## प्रार्थनेचे उत्तर

प्रभु येशूने हे अभिवचन दिले आहे की मी पित्याकडे त्याच्या नावाने विश्वासाच्याद्वारे जे काही मागतो, ते मला प्राप्त होईल. प्रार्थनेमध्ये, मी जे काही मागतो, तेव्हा मला ते प्राप्त झाले आहे असा मी विश्वास करतो, आणि ते मी प्राप्त करणार. मी त्याच्यामध्ये राहतो, त्याचे वचन माझ्यामध्ये राहते आणि जे काही मी प्रार्थनेत मागतो ते माझ्यासाठी केले गेले आहे. (योहान 16:23,24; मत्तय 21:22; मार्क 11:24; योहान 15:7)

## अभिषेक आणि सामर्थ्य

मला सामर्थ्य प्राप्त झाले आहे कारण पवित्र आत्मा माझ्यावर आला आहे आणि मी येशू ख्रिस्ताचा साक्षीदार आहे. प्रभूचा आत्मा माझ्यावर आहे आणि तो मला आजार बरे करण्यास, सुटका करण्यासाठी आणि बंदिवानांना मुक्त करण्यासाठी सामर्थ्य देतो. तो देवच आहे ज्याने मला बोलावले आणि मला अभिषेक केला आहे. माझ्या जीवनावरील पवित्र आत्म्याचा अभिषेक सैतानी बंधने नष्ट करतो आणि लोकांच्या जीवनातील सैतानी ओझे काढून टाकतो. (प्रेषितांची कृत्ये 1:8; लूक 4:18,19; 2 करिंथ 1:21; यशया 10:27)

## आशीर्वाद

परमेश्वराकडून येणाऱ्या प्रत्येक आशीर्वादाने मी आशीर्वादित आहे. प्रभुने त्याच्या लोकांसाठी नेमून ठेवलेल्या सर्व आशीर्वादांमध्ये मी सहभागी होतो आणि त्याचा आनंद घेतो. हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यामध्ये मी आशीर्वादित आहे. प्रभु मला समृद्ध होण्यास शिकवतो आणि माझे मार्गदर्शन करतो. परमेश्वराप्रति मी आज्ञाधारकपणे चालतो आणि त्याचे आशीर्वाद एखाद्या झर्‍याप्रमाणे वाहतात जे कधीही कोरडे होत नाहीत. समुद्र किनाऱ्यावर उसळणाऱ्या लाटांप्रमाणे मला विजय प्राप्त होतो. (इफिस 1:3; कलस्सै 1:12; अनुवाद 28:6; यशया 48:17,18)

## धैर्य आणि विश्वास

मी खंबीर आणि खूप धैर्यवान आहे. मी सिंहासारखा निर्भय आहे. देवाने मला भित्रेपणाचा नव्हे, तर धैर्याचा, प्रीतीचा आणि संयमनाचा आत्मा दिला आहे. परमेश्वर माझा विश्वास व आश्रयस्थान आहे. (यहोशवा 1:9; नीतिसूत्रे 28:1; 2 तीमथ्य 1:7; नीतिसूत्रे 14:26)

## थोर कृत्ये

मी माझ्या देवाला जाणतो. मी बलवान आहे व देवाच्या राज्यासाठी मी थोर कृत्ये करतो. देव माझ्यामध्ये आणि माझ्याद्वारे, माझ्यामध्ये कार्य करणाऱ्या त्याच्या सामर्थ्याद्वारे, माझ्या मागण्या आणि कल्पनेपलीकडे असलेल्या गोष्टी पूर्ण करण्यासाठी कार्य करतो. (दानिएल 11:32; इफिस 3:20)

## भविष्य

देवाचे माझ्यासाठी असलेले संकल्प त्याला ठाऊक आहेत, ते संकल्प माझ्या हिताचे आहेत, मला भावी सुस्थितीची आशा देणारे आहेत. मला ज्या गोष्टी करायच्या आहेत त्या गोष्टींची योजना देवाने आखली आहे आणि त्यामध्ये मी चालत आहे. सर्व गोष्टी माझ्या कल्याणासाठी एकत्र कार्यरत आहेत कारण मला त्याच्या संकल्पांप्रमाणे बोलावले गेलेले आहे. कोणत्याही डोळ्याने पाहिले नाही, कानाने ऐकले नाही व कोणी त्याची कल्पना केली नाही ते आपणावर प्रीती करणाऱ्यांसाठी देवाने सिद्ध केले आहे. (यिर्मया 29:11; इफिस 2:10; रोमकरांस पत्र 8:28; 1 करिंथ 2:9)

## कुटुंब, घर, आणि मुले

देवाने माझ्या घरी आशीर्वाद दिला आहे. आनंदाच्या आणि तारणाच्या ध्वनीने माझे घर भरून जाते. माझे घर शांतीने भरलेले असे शांत, सुरक्षित आणि चिंतामुक्त ठिकाण आहे. देव त्याचा आत्मा आणि त्याचा आशीर्वाद माझ्या लेकरांवर ओततो. माझ्या सर्व लेकरांना परमेश्वर चालवतो आणि त्यांच्या जीवनात खूप शांती आहे. (नीतिसूत्रे 3:33; स्तोत्र 118:15; यशया 32:18; यशया 44:3; यशया 54:13)

## विश्वास

देवाने मला विश्वासाचे प्रमाण दिलेले आहे. मी जे दिसते त्यानुसार नव्हे तर विश्वासाने जगतो. माझा विश्वास आहे आणि मी देवाचे गौरव पाहीन. माझ्या हृदयात विश्वास ठेवून मी पर्वतांशी बोलतो आणि ते सरकतात, आणि माझ्यासाठी काहीही अशक्य नाही. (रोमकरांस पत्र 12:3; 2 करिंथ 5:7; योहान 11:40; मत्तय 17:20)

## कृपा आणि संबंध

परमेश्वर माझ्याभोवती कवचाप्रमाणे कृपेचे वेष्टन घालतो. देव मला आदर व उच्च सन्मानाचे पारितोषिक देतो. मी दया आणि सत्याने चालतो, आणि माझ्या सभोवतालच्या लोकांकडून मला अनुग्रह व सुकीर्ती प्राप्त झाली आहे. देव माझ्या शत्रूंनाही माझ्याबरोबर समेट करायला लावतो. जे प्रभूवर प्रेम करतात ते मला पाहून आनंदित होतात कारण मी परमेश्वराचा आदर करतो. (स्तोत्र 5:12; नीतिसूत्रे 22:4; नीतिसूत्रे 3:3,4; नीतिसूत्रे 16:7; स्तोत्र 119:74)

## मार्गदर्शन

पवित्र आत्मा मला चालवतो आणि सर्व सत्यात माझे मार्गदर्शन करतो. परमेश्वर माझे मार्गदर्शन करतो आणि ज्या मार्गाने मी जावे त्याचे शिक्षण मला देतो. तो त्याच्या सावध नजरेने मला मार्गदर्शन करतो. माझी पावले देवाच्या आदेशानुसार आहेत कारण तो माझ्या मार्गात आनंद करतो. जरी मी पडलो तरी तो हात देऊन मला परत सावरतो. देवाचे वचन मला मार्गदर्शन करणाऱ्या दिव्यासारखे आणि माझ्या मार्गावर प्रकाशासारखे आहे. मी त्याच्या वचनाचे अनुसरण करतो. (योहान 16:13; स्तोत्र 32:8; स्तोत्र 37:23,24; स्तोत्र 119:105)

## आरोग्य आणि बरे करणे

प्रभू येशूने स्वतः माझे सर्व विकार व रोग वधस्तंभावर घेतले. वधस्तंभावर येशूला माझ्यासाठी झालेल्या जखमांमुळे मी निरोगी झालो आहे. माझा देव मला आरोग्य देणारा माझा परमेश्वर आहे. परमेश्वर माझ्या अन्न-पाण्याला आशीर्वाद देतो आणि सर्व आजार माझ्यापासून दूर करतो. तो माझ्या सर्व पापांची क्षमा करतो आणि माझे सर्व रोग बरे करतो. (मत्तय 8:17; 1 पेत्र 2:24; निर्गम 15:26; निर्गम 23:25; स्तोत्र 103:3)

## आनंद

परमेश्वराचा आत्मा मला आनंदाने भरतो. मला नीतिमत्त्वाची आवड व दुष्टाईचा वीट आहे; आणि म्हणून देवाने मला आनंद आणि हर्षदायी तेलाचा अभिषेक केला आहे. परमेश्वराचा आनंद मला शक्ती प्रदान करतो आणि मला सामर्थ्याने भरतो. आशेचा देव मला आनंदाने आणि शांतीने भरतो. मी पवित्र आत्म्याद्वारे नीतिमत्त्व, शांती आणि आनंदामध्ये चालतो. (गलती 5:22; स्तोत्र 45:7; नेहेम्या 8:10; रोमकरांस पत्र 15:13; रोमकरांस पत्र 14:17)

## निर्दोष आणि नीतिमान

ख्रिस्तावरील विश्वासाने मी परमेश्वराच्या दृष्टीत नीतिमान ठरलो आहे. त्याच्या नजरेत, मी "जसे-की-मी-कधीही-पाप केले नाही" असा आहे कारण येशू ख्रिस्ताच्या रक्ताने माझे सर्व पाप धुतले गेले आहेत. मी त्याच्याठायी नीतिमत्व परिधान केले आहे, आणि मी विश्वासाने आणि खात्रीने देवासमोर निर्दोष उभा आहे. पवित्र आत्मा मला या खात्रीने भरतो की मी त्याचे लेकरू आहे आणि मी त्याला "अब्बा, बापा" अशी हाक मारतो. (रोमकरांस पत्र 3:22; 1 योहान 1:7; 2 करिंथ 5:21; रोमकरांस पत्र 8:1,15)

## प्रीती

देवाच्या आत्म्याने माझ्या हृदयात परमेश्वराची प्रीती ओतली आहे. देवाच्या प्रितीने सक्षम करून लोकांवर प्रीती करण्यास मला सामर्थ्य प्राप्त झाले आहे. माझ्यातील देवाची प्रीती मला सहनशील, दयाळू बनवते आणि मला मत्सरी, गर्विष्ठ, वाईट वागणूक देणारा, स्वार्थी आणि चिडखोर होण्यापासून वाचवते. माझ्याविरुद्ध झालेल्या अन्यायाची नोंद मी ठेवत नाही. (रोमकरांस पत्र 5:5; 1 करिंथ 13:4,5)

## दीर्घायुष्य

परमेश्वर मला दीर्घायुष्य देऊन तृप्त करतो. परमेश्वर माझे आयुष्य उत्तम पदार्थांनी तृप्त करतो जेणेकरून गरुडाप्रमाणे मी तरुण आणि बलवान राहीन. (स्तोत्र 91:16; निर्गम 23:26; स्तोत्र 103:5)

## मन आणि विचार

माझे मन पवित्र भूमी आहे. माझ्या मनात मी शुद्ध, उदात्त, सात्विक, न्याय्य आणि आदरणीय विचारांनाच परवानगी देतो. माझे मन सुदृढ आहे, चांगली स्मरणशक्ती, सुदृढ एकाग्रता आहे आणि चांगला समज आहे. मी माझे विचार, भावना आणि इच्छा परमेश्वराला समर्पित करतो आणि प्रत्येक विचार ख्रिस्ताच्या आज्ञाधारकतेत आणतो. (फिलिप्पैकरांस पत्र 4:8; 2 तीमथ्य 1:7; 2 करिंथ 10:4,5)

## जग आणि दैहिक वासनांवर जय मिळवणे

मी देवापासून जन्मलो आहे, आणि मी जगावर आणि त्यातील सर्व गोष्टींवर जय मिळवतो. मी देहाच्या पापी वासनांवर, डोळ्यांची वासना आणि फुशारकीवर जय मिळवतो. मी ईश्वरी स्वभावाचा वाटेकरी आहे आणि मी जगातल्या नैतिक भ्रष्टतेपासून दूर राहतो. पवित्र आत्म्याच्या

सामर्थ्याने, मी माझ्या शरीरातील सर्व पापी कृत्यांना ठार मारतो. मी आत्म्याच्या प्रेरणेने चालतो, आणि मी माझ्या देहवासनांना बळी पडत नाही. (1 योहान 5:4; 2 पेत्र 1:3,4; रोम 8:13; गलती 5:16)

## स्वस्थता, शांतता आणि विश्रांती

मी माझ्या सर्व चिंता परमेश्वरासमोर टाकून देतो आणि सर्व बुद्धिसामर्थ्याच्या पलीकडे असणाऱ्या देवाच्या शांतीने माझे अंतःकरण व मन भरून जाते. मी शांततेने आणि विश्वासाने चालणे निवडतो आणि यामुळे मला सामर्थ्य प्राप्त होते. परमेश्वराने मला दिलेल्या विश्रांतीमध्ये मी चालतो. (1 पेत्र 5:7; फिलिप्पै 4:7; यशया 30:15; मत्तय 11:28,29)

## रक्ताचे सामर्थ्य

येशूच्या रक्ताने मला विकत घेऊन सोडवले आहे, मला सर्व पापांपासून शुद्ध केले, मला पवित्र केले, मला नीतिमान ठरवले, मला परमेश्वराजवळ आणले आणि त्याच्या परमपवित्र उपस्थितीत प्रवेश करण्यासाठी धैर्य दिले आहे. मी येशूच्या रक्ताने पांघरलेला व सुरक्षित ठेवलेला आहे. येशूच्या रक्ताद्वारे मी देवासोबत करारबद्ध झालो आहे. त्याच्या रक्ताने मला माझ्या वाडवडिलांच्या नाशवंत मार्गांपासून मुक्त केले आहे. येशूच्या रक्ताने मी शत्रूवर मात करतो. (प्रेषितांची कृत्ये 20:28; इफिस 1:7; 1 योहान 1:7; इब्री 13:12; निर्गम 12:13; 1 पेत्र 1:18-20; प्रकटीकरण 12:11)

## समृद्धी आणि यश

मी पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेल्या एका झाडासारखा आहे. मी आपल्या हंगामात माझे फळ देतो. माझी पाने कोमेजत नाही आणि जे काही मी करतो ते सिद्धीस जाते. माझ्या हातच्या सर्व कामांमध्ये मी आशीर्वादित आहे. मी प्रभूचे, त्याच्या वचनाचे आणि त्याच्या मार्गांचे

अनुसरण करतो, आणि तो मला समृद्ध करून उत्तम यश देतो. मी नम्रपणे आणि देवाचे भय बाळगून चालत असताना तो मला समृद्धी, सन्मान आणि दीर्घायुष्य देऊन तृप्त करतो. (स्तोत्र 1:1-3; अनुवाद 28:8; यहोशवा 1:8; नीतिसूत्रे 22:4)

## संरक्षण आणि सुटका

मी परमेश्वराला माझा रक्षक बनवले आहे, सर्वोच्च परमेश्वर माझा संरक्षक आहे. माझ्यावर कोणतेही अरिष्ट येणार नाही, माझ्या घराजवळ कोणतीही व्याधी येणार नाही. संकटात देव माझ्या पाठीशी आहे. तो मला उत्तर देतो आणि माझी सुटका करतो. देवाचा देवदूत मला घेरून राहतो आणि मला सोडवतो. माझ्याविरुद्ध घडलेले कोणतेही हत्यार मला इजा करू शकणार नाही. देव माझे रक्षण करतो आणि मला विजय देतो. माझ्यावर आरोप ठेवणारी प्रत्येक जिव्हेला परमेश्वर माझ्यापुढे दोषी ठरवेल. (स्तोत्र 91:10,11,15; स्तोत्र 34:7; यशया 54:17)

## उन्नती

माझी उन्नती, वाढ आणि वृद्धी मला परमेश्वराकडून प्राप्त होते. माझ्या उन्नतीसाठी देवच जागा करतो. मी प्रभूच्या अधीन असताना, तो मला त्याच्या वेळेत उंच करतो. मला नेतृत्व, अधिकार आणि प्रभावाच्या ठिकाणी स्थापित करणारा परमेश्वरच आहे. (स्तोत्र 7:6,7; याकोब 4:10; अनुवाद 28:13)

## तरतूद आणि पुरवठा

माझा देव त्याच्या संपत्त्यनुरूप माझ्या सर्व गरजा ख्रिस्त येशूच्या ठायी पुरवतो. परमेश्वर माझा मेंढपाळ आहे आणि मला काही उणे पडणार नाही. परमेश्वर माझ्यासाठी सूर्य आणि ढाल आहे. तो माझ्यापासून

कोणतीही उत्तम गोष्ट रोखत नाही. देव मला माझ्या गरजेपेक्षा अधिक पुरवठाकरतो जेणेकरुन माझ्याकडे नेहमी माझ्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी आणि तसेच इतरांना देण्यासाठी भरपूर आशीर्वाद असतो. देवच मला धनप्राप्ती करून घेण्याचे सामर्थ्य देतो. (फिलिप्पै 4:19; स्तोत्र 23:1; स्तोत्र 84:11; 2 करिंथ 9:8; अनुवाद 8:18)

## चिन्हे, चमत्कार आणि अद्‌ते

त्याच्या नावावर विश्वास ठेवणाऱ्या माझ्याबरोबर ही चिन्हे असत जातील - , मी नवीन भाषा बोलतो, मी भुते काढतो आणि मी आजारी लोकांवर हात ठेवतो आणि ते बरे होतात. देव माझ्याबरोबर आहे आणि त्याचे वचन जे मी बोलतो, त्याची तो चिन्हे, चमत्कार आणि अद्‌तांसह पुष्टी करतो . जी कार्ये येशूने केली, ती मी करीन आणि त्याहूनही मोठी कार्ये करीन कारण येशू पित्याकडे गेला आहे. मी येशूचे शुभवर्तमान सांगत असताना, देव स्वत: चिन्हे, चमत्कार, अद्‌ते आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे साक्ष देतो. (मार्क 16:17,18; मार्क 16:20; योहान 14:12; इब्री 2:3,4)

## झोप

परमेश्वर मला चांगली झोप देतो. मी स्वस्थपणे पडतो आणि मला भीती वाटत नाही. मी निजतो आणि माझी झोप सुखाची असते. मी नवा आणि ताजातवाना होऊन जागा होतो. (स्तोत्र 127:2; स्तोत्र 4:8; नीतिसूत्रे 3:24; स्तोत्र 3:5)

## माझ्या जीवनात परमेश्वराचा आत्मा

मी पवित्र आत्म्याचे मंदिर आहे. परमेश्वराचा आत्मा माझ्यामध्ये वस्ती करतो. तो मला मार्गदर्शन करतो आणि चालवतो. तो मला सर्व गोष्टी शिकवतो. आत्म्याच्या प्रेरणेने चालत असताना, मी शारीरिक वासनांच्या

अधीन होत नाही. तो मला सामर्थ्य देतो. त्याची उपस्थिती आणि त्याचे सामर्थ्य माझ्यामधून नद्यांसारखे वाहत आहे आणि माझ्या सभोवतालच्या लोकांना आशीर्वाद देते, बरे करते आणि सोडवते. (1 करिंथ 3:16; रोमकरास पत्र 8:14; 1 योहान 2:27; गलती 5:16; योहान 7:38,39)

## विजय आणि जयोत्सव

देव मला नेहमी सर्व गोष्टींमध्ये विजय मिळवून देतो. माझ्या प्रभु येशूने माझ्यासाठी वधस्तंभावर मिळवलेल्या विजयात मी चालतो. देवाच्या साहाय्याने मी पराक्रम करतो. (2 करिंथ 2:14; कलस्सै 2:14; यशया 53:12; स्तोत्र 60:12)

## ज्ञान, समज आणि प्रेरणा

ख्रिस्त माझे ज्ञान आहे. सुज्ञानाचा, समंजस-पणाचा, सुसंकल्पाचा व सामर्थ्याचा आत्मा मजवर आहे. परमेश्वर मला सर्व गोष्टींमध्ये समज देतो. त्याचे वचन मला प्रकाश आणि शहाणपणाने भरते. माझ्या अंतरंगातील देवाची प्रेरणा मला समज देते. (1 करिंथ 1:30; यशया 11:1,2; 2 तीमथ्य 2:7; स्तोत्र 119:130; ईयोब 32:8)

## साक्षीदार

मी येशू ख्रिस्ताचा धाडसी साक्षीदार आहे. मला येशू ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाची लाज वाटत नाही. जसा मी त्याला माणसांसमोर कबूल करतो, तसा तो स्वर्गातील पित्यासमोर मला स्वीकारतो. (प्रेषितांची कृत्ये 1:8; रोमकरास पत्र 1:16; मत्तय 10:32)

## माझ्या जीवनात देवाचे वचन

मी घोषित करतो की देवाचे वचन हेच सत्य आहे. त्याचे वचन माझ्या जीवनात प्रचलित आहे. माझे जीवन त्याच्या वचनाच्या

सामर्थ्यानेटिकलेले, स्थिर आणि नियंत्रित आहे. माझ्या जीवनातील प्रत्येक गोष्ट देवाच्या वचनाच्या अधीन आहे आणि स्वतःला देवाच्या वचनाशी संरेखित करते. (योहान 17:17; स्तोत्र 119:128; इब्री 1:3; इब्री 11:3)

# “ख्रिस्तात” माझी घोषणा

मी जो ख्रिस्तामध्ये आहे तोच खरा मी आहे! माझी ओळख, सुरक्षितता, महत्त्व आणि स्वमूल्य त्याच्यामध्ये, त्याच्याकडून आणि त्याच्यासाठी आहे. माझी स्वतःची-प्रतिमा, स्वाभिमान आणि आत्मविश्वास देवाने मला ख्रिस्तामध्ये जे बनवले आहे यावर आधारित आहे. ख्रिस्तामधील माझी ओळख ही पूर्णपणे देवाने माझ्यासाठी त्याच्या प्रचंड आणि बिनशर्त प्रेमामुळे जे केले यावर आधारित आहे.

मी घोषित करतो कीमी जो ख्रिस्तामध्ये आहे तोच खरा मी आहे!

ख्रिस्तामध्ये, मी एक नवी उत्पत्ती आहे. जुने ते होऊन गेले. मी आतमधून एक नवीन व्यक्ती आहे (2 करिंथ 5:17). माझे जुने जीवन संपुष्टात आले आहे, आणि माझे नवे जीवन ख्रिस्तामध्ये सुरक्षित आहे. हे नवीन जीवन जे मी जगतो ते मला स्वतः ख्रिस्ताकडून प्राप्त झाले आहे (कलस्सै 3:3). मी जी नवी उत्पत्ती आहे ती देवसदृश निर्माण झाली आहे आणि ती देवाच्या चारित्र्याने, नीतिमत्वाने आणि पवित्रतेने परिपूर्ण आहे. मी ख्रिस्तामध्ये एक नवी उत्पत्ती म्हणून जगतो (इफिस 4:24).

ख्रिस्तामध्ये, मी देवाचे लेकरू आहे, देवाचा वारस आहे आणि येशू ख्रिस्ताबरोबर संयुक्त सह-वारस आहे. मी देवाच्या कुटुंबाचा आणि देवाच्या राज्याचा भाग आहे (रोमकरास पत्र 8:17). ख्रिस्तामध्ये, पिता माझ्यावर त्याच प्रकारे प्रेम करतो जसे तो त्याच्या पुत्रावर, प्रभु येशू ख्रिस्तावर प्रेम करतो. मला या प्रेमाची खात्री आहे (योहान 16:27; योहान 17:23). ख्रिस्तामध्ये असलेल्या देवाच्या प्रीतीपासून मला कोणीही विभक्त करू शकत नाही. त्याच्या माझ्यावरील प्रेमामुळे मी प्रत्येक परिस्थितीत महाविजयी आहे (रोमकरास पत्र 8:37,39). ख्रिस्तामध्ये, पवित्र आत्म्याचा माझ्यावर शिक्का मारण्यात आला

आहे. माझ्यावर देवाचे मालकीचे चिन्ह आहे (इफिस 1:13,14). ख्रिस्तामध्ये, मी देवाच्या पवित्र मंदिराचा भाग आहे, त्याच्या आत्म्याद्वारे मी परमेश्वराचे निवासस्थान आहे. देव माझ्यामध्ये वसती करतो आणि माझ्याद्वारे स्वतःला प्रकट करतो. (इफिस 2:21,22)

मी नीतिमान ठरलो, निर्दोष ठरलो, देवाच्या दृष्टीने योग्य ठरलो आणि येशू ख्रिस्ताद्वारे मला देवाबरोबर शांती आहे. मी ख्रिस्तामध्ये माझे देवाबरोबरचे नाते सुस्थितीत आहे (रोमकरास पत्र 5:1,2). ख्रिस्तामध्ये माझ्याविरुद्ध कसलीही दंडाज्ञा नाही. मी देवाशी मुक्तपणे, विश्वासाने, आणि कोणतीही लाज, अपराधीपणा किंवा दोष न बाळगता संबंध जोडतो (रोमकरास पत्र 8:1). ख्रिस्तामध्ये, मला देवाचे नीतिमत्व बनवले गेले आहे. हे मला धैर्य आणि विश्वासाने त्याच्या उपस्थितीत प्रवेश देते (2 करिंथ 5:21). देवाने मला ख्रिस्तामध्ये निवडले आहे, आणि मी त्याच्या समक्षतेत पवित्र आणि निर्दोष असा आहे, त्याच्या प्रेमाने झाकलेला आहे (इफिस 1:4). ख्रिस्तामध्ये, मी देवाच्या जवळचा झालो आहे, आणि पवित्र आत्म्याद्वारे माझा पित्याजवळ प्रवेश होतो (इफिस 2:13,18).

जुना पापी स्वभाव ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळला गेला, माझ्या जीवनावरील पापाचे प्रभुत्व मोडले गेले आहे आणि मी पापाच्या गुलामगिरीतून मुक्त झालो आहे. यापुढे पापाचे माझ्यावर प्रभुत्व नाही (रोमकरास पत्र 6:6,14). ख्रिस्तामध्ये, मी अंधाराच्या शक्तींपासून मुक्त केला गेलो आहे आणि येशू ख्रिस्ताच्या राज्याचा भाग झालो आहे. सैतानाला माझ्या जीवनामध्ये स्थान नाही, माझ्यावर हक्क नाही आणि माझ्यावर त्याचा कसलाच अधिकार नाही. मी आता देवाची मालमत्ता आहे – आत्मा, प्राण आणि देह (कलस्सै 1:13,14; 1 करिंथ 6:20). येशू ख्रिस्ताच्या रक्ताने माझी सुटका झाली आहे. मी देवाने मोलाने विकत घेतलेली त्याची मालमत्ता आहे. माझे संपूर्ण अस्तित्व देवाचेच आहे (इफिस 1:7). ख्रिस्तामध्ये, मला पापाच्या सामर्थ्यापासून मुक्त

केले गेले आहे. मी ख्रिस्ताबरोबर मरण पावलो आणि ख्रिस्ताबरोबर उठवला गेलो आहे. जुन्या पापमय स्वभावाची शक्ती मोडली गेली आहे (कलस्सै 2:11,12).

आत्मिकरित्या मी येशूबरोबर एकरूप झालो आहे. तो द्राक्षवेल आहे आणि मी त्याच्याशी जोडलेला फाटा आहे. तो माझ्यामध्ये आहे आणि मी त्याच्यामध्ये आहे. त्याचे जीवन माझ्यातून वाहते आणि माझ्याद्वारे व्यक्त होते. त्याच्या जीवनाचे चारित्र्य आणि सामर्थ्य जे माझ्यात वाहते ते माझ्यातून प्रकट होते. मी त्याच्या गौरवासाठी भरपूर फळ देतो (1 करिंथ 6:17; योहान 15:1-7). मी त्याच्यामध्ये पूर्ण आहे आणि देवाच्या सर्व परिपूर्णतेने भरलेला आहे. तो मला स्वतःशी तृप्त करतो (कलस्सै 2:9,10). मी येशूमध्ये आहे आणि जसा येशू चालला तसाच मी चालतो. मी त्याच्या प्रीतीत, त्याच्या कृपेत आणि त्याच्या सामर्थ्यात चालतो (1 योहान 2:6). मी कबूल करतो की येशू हा देवाचा पुत्र आहे आणि मी देवामध्ये राहतो आणि देव माझ्यामध्ये राहतो. मी माझे जीवन त्याच्याशी एकरूप होऊन जगतो (1 योहान 4:15).

प्रभू येशू स्वतः माझे ज्ञान आहे. त्याच्यामध्ये, मी परमेश्वरापुढे सुस्थितीत आहे. मी पवित्र झालो आहे आणि परमेश्वरासाठी वेगळा केला गेलेला आहे आणि त्याने मला मुक्ती दिलेली आहे (1 करिंथ 1:30). ख्रिस्तामध्ये, मी त्याची हस्तकला आहे, आणि त्याने मला सत्कृत्ये करण्यासाठी निर्माण केले आहे जे मी करावे म्हणून त्याने पूर्वीच योजून ठेवले होते (इफिस 2:10).

मला देवाची विपुल कृपा आणि नीतिमत्त्वाचे दान मिळाले आहे आणि मी जीवनात राज्य करतो. मला येशू ख्रिस्ताद्वारे जीवनावर प्रभुत्व मिळाले आहे (रोमकरांस पत्र 5:17). देव मला नेहमी प्रत्येक परिस्थितीत आणि प्रत्येक प्रसंगी ख्रिस्तामध्ये विजय मिळवून देतो. सध्या परिस्थती कशाही दिसत असल्या तरी येशूमध्ये मी विजयी

होत आहे (2 करिंथ 2:14). मी, जो देवापासून जन्मलो आहे, मी जगावर, अंधकाराच्या कृत्यांवर आणि जगातील वाईट गोष्टींवर विजय मिळवला आणि जयोत्सव केला आहे. ख्रिस्तामध्ये, मी विजयी आहे (1 योहान 5:4). देवाने मला उठवले आहे आणि मला ख्रिस्ताबरोबर स्वर्गीय क्षेत्रात त्याच्या उजवीकडे बसवले आहे. मी अंधकाराच्या सर्व शक्तींवर, सैतानावर आणि सर्व दुरात्म्यांवर अधिकार क्षेत्रात बसलो आहे (इफिस 2:4-6).

मी ख्रिस्तामध्ये स्वर्गातील प्रत्येक आशीर्वादाने आशीर्वादित आहे. देवाचे सर्व आशीर्वाद माझे आहेत. विश्वासाने, मी त्यांना स्वीकारतो आणि त्यांच्यामध्ये चालतो (इफिस 1:3). ख्रिस्तामध्ये, मला अब्राहामाच्या आशीर्वादांचा वारसा मिळाला आहे. मला नीतिमान बनवले गेले आहे. मी देवाचा मित्र आहे. मी सर्व गोष्टींमध्ये धन्य आहे. राष्ट्रांसाठी कल्याणमूलक होण्यासाठी मला आशीर्वादित केले गेले आहे. मी माझ्या शत्रूंवर विजय मिळवला आहे (गलती 3:29). त्याच्यामध्ये देवाची सर्व वचने होय आणि आमेन आहेत. माझ्या जीवनासाठी मला त्याच्या अभिवचनांची पूर्तता प्राप्त होते (2 करिंथ 1:20)

मी जो ख्रिस्तामध्ये आहे तोच खरा मी आहे!

# अनुक्रमणिका

1. दोन्ही क्षेत्रांमध्ये शब्द महत्त्वाचे आहेत 1
2. शब्दांद्वारे प्रभुत्व वापरात आणले जाते 3
3. त्याच्या वचनानुसार स्वतःला माना 5
4. तुमचे शब्द आशीर्वाद मोकळे करतात 7
5. देवाचे वचन तुमचा अगोदरच लिहिलेला अहवाल आहे, ते जाहीर करा! 9
6. वचन तुमच्या जवळ आहे - त्याचे वचन बोला 11
7. त्याचे वचन तुमच्या मुखात असू द्या 13
8. त्याची वचने टिकतात - आणि आमच्या घोषणा सुद्धा 15
9. देवासोबतचा तुमचा करार घोषित करा 17
10. परमेश्वराला मान्य असणारे शब्द बोला 19
11. परमेश्वर तुमच्यासाठी कोण आहे त्याची प्रत्येक परिस्थितीत घोषणा करा 21
12. नैसर्गिक जग परमेश्वराच्या ध्वनीला प्रतिसाद देते 23
13. नैसर्गिक जगाची निर्मिती व रचना त्याच्याद्वारे झाली 25
14. तुमची जीभ तुम्हाला सुखाचे दिवस आणि दीर्घायुष्य प्राप्त करून देऊ शकते 27
15. त्याचे वचन घोषित करणे म्हणजे त्याच्या कराराचे प्रतिपादन करणे 29
16. परमेश्वराविषयी मी असे म्हणेन 31
17. देवदूत त्याचा शब्द ऐकतात 34

18. परमेश्वराने तारलेल्यांनी असे म्हणावे 36
19. हर्षाचा व तारणाचा शब्द कायम असू द्या 38
20. तुमच्या अंतःकरणातून तुमच्या जीवनाला आकार देणारी शक्ती येते 40
21. नीतिमानाचे शब्द जीवन व सामर्थ्य मोकळे करतात 42
22. शब्द निरोगी करून संपूर्ण करतात 44
23. मधुर वचनांचे सामर्थ्य मोकळे करा 46
24. तुमचे जीवन तुमच्याच शब्दांनी भरले जाते 48
25. तुमच्या शब्दांमध्ये जीवन आणि मृत्यूचे सामर्थ्य आहे 50
26. तुमच्या मुखात असणारे त्याचे वचन राष्ट्रांना प्रभावित करू शकते 52
27. शुष्क अस्थींना संदेश दे म्हणजे त्या सजीव होतील 54
28. तुमचे शब्द स्वर्गात ऐकले जातात 56
29. शब्दांचे प्रेषण अध्यात्मिक क्षेत्रातून नैसर्गिक क्षेत्राकडे होते 58
30. “मी सशक्त आहे” असे अशक्तही म्हणो 60
31. तुमच्या शब्दांनी परमेश्वराला खेदित करू नका 63
32. “असा शास्त्रलेख आहे” असे म्हणायला शिका — जसे येशूने केले 65
33. एका शब्दात दुरात्म्यांना बाहेर काढा 67
34. जेव्हा तुम्ही त्याला पृथ्वीवर पत्करता, तेव्हा स्वर्गात तुमचे उच्चारण होते 69
35. शब्द तुमच्या अंतःकरणातील गोष्टी तुमच्या जीवनात आणतात 71

36. तुमच्या शब्दांद्वारे तुम्ही निर्दोष किंवा दोषी ठरता 73
37. बांधण्यासाठी व मोकळे करण्यासाठी 'शब्द' आपल्याला स्वर्गाच्या राज्याचा अधिकार देतात 75
38. डोंगराशी बोल 77
39. तुम्हाला अपेक्षित असलेला परिणाम जाहीर करा 79
40. तुम्ही जे बोलता ते सिद्धीस जाणार ह्याचा विश्वास करा 81
41. प्रार्थनेत विश्वासाचे शब्द बोला 83
42. त्याच्या वचनाशी सहमत असा 85
43. रोगांना निघून जाण्याची आज्ञा करा 87
44. वादळाशी बोला 89
45. लोकांसाठी बंधन मुक्ततेची घोषणा करा 91
46. अभिषिक्त शब्दांमध्ये पवित्र आत्म्याचे जीवन असते 93
47. विश्वासाने आज्ञा करा 95
48. वचन तुम्हाला तुमच्या वतनात आणते 97
49. मला सांगितल्यानुसार घडणार असा माझा विश्वास आहे 99
50. अस्तित्वात नसलेल्या गोष्टींना असल्यासारखी आज्ञा करा 101
51. देवाने दिलेल्या अभिवचनानुसार बोला 103
52. जीवनात राज्य करा - प्रभुत्वाचे शब्द बोला 105
53. विश्वास अशा प्रकारे बोलतो 107
54. कबुलीद्वारे तारणप्राप्ती होते 109
55. त्याची सर्व अभिवचने "होय आणि आमेन" म्हणत घोषित करा 111

56. आम्ही विश्वास धरतो आणि त्यामुळे आम्ही तो बोलतोही 113
57. कृपायुक्त सेवा देण्यासाठी आपल्या शब्दांचा वापर करा 115
58. आत्म्याची तलवार वापरा 116
59. भविष्यवादीत शब्दांचा वापर करीत चांगले युद्ध करा 118
60. ख्रिस्तामध्ये तुमच्यातील प्रत्येक चांगली गोष्ट मान्य करा 120
61. त्याचा शब्द तुमचे विश्व सुस्थितीत ठेवून त्याचे नियंत्रण करू शकतो 122
62. येशूच आपल्या कबुलीचा प्रमुख याजक आहे 124
63. तुम्ही केलेली कबुली दृढ धरून राहा 125
64. त्याच्या शब्दाने विश्वाची रचना झाली 127
65. प्रभुने म्हटले आहे, त्यामुळे आपण देखील धैर्याने म्हणतो 129
66. तुमची जीभ नियंत्रणात ठेवा, तुमच्या संपूर्ण व्यक्तिमत्वावर नियंत्रण करा 131
67. तुमचे शब्द तुमचे जीवन मार्गदर्शित, नियंत्रित, व आशीर्वादित करतात 134
68. सातत्याने विश्वास जाहीर करा 136
69. सैतानाचा प्रतिकार करा 138
70. आशीर्वादाचे शब्द मोकळे करा 140
71. तुमचे शब्द विजयासाठी तुमचा विश्वास मोकळा करतात 142
72. आपण देवाचे आहोत, म्हणून आपण देवाकडून बोलतो 144
73. कोकऱ्याच्या रक्तामुळे आणि आपल्या साक्षीच्या वचनामुळे आपण विजयी होतो 146

# परिचय

जेव्हा मी येशूमधील माझ्या स्वतःच्या वैयक्तिक आध्यात्मिक प्रवासाकडे मागे वळून पाहतो, तेव्हा माझा विश्वास जाहीर करण्याची शिस्त व सराव यामुळे मला खंबीर राहण्यास मदत झाली याची जाणीव होते. मला आठवते की माझ्या किशोरवयीन काळापासून, देवासोबतच्या माझ्या दैनंदिन वेळेचा एक भाग म्हणून, सुमारे 30 मिनिटे किंवा त्याहून अधिक वेळ बाजूला ठेवून मी माझे जीवन, माझे वर्तमान आणि माझे भविष्य यावर देवाच्या वचनाची फक्त घोषणा करीत असे. सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत, माझ्या जीवनातील विविध क्षेत्रांवर देवाचे वचन जाहीर करीत मी ख्रिस्तामध्ये कोण आहे त्याची घोषणा मी करीत असे. यामुळे माझा विश्वास रोज वाढत गेला. या प्रकारे विचार करणे, देव जे बोलतो तेच बोलणे आणि आपला विश्वास जाहीर करणे हा जवळजवळ प्रत्येक परिस्थितीत एक नैसर्गिक प्रतिसाद झाला. असे केल्यामुळे मला प्रत्येक परिस्थितीतून बाहेर येण्यास आणि विजयी होण्यास मदत झाली आहे. मी शेवटपर्यंत असेच जगू इच्छितो - त्याच्या सामर्थ्यवान, अतुलनीय वचनावर माझा विश्वास जाहीर करीत. ज्या गोष्टींनी माझी खूप वाढ झाली आहे जसे की देवावर आणि त्याच्या वचनावर आपला विश्वास नेहमी जाहीर करण्याचा साधा सराव, त्या गोष्टी आपणापर्यंत पोहोचवता याव्या या हेतूने ह्या पुस्तकाची रचना केली गेली आहे. **ह्याला तुमच्याही जीवनाचा भाग बनवा.**

देवाने सर्व सृष्टीची रचना केली. त्याने निर्माण केलेल्या जगाला नियंत्रित करणारे नियम त्याने स्थापित केले. आम्ही नैसर्गिक, भौतिक क्षेत्रातील नियम समजतो. यापैकी अनेक नियम आपण भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि इतर क्षेत्रांमध्ये परिमाणित केले आहेत आणि त्यांचा आपल्या फायद्यासाठी आपण उपयोग करीत असतो, आणि या

नियमांचे उल्लंघन करण्याचे परिणाम विनाशकारी असू शकतात हे जाणून तसे न करण्याची काळजी आपण घेत असतो. अशाच प्रकारे, आध्यात्मिक आणि नैसर्गिक क्षेत्रांशी आपल्या परस्पर संवादांवर नियंत्रण करणारे आध्यात्मिक नियम आहेत. नैसर्गिक क्षेत्र अध्यात्मातून बाहेर आले असल्याने, हे आध्यात्मिक नियम आपल्या नैसर्गिक क्षेत्रावरही परिणाम करतात. यापैकी काही आध्यात्मिक नियम आपल्याला देवाच्या वचनात प्रकट केले आहेत जेणेकरून आपण त्यांना समजू शकू आणि त्यानुसार जगू शकू.

पवित्र शास्त्रात प्रकट केल्या गेलेल्या अनेक आध्यात्मिक नियमांपैकी किंवा आध्यात्मिक सत्यांपैकी, आपण देवाच्या वचनाचे सामर्थ्य, आपण बोललेल्या शब्दांचे सामर्थ्य, आपल्याद्वारे विश्वासाने बोललेल्या देवाच्या वचनाचे सामर्थ्य आणि पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने बोललेल्या शब्दांच्या (भविष्यवादिय संदेश) सामर्थ्याबद्दल शिकतो. देवाच्या वचनात उपजत शक्ती आहे. बायबल हे देवाचे वचन आहे जे आपल्याला लिखित स्वरूपात दिले गेले आहे जेणेकरून आपण ते ग्रहण करू शकू. आपल्या मुखातून बोलले गेलेल्या शब्दांमध्ये सामर्थ्य आहे आणि ते वैयक्तिकरित्या आपल्या जीवनावर परिणाम करतात. देव आणि त्याच्या वचनावरील विश्वासाने बोललेल्या शब्दांमध्ये सामर्थ्य आहे. आपला विश्वास परमेश्वरावर आणि त्याच्या वचनावर आहे. विश्वासाने बोलले गेलेले, आपल्या अंतःकरणात देवाच्या वचनातून जन्मलेले शब्द पर्वत हलवतात, वादळे शांत करतात आणि आपल्या क्षेत्रात अलौकिकतेला प्रकट करतात. पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने येणारे शब्द बोलण्यातही सामर्थ्य आहे. पवित्र आत्मा आपल्याला प्रेरणा देतो आणि त्याच्या उद्देशांना आपल्या क्षेत्रात जाहीर करण्याची सूचना देतो. जेव्हा आपण त्याची आज्ञा पाळतो तेव्हा नैसर्गिक क्षेत्रात प्रभावी गोष्टी घडून येतात. या सर्वांचा संबंध आपल्या शब्दांशी, आपण बोलतो त्या शब्दांशी आहे.

संपूर्ण पवित्र शास्त्रात, देव त्याच्या लोकांना त्याचे वचन बोलण्यास सांगतो. आपल्या अंतःकरणातून, विश्वासाने भरून जेव्हा आपण आपल्या मुखातून त्याचे वचन आपल्या शब्दांद्वारे व्यक्त करतो तेव्हा त्याची सर्जनशील, चमत्कारी-कार्यक्षम शक्ती आपल्या नैसर्गिक क्षेत्रात प्रभावीपणे कार्य करण्यास कारणीभूत ठरते. आपल्या मुखातून शब्दांद्वारे बोललेले त्याचे वचन शत्रूविरूद्ध आपले शस्त्र बनते.

आपल्या वर्तमान आणि भविष्यावर देवाच्या वचनाची घोषणा करण्याद्वारे आपण आपल्या जगाला आकार देऊ शकतो. आपण नेहमी आणि सर्व परिस्थितीत विश्वासाने भरलेले शब्द बोलायला शिकले पाहिजे. विश्वासाने बोलणे म्हणजे डोंगराचे अस्तित्व नाकारणे किंवा प्रचलित वादळाची भीषणता नाकारणे नव्हे. या उलट, विश्वास डोंगराशी बोलतो आणि मार्गात उभे राहण्याचा त्याचा अधिकार नाकारतो. विश्वास वाऱ्यांशी आणि वादळांशी बोलतो, ज्यामुळे त्यांचा नाश करण्याचा त्यांचा हक्क हिरावून घेतला जातो आणि त्याऐवजी, देवाने मोकळ्या केलेल्या शांती आणि स्थिरतेला मार्ग देतो. विश्वास आजाराला धमकावतो आणि त्याला सोडून जाण्याची आज्ञा करतो, आणि अशाप्रकारे बरे होण्याचा आणि पूर्णत्वाचा मार्ग, जो परमेश्वराकडून प्राप्त होतो, तो मोकळा करतो.

बरेच लोक कमी आत्मसन्मान, आत्मविश्वासाचा अभाव, भीती, भय, चिंता, नैराश्य आणि इतर अनेक भावनिक समस्या आणि बंधने यांचा सामना करतात. आपल्या जीवनावर हेतुपुरस्सर आणि प्रत्येक परिस्थितीत देवाचे वचन जाहीर करण्याचा सराव हा भावनिकदृष्ट्या संपूर्ण स्वातंत्र्य आणि संपूर्णतेची गुरुकिल्ली आहे. प्रयोगात आणा. ते निःशुल्क आहे!! त्यासाठी थोड्या विश्वासाची आणि शिस्तीची गरज आहे. आपण पुन्हा कधीही आधीसारखे राहाणार नाही!

आपल्या शब्दांचे महत्त्व, देवाचे वचन बोलण्याचे सामर्थ्य, विश्वासाने

भरलेले शब्द बोलण्याचे सामर्थ्य आणि आत्म्याने प्रेरित शब्द बोलण्याची शक्ती याविषयी आपल्याला अंतर्दृष्टी देणारी अनेक मुख्य शास्त्रवचने टिपण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. (या सूचीमध्ये असे इतर पवित्र शास्त्र परिच्छेद देखील असतील की जे तुम्हाला वाटते की ते जोडल्या जाऊ शकतात. असे असल्यास कृपया तसे करा). ह्यांना संक्षिप्त, आणि समजण्यास सोप्या अशा अध्यायांमध्ये संकलित केले गेले आहे. तुमच्या वैयक्तिक वेळेसाठी, तुमच्या कौटुंबिक प्रार्थनेदरम्यान किंवा तुमच्या लहान गटासाठी हे पुस्तक रोजच्या भक्तीसाठी वापरा. तुमच्या वर्तमानात आणि तुमच्या भविष्यावर विश्वासाने देवाच्या वचनाची घोषणा करण्याच्या सामर्थ्याची आठवण करून देण्यासाठी ते वारंवार वाचा. तुम्ही तुमचा विश्वास जाहीर करता त्याप्रमाणे देवाच्या वचनाच्या सामर्थ्याने तुमच्या जीवनाला आकार प्राप्त होऊ द्या.

परमेश्वर आपणास आशीर्वादीत करो!

आशीष रायचूर

# 1
# दोन्ही क्षेत्रांमध्ये शब्द महत्त्वाचे आहेत

**उत्पत्ती 1:1-5**

**1 प्रारंभी देवाने आकाश व पृथ्वी ही उत्पन्न केली.**

**2 आणि पृथ्वी आकारविरहित व शून्य होती, जलनिधीच्या पृष्ठभागावर अंधकार होता आणि देवाचा आत्मा जलावर तळपत राहिला होता.**

**3 तेव्हा देव बोलला, "प्रकाश होवो," आणि प्रकाश झाला.**

**4 देवाने प्रकाश पाहिला की तो चांगला आहे; आणि देवाने प्रकाश व अंधकार हे एकमेकांपासून वेगळे केले.**

**5 देवाने प्रकाशाला 'दिवस' व अंधकाराला 'रात्र' म्हटले; आणि संध्याकाळ झाली व सकाळ झाली; हा पहिला दिवस.**

परमेश्वर महान रचनाकार, शिल्पकार आणि सर्व वस्तूंचा निर्माता आहे. सृष्टीच्या अफाट पसाऱ्यात आपण अजूनही अनेक गोष्टी शोधत आहोत आणि समजून घेण्याचा प्रयत्न करत आहोत. परमेश्वर अमर्याद आहे, आणि त्याची निर्मिती अनेक प्रकारे त्याची अमर्यादता घोषित करते. अनेक प्रकारे परमेश्वर त्याची सर्जनशीलता प्रकट करू शकला असता. कदाचित त्याला सहज विचार आले असते आणि त्याने त्याच्या विचारांना भौतिक क्षेत्रात आकार घेऊ दिले असते. त्याच्या आराखड्यानुसार नैसर्गिक क्षेत्राला आकार देण्यासाठी, तयार करण्यासाठी आणि वितरित करण्यासाठी कदाचित तो देवदूतांच्या सैन्याला कामास लावू शकला असता. परंतु, सर्व काही अस्तित्वात आणण्यासाठी देवाने 'शब्द' वापरले. पवित्र शास्त्र (बायबल) आपणांस हे प्रकट करते की परमेश्वराने त्याच्या 'शब्दाने' निर्मिती केली. *"देव बोलला ... आणि तसे झाले."*

त्याच्या शब्दांत त्याचा नकाशा आणि त्याची सर्जनशील शक्ती

होती ज्याद्वारे जे काही त्याच्या मनात होते ते अस्तित्वात आले असते. पवित्र शास्त्रात आपल्याला ह्या सत्याची पुनरावृत्ती झालेली दिसते. देव त्याच्या शब्दांद्वारे कार्य करतो. तो बोलतो, आणि तो जे बोलतो ते पूर्ण होते. त्यामुळे नैसर्गिक क्षेत्रातील प्रत्येक गोष्ट त्याच्या वचनाच्या अधीन आहे आणि त्याच्या शब्दांना प्रतिसाद देईल.

देव आत्मा आहे आणि त्याने नैसर्गिक जग अस्तित्वात आणण्यासाठी शब्द वापरले. तर, शब्द या दोन क्षेत्रांना जोडतात. नैसर्गिक क्षेत्र आत्मिक क्षेत्रातून येणाऱ्या शब्दांना प्रतिसाद देते.

मानव या नात्याने, पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते की आपण देवाच्या प्रतिरुपात निर्माण केले गेलो आहोत. आपण आत्मिक प्राणी आहोत ज्यांना जीव (मन, इच्छा, भावना) आहेत. जो शरीररुपी घरात ठेवलेला आहे (1 थेस्सलनी 5:23). आपले शब्द दोन क्षेत्रांना जोडतात, आध्यात्मिक आणि नैसर्गिक क्षेत्रे. आपले शब्द आपल्याला देवाशी जोडतात (किंवा इतर कोणासोबत, उदाहरणार्थ, जादूटोना करणारे त्यांचे शब्द वाईट शक्तींशी जोडण्याकरीता वापरतात). आपले शब्द आपल्या नैसर्गिक जगावर देखील परिणाम करतात. आणि जेव्हा देव आपल्याद्वारे त्याचे शब्द बोलतो, तेव्हा त्याचे सामर्थ्य आपल्याद्वारे प्रकट होऊन आपल्या जगाला प्रभावित करते!

# 2
# शब्दांद्वारे प्रभुत्व वापरात आणले जाते

**उत्पत्ती 1:26-28**

**26 मग देव बोलला, “आपल्या प्रतिरूपाचा व आपल्याशी सदृश असा मनुष्य आपण करू; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी, ग्रामपशू, अवघी पृथ्वी आणि पृथ्वीवर रांगणारे सर्व प्राणी ह्यांवर ते सत्ता चालवतील.”**

**27 देवाने आपल्या प्रतिरूपाचा मनुष्य निर्माण केला; देवाचे प्रतिरूप असा तो निर्माण केला. नर व नारी अशी ती निर्माण केली.**

**28 देवाने त्यांना आशीर्वाद दिला; देव त्यांना म्हणाला, “फलद्रूप व्हा, बहुगुणित व्हा, पृथ्वी व्यापून टाका व ती सत्तेखाली आणा; समुद्रातील मासे, आकाशातील पक्षी व पृथ्वीवर संचार करणारे सर्व प्राणी ह्यांवर सत्ता चालवा.”**

**उत्पत्ती 2:19,20**

**19 परमेश्वर देवाने सर्व वनपशू आणि आकाशातील सर्व पक्षी हे मातीचे घडवल्यावर आदाम त्यांना कोणती नावे देतो हे पाहावे म्हणून त्याच्याकडे ते त्याने नेले; तेव्हा आदामाने प्रत्येक सजीव प्राण्याला जे नाव दिले तेच त्याचे नाव पडले.**

**20 आदामाने सर्व ग्रामपशू, आकाशातील पक्षी व सर्व वनपशू, ह्यांना नावे दिली; पण आदामाला कोणी अनुरूप साहाय्यक मिळेना.**

परमेश्वराने स्त्री आणि पुरुष निर्माण केले आणि त्यांना एक आज्ञा दिली, जी आपल्याला उत्पत्तीच्या पहिल्या दोन अध्यायांमध्ये वाचायला मिळते आणि आपण त्याला ‘उत्पत्तीतील आज्ञा’ म्हणून संबोधतो. उत्पत्तीतील आज्ञेचा एक भाग म्हणजे लोकांनी पृथ्वीवरील सर्व प्राण्यांवर प्रभुत्व करावे. अधिकार असणे म्हणजे राज्य करणे. हे विशेष आहे की देवाने यापैकी प्रत्येक प्राणी आदामाकडे आणला जेणेकरून त्याने त्यांना त्यांचे नाव द्यावे. अशा कृतीचा एक परिणाम असा होता की प्रत्येक जिवंत प्राण्याला समजले की प्रभारी कोण आहे. देवाने आदामाला पृथ्वीची जबाबदारी दिली होती. त्यामुळे पृथ्वीवरील

प्रत्येक प्राणी आदामाच्या अधिपत्याखाली होता, ह्याबद्दल प्रश्नच नाही ! आदामाचा अधिकार किंवा सत्ता स्वतः परमेश्वराकडून प्राप्त झाले होते. आदाम प्रत्येक सजीव प्राण्याला जसजसा नाव देत होता, तो आपल्या शब्दांद्वारे, देवाने दिलेला पृथ्वीवरील त्याचा अधिकार आणि सत्ता व्यक्त करीत त्याचा वापर करीत होता. या प्रक्रियेत परमेश्वर त्याच्या पाठीशी होता.

परमेश्वराने उत्पत्तीतील आज्ञा मागे घेतलेली नाही. अधिकार करता यावा यासाठी देवाने आपल्याला घडविले आणि आज्ञा केली आहे. अधिकार शब्दांद्वारे व्यक्त केला आणि वापरला जातो. तुमच्या शब्दांना, या क्षेत्रातील गोष्टींवर तुम्हाला देवाने देऊ केलेल्या अधिकाराला, व्यक्त करू द्या.

# 3

# त्याच्या वचनानुसार स्वतःला माना

**उत्पत्ति 17:4,5,15,16**

**4 "पाहा, तुझ्याशी माझा करार हा : तू राष्ट्रसमूहाचा जनक होणार.**
**5 ह्यापुढे तुला अब्राम (श्रेष्ठ पिता) म्हणणार नाहीत, तुला अब्राहाम असे**
**म्हणतील. कारण मी तुला राष्ट्रसमूहाचा जनक केले आहे.**
**15 मग देवाने अब्राहामाला सांगितले, "तुझी बायको साराय हिला ह्यापुढे साराय**
**म्हणायचे नाही; तर तिचे नाव सारा (राणी) होईल.**
**16 मी तिला आशीर्वादित करीन, एवढेच नव्हे तर तिच्या पोटी तुला एक मुलगा**
**देईन; मी तिला आशीर्वादित करीन, तिच्यापासून राष्ट्रे उद्भवतील; तिच्यापासून**
**राष्ट्रांचे राजे निपजतील."**

नवीन करारात अब्राहामाला विश्वासाचा पिता म्हणून संबोधण्यात आले आहे. हे लक्षात घेणे विशेष आहे की परमेश्वराला अब्राम आणि साराय यांच्याशी केलेल्या व्यवहारात, त्यांना त्यांची नावे बदलण्याची सूचना देणे आवश्यक वाटले जेणेकरुन त्यांच्या जीवनासाठी देवाने त्यांच्या जीवनासाठी दिलेल्या अभिवचनानुसार त्यांनी स्वतःला हाक मारणे सुरु करावे.

अब्राम म्हणजे "श्रेष्ठ पिता" तर अब्राहाम चा अर्थ "राष्ट्रसमूहाचा जनक" असा होतो.

साराय म्हणजे "राजकीय किंवा वर्चस्व करणारी" तर सारा म्हणजे "राणी किंवा राजपुत्रांची माता."

प्रत्येक वेळी अब्राहामाने स्वतःला त्या नावाने हाक मारली तेव्हा तो त्याच्या जीवनाबद्दल देवाचे अभिवचन घोषित करीत होता. तो म्हणत होता की देव माझ्याविषयी हे बोलला आहे, "मी अनेक राष्ट्रसमूहांचा

जनकआहे”. प्रत्येक वेळी साराने स्वतःला त्या नावाने हाक मारली तेव्हा ती तिच्या जीवनाबद्दल देवाचे अभिवचन घोषित करीत होती. ती सांगत होती की देव माझ्याबद्दल जे बोलला आहे त्याप्रमाणे “मी राष्ट्रांची, राजांची, राजपुत्रांची माता आहे”. त्यांना अजून मूल झालेले नव्हते. परंतु, देव जे बोलला ते सत्य आहे असे ते जाहीर करत होते. जेव्हा देवाच्या वचनानुसार ते स्वतःला हाक मारु लागले तेव्हा सुरुवातीला ते मूर्खपणाचे आणि हास्यास्पद वाटले असावे. पण ते अभिवचन पूर्ण झाले आणि देवाने सांगितल्याप्रमाणे ते बनलेत!

देवाच्या वचनानुसार स्वतःला हाक मारीत असताना ते काही चुकीचे करीत होते का? अजिबात नाही! परमेश्वरानेच त्यांना तसे करण्यास सांगितले. रोमकरांस पत्र 4 मध्ये पौल हे आणखी स्पष्ट करतो, ज्याबद्दल आपण पुढे विचार करणार आहोत. आम्हाला अब्राहामाच्या विश्वासाच्या पावलांवर चालण्यास सांगितले गेले आहे.

आपल्याकडे देवाचे वचन लिखित स्वरूपात आहे ज्यामध्ये देवाने त्याच्या लोकांसाठी आणि येशू ख्रिस्तामध्ये असलेल्या सर्वांसाठी अभिवचने घोषित केली आहेत. ही अभिवचने देवाच्या सर्व लोकांसाठी उपलब्ध आहेत.त्याच्या लोकांसाठी त्याच्याकडे जे वतन आहे त्यात सहभागी होण्यासाठी त्याने आपल्याला पात्र केले आहे (कलस्सै 1:12). देवाच्या अभिवचनांचे सत्य तुमच्या जीवनात घोषित करा. देवाच्या वचनानुसार स्वतःला हाक मारा. देव जे तुम्हांबद्दल बोलतो तेच तुम्ही आहात. तुम्ही जे करू शकता असे देव म्हणतो ते तुम्ही नक्कीच करू शकता. त्याने जे अभिवचन दिले आहे त्या सर्वांनुसार तुम्ही व्हाल.

# 4
# तुमचे शब्द आशीर्वाद मोकळे करतात

**गणना 6:22-27**

**22परमेश्वर मोशेला म्हणाला,**
**23 "अहरोन व त्याचे मुलगे ह्यांना असे सांग की, तुम्ही इस्राएल लोकांना आशीर्वाद देताना ह्याप्रमाणे म्हणा :**
**24 'परमेश्वर तुला आशीर्वाद देवो व तुझे संरक्षण करो;**
**25 परमेश्वर आपला मुखप्रकाश तुझ्यावर पाडो व तुझ्यावर कृपा करो;**
**26 परमेश्वर तुझ्याकडे प्रसन्नमुख करो आणि तुला शांती देवो.'**
**27 ह्या रीतीने त्यांनी इस्राएल लोकांवर माझे नाव मुद्रित करावे म्हणजे मी त्यांना आशीर्वाद देईन."**

शब्द हे आशीर्वाद प्रसारित करण्याचे वाहन आहेत. परमेश्वराने याची स्थापना केली. आपण या ठिकाणी पाहतो की, देवाच्या लोकांना महायाजकाने देवाच्या नावाने मुद्रित करून कसे आशीर्वाद द्यावे याविषयी देवाने स्पष्ट सूचना दिल्या, जेणेकरून देव त्याच्या लोकांना आशीर्वाद देईल. महायाजक "त्यांना म्हणतील", त्यांच्यासाठी बोलतील आणि परमेश्वराच्या नावाने त्यांच्यासाठी आशीर्वादाचे शब्द घोषित करतील.

ह्या प्रकारे जुन्या करारातील देवाचे लोक आशीर्वाद मोकळे करीत असत. इसहाकने याकोबवर आशीर्वादाचे शब्द बोलून त्याला आशीर्वाद दिला (उत्पत्ति 27:27-29). याकोबने आपल्या मुलांवर आशीर्वादाचे शब्द बोलून त्यांना आशीर्वादित केले (उत्पत्ति 48,49).

नवीन करारातील याजक या नात्याने, आम्हाला देखील प्रभूच्या नावाने आशीर्वादाचे शब्द बोलून स्वतःच्या जीवनावर, आपल्या

कुटुंबावर आणि इतरांच्या जीवनावर आशीर्वाद मोकळे करण्याची सुसंधी आहे. तुम्ही स्वतःबद्दल, तुमचे वर्तमान आणि भविष्याबद्दल कोणत्या प्रकारचे शब्द बोलत आहात? तुम्ही तुमच्या कुटुंबाबद्दल आणि त्यांच्या भविष्याबद्दल कोणत्या प्रकारचे शब्द बोलत आहात? तुमचे आशीर्वादाचे शब्द त्यांच्यावर प्रभुचा आशीर्वाद मोकळा करू शकतात.

# 5
# देवाचे वचन तुमचा अगोदरच लिहिलेला अहवाल आहे, ते जाहीर करा!

**गणना 13:30-33**

**30 तेव्हा मोशेसमोर लोकांना शांत करून कालेब म्हणाला, "आपण त्या देशावर आताच्या आता हिम्मत धरून चढाई करून जाऊ आणि तो घेऊ; कारण तो जिंकण्यास आपण पूर्णपणे समर्थ आहोत."**

**31 पण जे पुरुष त्याच्याबरोबर गेले होते ते म्हणाले, "त्या लोकांवर स्वारी करण्यास आपण मुळीच समर्थ नाही, कारण ते आपल्याहून बलाढ्य आहेत."**

**32 त्याचप्रमाणे जो देश हेरून ते आले होते त्याविषयी इस्राएल लोकांना त्यांनी अनिष्ट बातमी दिली; ते म्हणाले, "जो देश हेरण्यासाठी आम्ही गेलो होतो तो तेथील रहिवाशांना ग्रासून टाकणारा आहे; तेथे आम्ही पाहिलेले सर्व लोक मोठे धिप्पाड आहेत.**

**33 तेथे नेफिलीम म्हणजे नेफिली घराण्यातील अनाकाचे वंशज आम्ही पाहिले; त्यांच्यापुढे आम्ही स्वतःच्या दृष्टीने टोळांसारखे दिसलो आणि त्यांनाही तसेच भासलो."**

**गणना 14:11**

**मग परमेश्वर मोशेला म्हणाला, "कोठवर हे लोक मला तुच्छ लेखणार आणि ह्यांच्यामध्ये मी केलेली सगळी चिन्हे पाहूनही हे कोठवर माझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत?**

आम्ही बारा हेरांच्या प्रसंगाशी परिचित आहोत, त्यापैकी दोन यहोशवा आणि कालेब होते. यहोशवा आणि कालेब यांनी इतरांप्रमाणेच मोठे धिप्पाड लोक पाहिले, परंतु त्यांनी त्यांचे अंतिम मूल्यांकन देव कोण आहे आणि देवाने त्यांना काय अभिवचन दिले आहे यावर आधारित केले. कालेब म्हणाला, *"जिंकण्यास आपण पूर्णपणे समर्थ आहोत".* 45 वर्षांनंतर, हाच कालेब म्हणाला, *"हा डोंगराळ प्रदेश मला दे ...*

*मी त्यांना परमेश्वराने सांगितल्याप्रमाणे त्यांना हाकून देईन"* (यहोशवा 14:12). तो देवाचे अभिवचन धरून राहिला आणि 45 वर्षांनंतरही त्याने जे सांगितले ते कधीही बदलले नाही!

देवाचे वचन हे अगोदरच लिहिलेले परिणाम, अहवाल, निकाल आहे. देवाच्या वचनानुसार बोला. होय, अर्थातच, आपल्याला मोठ्या राक्षसांचा सामना करावा लागेल आणि हे मोठे धिप्पाड आपल्याला भीतीदायक वाटतील. युद्ध लढावे लागतील. देवाच्या इच्छेप्रमाणे जे आपणास मिळायला हवे आहे ते मिळवण्याचा मार्ग राक्षसांपासून आणि संघर्षांपासून मुक्त नाही. पण अशा राक्षसांच्या तोंडावर आणि संघर्षांच्या दरम्यान, परमेश्वर कोण आहे आणि त्याने तुम्हाला काय अभिवचन दिले आहे हे घोषित करा. हे घोषित करा की तुम्ही विजय मिळवू शकता कारण जो कोणी देवापासून जन्मला आहे तो जगावर विजय मिळवतो (1 योहान 5:4). ही घोषणा करा की देव तुम्हाला नेहमी विजय मिळवून देतो (2 करिंथ 2:14). घोषित करा की देव तुम्हाला दलदलीच्या चिखलातून बाहेर काढतो, तुमचे पाय खडकावर ठेवतो, आणि तुमच्या मुखात एक नवे गीत घालतो (स्तोत्र 40:1-4). घोषित करा की आकाशाचा व पृथ्वीचा निर्माणकर्ता जो परमेश्वर त्याच्यापासून मला साहाय्य प्राप्त होते. माझ्या रक्षकाला झोप लागत नाही व तो डुलकीही घेत नाही (स्तोत्र 121). तुमचा देव कोण आहे आणि त्याने तुम्हाला काय अभिवचन दिले आहे त्याची घोषणा करा. तुमचा हा निकाल अगोदरच लिहिला गेलेला आहे.

# 6
# वचन तुमच्या जवळ आहे – त्याचे वचन बोला

**अनुवाद 30:11-14**
**11 ही जी आज्ञा मी तुला आज देत आहे ती तुला अवघड नाही व ती तुझ्या आवाक्याबाहेर नाही.**
**12 ती स्वर्गात नाही; 'आम्ही ती पाळावी म्हणून आमच्यासाठी स्वर्गात चढून जाऊन कोण ती आमच्याकडे आणील आणि ती आम्हांला ऐकवील' असे तुला म्हणावे लागणार नाही.**
**13 ती समुद्रापलीकडे नाही; 'आम्ही ती पाळावी म्हणून समुद्रापलीकडे जाऊन आमच्यासाठी ती कोण आणील आणि आम्हांला ती ऐकवील' असे तुला म्हणावे लागणार नाही.**
**14 ते वचन तर तुझ्या अगदी जवळ, म्हणजे तुझ्या मुखात व तुझ्या अंतःकरणात आहे, म्हणून तुला त्याप्रमाणे वागता येईल.**

परमेश्वराची इच्छा होती की त्याच्या लोकांनी त्याचे वचन त्यांच्या मुखात आणि त्यांच्या अंतःकरणात ठेवावे. त्यांच्या मुखी आणि त्यांच्या अंतःकरणात त्याचे वचन असावे अशी त्याची इच्छा होती जेणेकरून ते त्यानुसार वागतील आणि त्यानुसार जगतील. देवाचे वचन आपल्या अंतःकरणात आणि मुखात वसले पाहिजे. त्याच्या वचनांनी आपले हृदय भरले पाहिजे. त्याच्या वचनाद्वारे आपल्या अंतःकरणात विश्वास उत्पन्न होतो. आमच्या अंतःकरणापासून आम्ही त्याच्या वचनावर विश्वास ठेवतो. त्याचे वचन आपल्या मुखी सुद्धा असले पाहिजे. आम्ही ते वदले पाहिजे. आम्ही ते बोलले पाहिजे. त्याच्या मुखातील शब्द आपल्या मुखातील शब्द असले पाहिजे. त्याचे वचन अनाकलनीय किंवा आपल्या आवाक्याबाहेरचे नाही. त्याचे वचन आपल्यामध्ये; म्हणजेच आपल्या अंतःकरणात आणि मुखात आहे. जेव्हा आपण असे

करतो, तेव्हा त्याचे वचन आपली जीवनशैली बनते. आपण त्याच्या वचनानुसार जगू लागतो.

त्याचे वचन आपल्यामध्ये वसावे आणि आपल्या जीवनाद्वारे ते प्रकट होण्याची ही परमेश्वरीय पद्धत आहे. त्यानेच ही पद्धत आपल्याला दिली आहे. त्याने त्याचे वचन आपल्यासाठी उपलब्ध करून दिलेले आहे असे तो आपल्याला सांगत आहे. जेव्हा आपण त्याचे वचन आपल्या मुखात (आपल्या वक्तव्याचा भाग) आणि आपल्या अंतःकरणात (मनन आणि विश्वास करण्याचा भाग) ठेवतो, तेव्हा त्याचे वचन आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनतो.

# 7
# त्याचे वचन तुमच्या मुखात असू द्या

**यहोशवा 1:8**
**नियमशास्त्राचा हा ग्रंथ तुझ्या मुखी सदैव असू दे; त्यात जे काही लिहिले आहे ते तू काळजीपूर्वक पाळ आणि रात्रंदिवस त्याचे मनन कर, म्हणजे तुझा मार्ग सुखाचा होईल व तुला यश:प्राप्ती घडेल.**

यहोशवाकडे देवाच्या लोकांना वचनदत्त देशात नेण्याची मोठी कामगिरी होती. मोशे नंतर पुढारीपण घेऊन त्याला देवाच्या लोकांना पुढे नेले पाहिजे होते. देवाने त्याला दिलेल्या सूचनांपैकी एक म्हणजे ग्रंथातील शब्द नेहमी त्याच्या वक्तव्याचा आणि विचारांचा (मननाचा) भाग असला पाहीजे. थोडक्यात, देवाने यहोशवाला असे निर्देश दिले की, *"नियमशास्त्रातील वचने सदैव तुझ्या मुखी असू दे. त्यातील वचने बोल. वचनाचे मनन करत राहा. अशा प्रकारे तुम्ही वचनात जे सांगितले आहे ते काळजीपूर्वक पाळाल. यामुळे तुम्हाला समृद्धी आणि यश:प्राप्ती घडेल."*

काळ बदलला आहे, परंतु देवाचे वचन आणि त्याच्या वचनाचे सामर्थ्य कमी झालेले नाही. देवाच्या वचनाने यहोशवासाठी त्याच्या समयात, त्याच्या काळात आणि त्याच्या जीवनात नेमून दिलेल्या कार्यासाठी जे केले, तेच कार्य देवाचे वचन आपल्या समयात, काळात आणि आपल्यापैकी प्रत्येकासाठी नेमून दिलेल्या कार्यासाठी करू शकते. जर आपण 'देवाच्या पुस्तकातील' शब्द नेहमी आपल्या मुखात राहू दिले आणि रात्रंदिवस आपले विचार त्यांनी भरले (त्यावर मनन केले), तर आपण त्याच्या वचनानुसार चालू. त्याद्वारे आपण आपला मार्ग समृद्ध करू आणि आपल्याला जे काम सोपवण्यात आले आहे त्यात आपल्याला चांगले यश मिळेल.

यहोशवा 1:8 चे हे तत्त्व तुमच्या जीवनात लागू करा. त्याच्या पुस्तकातील शब्द तुमच्या मुखातील शब्द असू द्या. देव जे बोलतो तेच बोला. त्यावर मनन करा व त्याच्या वचनाच्या समरेषणनुसार विचार करा. त्याच्या वचनाप्रमाणे जगा. तुमच्या कार्यात तुम्हाला समृद्धी आणि चांगले यश प्राप्त होईल.

# 8
# त्याची वचने टिकतात – आणि आमच्या घोषणा सुद्धा

**यहोशवा 14:10-12**

**[10]इस्राएल रानात प्रवास करत असताना परमेश्वराने मोशेला हे सांगितले तेव्हापासून आज पंचेचाळीस वर्षे परमेश्वराने आपल्या म्हणण्याप्रमाणे मला जिवंत ठेवले आहे; आज बघ, मी पंचाऐंशी वर्षांचा आहे.**

**[11]मोशेने मला पाठवले त्या दिवशी मी जितका समर्थ होतो तितकाच आजही आहे; लढण्याची व धावपळ करण्याची ताकद माझ्यात त्या वेळी होती तेवढीच आजही आहे.**

**[12] तेव्हा परमेश्वराने त्या वेळी म्हटल्याप्रमाणे हा डोंगराळ प्रदेश मला दे; तेथे अनाकी व त्यांची मोठमोठी तटबंदी नगरे आहेत हे तू त्या दिवशी ऐकलेच होते. परमेश्वर माझ्याबरोबर असला तर त्याच्या म्हणण्याप्रमाणे मी त्यांना हाकून देईन."**

45 वर्षांनंतर, कालेब, वयाच्या 85 व्या वर्षी, देवाने ज्या गोष्टीबद्दलचे अभिवचन दिले होते ते मिळवण्यासाठी उत्कटतेने आणि आवेशाने भरलेला होता. अजूनदेखील काही बलाढ्य लोकांशी संघर्ष करणे आणि जिंकणे बाकी होते, पण तो सज्ज होता. 45 वर्षांपूर्वी जसा विश्वास त्याने त्याच्या देवावर ठेवला होता तोच विश्वास तो अजूनदेखील जाहीर करत होता.

देवाचे वचन तुमच्या जीवनात सत्य आहे असे किती काळ घोषित करणार आहात? वस्तुतः देव मनुष्य नाही की त्याने लबाडी करावी. त्याचे वचन सत्य आहे. त्याचे वचन टिकते. त्याचे वचन कधीही बदलत नाही. देवाने त्याच्या वचनात तुमच्याबद्दल जे अभिवचन दिले व घोषित केले आहे ते खरे आहे. स्वर्गात ते कायमचे स्थापित झाले आहे. 'मी आहे'

असे म्हणणारा हा आपला देव महान आहे. तो कधीच बदलत नाही. म्हणून, आपणदेखील आपल्या देवाबद्दल जे बोलतो आणि त्याने जे अभिवचन दिले आहे, ते बदलत नाही. आपला देव कोण आहे हे आपण जाहीर करत राहातो. तो अजूनही आपला तारणारा, आरोग्य देणारा, उद्धारकर्ता, सोडवणारा, प्रदाता, मार्ग तयार करणारा, अद्‌ते करणारा देव आहे. तो अजूनही आपला स्वर्गीय पिता आहे. आम्ही घोषित करतो की जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात त्याने आम्हाला जे अभिवचन दिले आहे ते उत्तम आणि खरे आहे. जीवनाच्या सर्व समयांमध्ये, काळामध्ये ते उत्तम चांगले व खरे राहील. म्हणून, जे अभिवचन त्याने दिले आहे ते आपण धरून रहातो.

कालेबाप्रमाणेच, देवाने जे अभिवचन दिले आहे ते प्राप्त करण्यासाठी (ताबा घेण्यासाठी) तुम्हालादेखील थोडा वेळ लागू शकतो. परंतु लक्षात ठेवा, त्याची वचने टिकतात. ती काळानुसार बदलत नाहीत. त्याच्या अभिवचनांची तुमची घोषणा कायम असू द्या.

# 9
# देवासोबतचा तुमचा करार घोषित करा

**1 शमुवेल 17:26,36,45**

**[26]आसपास उभे असणाऱ्या लोकांना दाविदाने विचारले, "ह्या पलिष्ट्याला मारून इस्राएलाची अप्रतिष्ठा दूर करणाऱ्या मनुष्याला काय मिळेल? ह्या असुंती पलिष्ट्याने जिवंत देवाच्या सेना तुच्छ लेखाव्यात काय?"**

**[36]आपल्या दासाने त्या सिंहाला व अस्वलाला मारून टाकले. हा असुंती पलिष्टी त्या दोहोंपैकी एकासारखा ठरेल, कारण त्याने जिवंत देवाच्या सेनेला तुच्छ लेखले आहे."**

**[45] तेव्हा दावीद त्या पलिष्ट्याला म्हणाला, "तू तलवार, भाला व बरची घेऊन माझ्यावर चालून आलास; पण इस्राएली सैन्यांच्या देवाला तू तुच्छ लेखले आहेस; त्या सेनाधीश परमेश्वराच्या नामाने मी तुझ्याकडे आलो आहे.**

दाविदाने गल्याथाशी लढण्याची तयारी केली असता, त्याला एक महत्त्वाचे सत्य माहीत होते. दाविदाची सुंता झाली होती, म्हणजेच तो एक असा मनुष्य होता ज्याचा देवासोबत करार होता. त्याने गल्याथाचा उल्लेख *"हा असुंती पलिष्टी"* असा केला, म्हणजेच देवासोबत करार नसलेला मनुष्य. कारण दाविद देवासोबत करारात होता, त्याला माहीत होते की जिवंत देव त्याच्या बाजूने आहे. सेनाधीश परमेश्वर, स्वर्गातील व पृथ्वीवरील सैन्यांचा देव, दाविदासोबत होता. ह्यामुळेच सगळा फरक घडून आला.

जेव्हा दावीद गल्याथाचा सामना करण्यास सरसावला, तेव्हा देवासोबत केलेल्या कराराच्या आधारावर त्याने ते केले. देव कोण आहे, देवाने काय केले आहे आणि देव त्याच्याद्वारे काय करणार आहे हे दाविदाने धैर्याने जाहीर केले. दावीद धैर्याने बोलू शकला कारण तो असा मनुष्य होता ज्याने देवासोबत करार केला होता.

तुम्ही कोणत्या बलाढ्यांचा सामना करत आहात? परमेश्वरापुढे कोणताच बलाढ्य व्यक्ती मोठा नाही. शौलाच्या सैन्यातील प्रशिक्षित सैनिक त्या बलाढ्य व्यक्तीची तुलना स्वतःशी करत होते. त्यामुळे ते घाबरले. ते युद्धात उतरले नाहीत. पण दाविदाने त्या बलाढ्य व्यक्तीकडे पाहिले आणि त्याला कळले की सेनाधीश परमेश्वरापुढे हा काहीच नाही. तुम्ही कोणत्याही बलाढ्याना तोंड देत असाल - आजारपण, आर्थिक समस्या, कर्ज, तुमच्या कौटुंबिक समस्या, कामाच्या ठिकाणी असणाऱ्या समस्या, कायदेशीर लढाया, काहीही असो - हे लक्षात ठेवा, परमेश्वरापुढे कोणाचाच टिकाव लागत नाही. तुम्ही देवासोबत करार केलेली व्यक्ती आहात. देव तुमच्या पाठीशी आहे. घोषित करा की तुम्ही तुमच्या बलाढ्यांवर विजय मिळवाल. घोषित करा की तुम्हाला धिप्पाड दिसणारे पराभूत झाले आहेत, आणि तुम्ही विजयी आहात. येशू ख्रिस्ताच्या नावाने विजयाची घोषणा करा. देव तुमच्या पाठीशी आहे आणि तो तुमच्यावतीने लढतो.

# 10
# परमेश्वराला मान्य असणारे शब्द बोला

**स्तोत्र 19:14**
**हे परमेश्वरा, माझ्या दुर्गा, माझ्या उद्धारका,**
**माझ्या तोंडचे शब्द व माझ्या मनचे विचार**
**तुला मान्य असे असोत.**

स्तोत्र 19 मध्ये, परमेश्वराची थोरवी आणि त्याच्या वचनाची शुद्धता घोषित केल्यानंतर, दावीद ही प्रार्थना करतो की त्याच्या तोंडचे शब्द परमेश्वराला मान्य असावे. इब्री भाषेत "मान्य" या शब्दाचा अर्थ "सुखकारक, आनंददायक, अनुकूल असणे" असा होतो.

बोलताना आपण शब्दांची निवड करू शकतो. देवाच्या दृष्टीने मान्य, सुखकारक आणि आनंददायक असे शब्द बोलणे आपण निवडू शकतो. जेव्हा आपले शब्द देवाच्या वचनाप्रमाणे असतात, अर्थातच वचन शुद्ध, परिपूर्ण आणि योग्य आहे, तेव्हा आपले शब्द देवाच्या दृष्टीने नक्कीच मान्य, सुखकारक आणि आनंददायक होतील. जेव्हा आपण त्याची महिमा वर्णित करणारे शब्द बोलतो, तेव्हा आपले शब्द त्याच्या दृष्टीने सुखकारक असतात. जेव्हा आपण आपला देव काय करू शकतो त्याबद्दल बोलतो तेव्हा आपले शब्द त्याच्या दृष्टीत आनंददायक असतात. जेव्हा आपण आपल्या देवाचे अद्‌त स्वरूप, त्याची प्रीती, त्याची दया, त्याची करुणा याबद्दल बोलतो तेव्हा आपले शब्द त्याला मान्य होतात.

इब्री 11:6 आपल्याला शिकवते की विश्वास परमेश्वराला संतोषवितो. विश्वासाचे शब्द बोला. देव कोण आहे आणि तो त्याच्या लोकांसाठी काय करतो यावर तुमचा विश्वास जाहीर करणारे शब्द

बोला. असे शब्द बोला जे तुमच्या जीवनात देवावर, त्याच्या वचनावर आणि त्याच्या सामर्थ्यावर तुमचा विश्वास जाहीर करतात. विश्वास देवाला संतोषवितो. विश्वासाचे शब्द देवाला मान्य, सुखकारक आणि आनंददायक असतात.

प्रत्येक परिस्थितीत, देवाच्या दृष्टीने मान्य, सुखकारक आणि आनंददायक असे शब्द बोला. विश्वासाने भरलेल्या मनापासून विश्वासाचे शब्द बोला.

# 11
# परमेश्वर तुमच्यासाठी कोण आहे त्याची प्रत्येक परिस्थितीत घोषणा करा

**स्तोत्र 27:1-3**
**1परमेश्वर माझा प्रकाश व माझे तारण आहे;**
**मी कोणाची भीती बाळगू? परमेश्वर माझ्या जिवाचा दुर्ग आहे मी कोणाचे भय धरू?**
**2दुष्कर्मी म्हणजे माझे शत्रू व द्वेष्टे हे माझे मांस खाऊन टाकण्यास**
**जेव्हा माझ्यावर चढाई करून आले,**
**तेव्हा तेच ठेच लागून पडले.**
**3सैन्याने माझ्यापुढे ठाणे दिले**
**तरी माझे हृदय कचरणार नाही;**
**माझ्यावर युद्धप्रसंग ओढवला**
**तरीही मी हिम्मत धरून राहीन.**

कठीण परिस्थितीत दावीद काय सांगत आहे ते पहा. शत्रू आणि द्वेष्टे आहेत हे तो ओळखतो. तथापि, देव त्याच्यासाठी कोण आहे हे तो घोषित करतो – परमेश्वर, माझा प्रकाश, माझे तारण, माझ्या जिवाचा दुर्ग! आणि त्याच्यासाठी देव जे आहे त्या कारणास्तव, दावीद धाडसी विधाने करू शकतो, *"मी कोणाची भीती बाळगू?", "मी कोणाचे भय धरू?", "माझे हृदय कचरणार नाही", "मी हिम्मत धरून राहीन."* देव त्याच्या सोबत असल्यामुळे तो त्याच्या शत्रूंचा पराभव पुकारतो आणि त्याची घोषणा करतो.

दाविदाचे अनुकरण करणे योग्य ठरेल का? अर्थातच. प्रत्येक परिस्थितीत देव आपल्यासाठी कोण आहे हे लक्षात ठेवून आपण धैर्याने उभे राहिले पाहिजे. आपणही असे घोषित करू शकतो, *"परमेश्वर*

*माझा प्रकाश व माझे तारण आहे; मी कोणाची भीती बाळगू? परमेश्वर माझ्या जिवाचा दुर्ग आहे मी कोणाचे भय धरू?"* संकटकाळात, देव आपला उद्धारकर्ता आहे अशी घोषणा आपण करू शकतो. आजारपणात, देव आपणांस रोगमुक्त करणारा आहे अशी घोषणा आपण करू शकतो. आपण गरजवंत असताना, आपण ही घोषणा करू शकतो की देव आपला पुरवठा करणारा आहे. निराशाजनक परिस्थितीत, आपण ह्याप्रकारे घोषणा करू शकतो की देव आपल्या शोकाचे नृत्यात रूपांतर करतो. आपण असे घोषित करू शकतो की रात्री विलापाने बिर्‍हाड केले तरी प्रातःकाळी हर्षध्वनी होतो.

ज्या समस्यांना आपण तोंड देत आहोत ते आपण नाकारत नाही आहे. शत्रू आणि द्वेष्टे आहेत हे देखील आपण नाकारत नाही. परंतु देव कोण आहे, त्याच्यामध्ये आपले काय आहे, आणि विविध परिस्थितींना तोंड देत असताना देखील त्याच्यावरील आपला विश्वास आपण जाहीर करत आहोत. प्रत्येक परिस्थितीत, देव आपल्यासाठी कोण आहे त्याची घोषणा करा. प्रत्येक परिस्थितीत, त्याच्यामध्ये तुम्हास काय प्राप्त होते ते जाहीर करा. प्रत्येक परिस्थितीत, त्याच्यामुळे तुम्हास प्राप्त होणारे धैर्य, आत्मविश्वास, आनंद, विजय आणि यश ह्यांची घोषणा करा. दाविदाने तसे केले. तुम्ही पण करू शकता!

# 12
# नैसर्गिक जग परमेश्वराच्या ध्वनीला प्रतिसाद देते

**स्तोत्र 29:3-9**
**3 परमेश्वराचा ध्वनी जलांमधून चढत आहे;**
**प्रतापशाली देव गर्जना करीत आहे;**
**परमेश्वर जलाशयांवर आहे.**
**4 परमेश्वराचा ध्वनी प्रबल आहे;**
**परमेश्वराचा ध्वनी प्रतापमय आहे.**
**5 परमेश्वराचा ध्वनी देवदारू मोडतो;**
**परमेश्वर लबानोनाच्या देवदारूंचा चक्काचूर करतो.**
**6 तो त्यांना वासराप्रमाणे उसळायला लावतो;**
**लबानोन व शिर्योन ह्यांना रानबैलाच्या वत्साप्रमाणे उसळायला लावतो.**
**7 परमेश्वराचा ध्वनी अग्निज्वाला भेदतो.**
**8 परमेश्वराचा ध्वनी वने कंपायमान करतो;**
**परमेश्वर कादेशचे वन कंपित करतो.**
**9 परमेश्वराचा ध्वनी हरिणींना गर्भ गाळण्यास लावतो**
**आणि वनवृक्ष पर्णहीन करतो;**
**त्याच्या मंदिरात सर्वत्र “महिमा! महिमा!” असा ध्वनी दुमदुमतो.**

या स्तोत्रात, देवाची महिमा जाहीर करत असताना, दावीद परमेश्वराच्या ध्वनीचा प्रताप आणि सामर्थ्य ह्यांची घोषणा करतो. परमेश्वराच्या वचनाद्वारे त्याचा ध्वनी निघतो. देव बोलतो त्या शब्दांद्वारे त्याचा ध्वनी निघतो. हा शास्त्रभाग आपल्याला पुन्हा एकदा हे स्पष्ट करतो की या नैसर्गिक जगातील प्रत्येक गोष्ट परमेश्वराच्या ध्वनीला म्हणजेच परमेश्वराच्या वचनाला प्रतिसाद देते. जलाशयावर तळपत असणारा देवाचा शब्द (ध्वनी) म्हणजे खुद्द देव जलाशयावर चालत

आहे. परमेश्वराचा शब्द (ध्वनी) ही त्याच्या सामर्थ्याची आणि वैभवाची अभिव्यक्ती आहे. संपूर्ण सृष्टी, सजीव आणि निर्जीव, परमेश्वराच्या शब्दाला (ध्वनीला) प्रतिसाद देते.

पवित्र शास्त्रात अशा काही घटना आहेत, ज्यामध्ये पवित्र आत्मा लोकांवर उतरला, आणि परमेश्वराचा ध्वनी मानवांच्या शब्दातून प्रसिद्ध झाला. परमेश्वराचा शब्द (ध्वनी) त्यांच्याद्वारे आला जेव्हा ते पवित्र आत्म्याने प्रेरित होऊन बोलले. त्यांच्याबद्दल असे म्हटले गेले की परमेश्वराचे वचन (ध्वनी) त्यांच्याबरोबर होते. जेव्हा पवित्र आत्म्याच्या अभिषेकाखाली मानवांच्या मुखाद्वारे (शब्द) परमेश्वराचा ध्वनी (शब्द) बोलण्यात आला, तेव्हा अद्‌त गोष्टी घडल्या. खडकातून पाणी वाहू लागले, समुद्र आणि नद्या दुभंगले, सूर्य स्थिर उभा राहिला, सूर्य दहा अंश मागे वळला, तेल आणि पीठ वाढतच गेले, कुऱ्हाडीचे डोके पाण्यावर तरंगले, आणि अजून बरेच काही घडले.

विश्वासणारे म्हणून, आम्हाला प्रभुचे वचन विश्वासाने बोलण्याचा विशेषाधिकार आहे. देवाने जे आधीच सांगितले आहे ते आपण घेतो, त्या वचनावर विश्वास ठेवतो आणि वर्तमानात ते जाहीर करतो. काही वेळा अश्यादेखील असतात जेव्हा देवाचा आत्मा आपल्यावर येतो, जसे इतिहासात देखील बघायला मिळते, जेणेकरुन जेव्हा तो आपल्याला बोलण्यास प्रेरित करतो तेव्हा तो शब्द आपण बोलतो. आपण तो शब्द बोलत असताना आपल्या वाणीतून (शब्दांतून) परमेश्वराचा ध्वनी (शब्द) जाहीर केला जात असतो. नैसर्गिक जग परमेश्वराच्या ध्वनीला प्रतिसाद देते. दोन्ही करायला शिका. तुमच्या अंतःकरणातील विश्वासाच्याद्वारे देवाचे वचन बोला. पवित्र आत्मा प्रेरणा देतो त्याप्रमाणे प्रभूचा ध्वनी जाहीर करा.

# 13
# नैसर्गिक जगाची निर्मिती व रचना त्याच्याद्वारे झाली

**स्तोत्र 33:6,9**
**6 परमेश्वराच्या शब्दाने आकाश निर्माण झाले; त्याच्या मुखश्वासाने आकाशातील सर्व सैन्य निर्माण झाले.**
**9 कारण तो बोलला आणि अवघे झाले; त्याने आज्ञा केली आणि सर्वकाही स्थिर झाले.**

संपूर्ण पवित्र शास्त्रात आपल्याला सादर केलेल्या सत्यांपैकी एक म्हणजे देवाने त्याच्या शब्दाद्वारे सर्व काही निर्माण केले. तो बोलला. त्याने आज्ञा केली. त्याने त्याच्या मुखातून श्वास फुंकला. त्याने शब्द मोकळा केला. त्याने दृश्यमान नैसर्गिक क्षेत्र अस्तित्वात आणले. हे समजून घेणे आपल्यासाठी महत्त्वाचे आहे.

नैसर्गिक, दृश्यमान आणि भौतिक क्षेत्रातील प्रत्येक गोष्ट देवाच्या वचनाच्या अधीन आहे.

अजूनही देवाचे वचन निर्मिती करीत आहे. देवाचे वचन आपल्या "जगात" (आपले जीवन, आपले दैनंदिन जगण्याचे क्षेत्र) त्या गोष्टी अस्तित्वात आणू शकते ज्या तेथे नाहीत. देवाच्या वचनाचे सामर्थ्य आपल्या जगात कशा प्रकारे मोकळे करावे हे जर आपण शिकलो तर देवाने जे अभिवचन आपल्याला दिले आहे ते आपण प्राप्त करू शकतो.

देवाचे वचन बदलते आणि परिवर्तन घडवून आणते. देवाचे वचन आपल्या जगामधील गोष्टी (आपले जीवन, आपले दैनंदिन जीवनाचे क्षेत्र)

बदलू शकते आणि परिवर्तित करू शकते, आणि देवाने आपल्यासाठी जे अभिवचन दिले आहे त्याच्याशी ते एकाग्र करू शकते. परंतु आपण देवाच्या वचनाचे सामर्थ्य आपल्या जगात मोकळे करण्यास शिकले पाहिजे.

संपूर्ण पवित्र शास्त्रामध्ये देवाने ठेवलेल्या किल्लींपैकी एक ज्याद्वारे त्याच्या वचनाचे सामर्थ्य आपल्या जगात मोकळे केले जाते ती म्हणजे आपण विश्वासाने त्याचे वचन जाहीर करणे होय. जेव्हा आपण त्याच्या वचनावर विश्वास ठेवतो आणि त्याचे वचन आपल्या जगामध्ये बोलतो - आपल्या स्थितीत, आपल्या परिस्थितीत, आपल्या मनावर, शरीरावर, पैशावर, कुटुंबावर, कामाच्या ठिकाणी इत्यादींवर, - त्याच्या वचनाचे सामर्थ्य आपल्या जगात मोकळे केले जाते. आपल्या जगातील प्रत्येक गोष्ट त्याच्या वचनाच्या अधीन आहे आणि त्याच्या वचनाच्या अनुरुप आणली जाईल. त्याच्या वचनाद्वारे तुमच्या जगाला निर्मित आणि आकारलेले होऊ द्या.

# 14
# तुमची जीभ तुम्हाला सुखाचे दिवस आणि दीर्घायुष्य प्राप्त करून देऊ शकते

**स्तोत्र 34:12-14**

**12 सुख भोगावे म्हणून जीविताची इच्छा धरणारा; व दीर्घायुष्याची इच्छा धरणारा असा मनुष्य कोण?**
**13 तू आपली जीभ दुर्भाषणापासून व आपले ओठ कपटी भाषणापासून आवर,**
**14 वाइटाचा त्याग कर व बरे ते कर, शांतीच्या प्राप्तीसाठी प्रयत्न कर व तिचे अवलंबन कर.**

येथे पवित्र शास्त्र आपल्याला शिकवते की आपले शब्द आपल्या जीवनाच्या अवधीवर आणि त्याच्या गुणवत्तेवर परिणाम करतात. सुखमय आणि दीर्घ आयुष्याचा आनंद घेण्यासाठी, या शास्त्रभागामध्ये दाविदाने दर्शविलेली पहिली गोष्ट म्हणजे दुर्भाषण, कपटी, अपवित्र आणि क्रूर गोष्टी बोलण्यापासून स्वतःला दूर ठेवणे. खोटे आणि फसवे बोलणे टाळा. जिभेवर लगाम घाला. योग्य तेच शब्द बोला. सत्य शब्द बोला. जीवनाचे शब्द बोला. हीच पहिली गोष्ट आहे. आणि वाईट गोष्टींपासून दूर राहा. त्याऐवजी, बरे ते करा आणि शांतीच्या प्राप्तीसाठी प्रयत्न करा.

आपले शब्द आपल्या जगाला प्रभावित करतात. ते सुख, जीवन आणि आशीर्वाद देऊ शकतात किंवा ते वाईट, मृत्यू आणि शाप आणू शकतात. आपले शब्द खूप क्षुल्लक वाटतात आणि तरीही, अनेक प्रकारे, ते आपल्या जीवनातील अनुभवांचे मुख्य घटक आहेत. आपण पेरलेल्या बिजांसारखे ते आहेत जे एक दिवस आपल्या जीवनात त्यांसारखेच उत्पन्न देईल. देवाने आपल्या शब्दांची रचना आपल्या

जीवनात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी केली आहे. तुमचे शब्द हलक्यात घेऊ नका. त्यांचा काळजीपूर्वक वापर करा. तुमचे शब्द काळजीपूर्वक निवडा कारण तुमचे जीवन त्या शब्दांद्वारे आकारले जाईल.

जर आपण देवाचे वचन बोललो तर आपले शब्द किती अधिक सामर्थ्याने भरलेले असतील! आपण जे बोलतो आणि आपल्या जीवनावर जे घोषित करतो ते देवाचेच वचन असले तर आपले जीवन किती धन्य होईल! खुद्द देवाच्या वचनातून जन्माला आलेले शब्द आपल्या जीवनाचा आधार बनू द्या. खुद्द देवाच्या वचनातून जन्माला आलेले शब्द हे आपल्या जीवनात पेरलेले बीज बनू द्या, ज्याचे फळ पुढील काळात आपल्यासाठी उदयास येतील. तुमची जीभ तुम्हाला सुखाचे दिवस आणि दीर्घायुष्य प्राप्त करून देवो. त्याचे वचन बोला.

# 15
# त्याचे वचन घोषित करणे म्हणजे त्याच्या कराराचे प्रतिपादन करणे

**स्तोत्र 50:14-17**
**14 देवाला आभाररूपी यज्ञ कर;**
**परात्परापुढे आपले नवस फेड;**
**15 आणि संकटसमयी माझा धावा कर;**
**मी तुला मुक्त करीन आणि तू माझा गौरव करशील."**
**16 दुर्जनाला तर देव म्हणतो :**
**"माझे नियम विदित करणारा तू कोण?**
**माझा करार आपल्या मुखाने उच्चारणारा तू कोण?**
**17 तू तर शिस्तीचा द्वेष करतोस,**
**माझी वचने मागे झुगारून देतोस.**

आपल्या मुखाने देवाचे वचन बोलणे म्हणजे त्याचा करार आपल्या मुखात बाळगणे आहे, म्हणजेच त्याच्या कराराला किंवा अभिवचनांना प्राप्त करणे किंवा प्रतिपादित करणे. देव दुर्जनांना फटकारतो कारण ते त्याच्या वचनाचा तिरस्कार करतात. ते देवाच्या वचनाला मान देत नाहीत. त्यांनी त्याचे वचन निरर्थक म्हणून झुगारून टाकले आहे. म्हणून, देवाच्या वचनाची अवहेलना करणाऱ्या या लोकांना त्याचे वचन त्यांच्या मुखाने बोलण्याचा आणि त्याच्या कराराच्या आशीर्वादांचे प्रतिपादन करण्याचा काहीच अधिकार नाही.

तथापि, आपल्यापैकी जे त्याच्या वचनावर विश्वास ठेवतात आणि त्याचा आदर करतात त्यांच्यासाठी, जेव्हा आपण त्याचे वचन घोषित करतो, तेव्हा देव आपल्याला त्याच्याशी असलेल्या कराराचे प्रतिपादन

करत असल्यासारखे पाहतो. जेव्हा आपण त्याच्या वचनाची घोषणा करण्याद्वारे त्याचा करार आपल्या मुखात बाळगतो, तेव्हा आपण देवाचा आपल्यासोबत असलेल्या कराराच्या आशिर्वादांचे प्रतिपादन करत असतो.

देव हा यहोवा आहे, जो शाश्वत, स्वयं-अस्तित्वाचा, अपरिवर्तनीय देव आहे जो करार पाळतो आणि वचने पूर्ण करतो. तो कधीही त्याचा करार मोडत नाही किंवा त्याने बोललेले शब्द बदलत नाहीत. आपण सर्वसमर्थ देवासोबत त्याचा पुत्र येशू ख्रिस्त याच्याद्वारे रक्ताच्या करारात आहोत. आपल्याशी केलेल्या त्याच्या रक्ताच्या कराराद्वारे, त्याने स्वतःला, जे सर्व काही तो आहे, ते सर्व आपल्यासाठी त्याने उपलब्ध करून दिले आहे. त्याच्या कराराच्या नावांद्वारे आपल्याला यातील काही गोष्टी समजतात. कराराद्वारे प्राप्त होणारे तुमचे आशीर्वाद जाणून घ्या. कोणत्याही परिस्थितीत, त्याच्या वचनांची घोषणा करा. तुमच्या कराराच्या आशीर्वादांचे प्रतिपादन करा आणि त्यामध्ये चालत रहा.

# 16
# परमेश्वराविषयी मी असे म्हणेन

**स्तोत्र 91:1,2**
**[1] जो परात्पराच्या गुप्त स्थली वसतो, तो सर्वसमर्थाच्या सावलीत राहील.**
**[2] परमेश्वराला मी "माझा आश्रय, माझा दुर्ग" असे म्हणतो; "तोच माझा देव, त्याच्यावर मी भाव ठेवतो."**

परमेश्वराविषयी तुम्ही काय म्हणाल? स्तोत्रकर्त्याने परमेश्वराबद्दल सांगितले की देव त्याचा आश्रय आणि दुर्ग आहे. त्याच्या संरक्षणासाठी त्याचा विश्वास, भरवसा, खात्री आणि निर्भरता परमेश्वरावर होती.

परमेश्वराविषयी तुम्ही काय म्हणाल?

- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा तारणारा आहे. माझ्या सर्व पापांपासून त्याने मला वाचवले आहे. माझ्या जीवनावरील पापाची शक्ती त्याने मोडून टाकली आहे. मी पापाच्या अधिपत्यातून मुक्त झालो आहे.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा स्वर्गीय पिता आहे. तो स्वतःचा म्हणून माझी काळजी घेतो. त्याचे प्रेम कधीच संपत नाही आणि कधीही अपयशी ठरत नाही. मी त्याचा स्वतःचा म्हणून स्वीकारला गेलो आहे.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो मला रोगमुक्त करणारा आणि मला सोडवणारा आहे. तो मला माझ्या सर्व रोगांपासून मुक्त करतो. तो मला माझ्या सर्व दु:खांपासून आणि संकटांतून सोडवतो.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा उद्धारकर्ता आहे. त्याने मला अंधकाराच्या शक्तींपासून वाचवून त्याच्या स्वतःच्या राज्यात घेतले

आहे. त्याचा पुत्र येशू ख्रिस्ताच्या रक्ताने माझी सुटका झाली आहे!

- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझी नीतिमत्ता आहे. मी कोणत्याही अपराधीपणाची, लज्जेची, हीनतेची किंवा दोषीपणाची भावना न ठेवता त्याचे नीतिमत्व परिधान केलेले आहे. मी त्याच्यासमोर पवित्र व निर्दोष आहे.
- मी परमेश्वराविषयी म्हणेन: तो माझा पुरवठा करणारा आहे. तो आपल्या संपत्त्यनुरूप माझ्या सर्व गरजा पुरवितो. कोणतीही उत्तम वस्तू तो माझ्यापासून राखून ठेवत नाही आणि माझ्यावर सर्व कृपा करतो.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा पवित्र करणारा आहे ज्याने मला स्वतःसाठी वेगळे केले आहे. तो जसा पवित्र आहे तसाच मी पवित्र आहे. त्याच्या स्वतःच्या खास लोकांचा भाग होण्यासाठी त्याने मला स्वतःसाठी शुद्ध केले आहे.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा मेंढपाळ आहे जो माझे नेतृत्व करतो, माझे पालनपोषण करतो, माझे रक्षण करतो, माझे मार्गदर्शन करतो आणि मला ताजेतवाने करतो. तो माझ्या शत्रूंच्या देखत माझ्यापुढे ताट वाढतो!
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा मार्गदर्शक आहे जो मला मार्गदर्शन करतो आणि माझ्या पावलांना मार्ग दाखवतो. माझी गती परमेश्वर स्थिर करतो आणि मी पडलो तरी तो मला हात देऊन सावरतो.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा सहाय्यक आहे. मला सहाय्य स्वर्ग आणि पृथ्वीच्या निर्मात्याकडून प्राप्त होते. तो मला कधीही निराश करत नाही.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा नीतिमान न्यायाधीश आणि माझे सर्वकाही सिद्धीस नेणारा आहे. मी माझे मुद्दे त्याच्यासमोर

मांडतो. मी कोणाच्याही वाईटाची परतफेड करत नाही. मी बऱ्याने वाईटावर जय प्राप्त करतो. माझा देव मला सिद्ध करतो.

- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा ध्वज आहे, त्याच्या नावाने मला विजय मिळाला आहे. सर्व परिस्थितीत तो मला नेहेमीच विजय मिळवून देतो. त्याच्याद्वारे, मी पराक्रम करतो कारण तो मला विजय देतो.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा शांती आहे. तो माझे जीवन परिपूर्ण शांती, परिपूर्ण शालोम, संपूर्ण कल्याणाने भरतो.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा रक्षक आहे. कसलेही अरिष्ट माझ्यावर येणार नाही. जो माझ्यावर लक्ष ठेवतो तो कधीही झोपत नाही. त्याच्या दिव्यदूतांना माझी काळजी घेण्याची आज्ञा करण्यात आली आहे.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो मला सामर्थ्य देणारा आहे. तो माझ्या जीवनाचे सामर्थ्य आहे. त्याची आशा धरून असताना, तो मला गरुडाप्रमाणे पंखांनी ऊंच भरारी घेण्याचे सामर्थ्य देतो.
- परमेश्वराविषयी मी म्हणेन: तो माझा पारितोषिक देणारा आहे. माझा देव त्याच्या नावाने केलेले माझे प्रेमाचे श्रम विसरत नाही. तोच मला पारितोषिक देतो, मला वाढ देतो आणि मला फलदायी करतो.

ह्यामध्ये अजून गोष्टी जोडत चला. परमेश्वराविषयी तुम्ही काय म्हणाल?

# 17
# देवदूत त्याचा शब्द ऐकतात

**स्तोत्र 103:20,21**
**20 अहो परमेश्वराच्या दूतांनो,**
**जे तुम्ही बलसंपन्न आहात, आणि त्याचा शब्द ऐकून त्याप्रमाणे चालता**
**ते तुम्ही त्याचा धन्यवाद करा.**
**21 अहो परमेश्वराच्या सर्व सैन्यांनो,**
**जे तुम्ही त्याची सेवा करून त्याचा मनोदय सिद्धीस नेता,**
**ती तुम्ही त्याचा धन्यवाद करा.**

परमेश्वराचे दूत बलसंपन्न आणि पराक्रमी आहेत. ते त्याच्या वचनाप्रमाणे करतात. ते त्याच्या वचनाच्या ध्वनीकडे लक्ष देतात आणि देवाचे वचन जे घोषित करते ते पूर्ण करतात.

आम्ही येथे एक तर्क लावत आहोत. जरी या दोन वचनांद्वारे तो निर्णायकरित्या सिद्ध केला जाऊ शकत नसला तरी, पवित्र शास्त्रामध्ये वर्णित देवदूतांबद्दल आणि त्यांच्या क्रियेबद्दल आपल्याला जी माहिती प्राप्त आहे ती याच्या सारासह सुसंगत अशाप्रकारची आहे. जेव्हा आपण, परमेश्वराने ज्या गोष्टी आपल्याला दिल्या आहेत, त्या जाहीर करणारे शब्द बोलतो, तेव्हा देवदूत, आपण जाहीर करत असलेल्या, त्याच्या वचनाचा आज्ञाध्वनी ऐकतात, आणि म्हणूनच, देवाच्या वचनानुसार, ते आपल्याप्रती, जे आपण तारणाचे वारसदार आहोत, त्यांचे असलेले सेवाकार्य पार पाडतात. जरी आम्ही लावत असलेला हा फक्त एक तर्क आहे, परंतु तो एक वैध अशाप्रकारचा तर्क आहे.

आपण जे तारणाचे वारसदार आहोत, त्या आपल्या सेवेसाठी देवदूत पाठवले जातात (इब्री 1:14). देवाने आपल्यासाठी, त्याच्या

संतांसाठी, जे घोषित केले आहे त्याचा प्रबंध ते करतात. देव आपल्यासाठी, म्हणजेच त्याच्या लोकांसाठी, जे करू इच्छितो तेच देवदूत करतात. दानिएलच्या (दानिएल 10) आणि तसेच प्रारंभिक मंडळीच्या (प्रेषितांची कृत्ये 12:5-7) अनुभवात जे बघायला मिळते त्याप्रमाणे, आपण असे अनुमान देखील लावू शकतो की आपण करीत असलेल्या बऱ्याच आध्यात्मिक क्रिया आहेत ज्यामध्ये आपल्या वतीने काम करण्यासाठी दिव्यदूत सहभागी होतात. प्रार्थना ही अशीच एक गोष्ट आहे. आपली उपासना, आपले देणे, आपली परमेश्वराप्रतीची आज्ञाधारकता हे देखील देवदूतांना आपल्या वतीने कार्य करण्यास प्रवृत्त करतात असे म्हणणे योग्य होईल. देवदूत देवाच्या वचनाकडे लक्ष देतात आणि त्याचे वचन पूर्ण करतात हे आपल्याला माहीत असल्याने, असा निष्कर्ष काढणे योग्य होईल की जेव्हा आपण देवाच्या वचनावर आणि अभिवचनांवर आपला विश्वास जाहीर करतो, तेव्हा असे करणे देवदूतांना आपल्या वतीने कार्य करण्यास प्रवृत्त करते. वचनाविरुद्ध असलेल्या कोणत्याही गोष्टीत देवदूत सहभागी होणार नाहीत. म्हणून, जेव्हा आपण देवाच्या वचनाविरुद्ध बोलतो, तेव्हा देवदूत त्या शब्दांवर आधारित कार्यामध्ये सहभागी होण्यास कधीच प्रवृत्त होणार नाहीत.

देवदूतांना कळू द्या की तुम्ही देवाचे वचन तुमच्या जीवनात पूर्ण होण्याच्या अपेक्षेने वाट बघत आहात. वचन बोला. कोणत्याही परिस्थितीत, जाणूनबुजून त्याचे वचन घोषित करा. गरजेच्या परिस्थितीत, “माझा देव आपल्या संपत्त्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरवील.” गोंधळाच्या स्थितीत, असे जाहीर करा, “या परिस्थितीत परिपूर्ण शांतता, चांगला समज आणि सहकार्य येईल अशी मी आज्ञा करतो. माझा देव शांतीचा उत्पादक आहे, गोंधळाचा नव्हे.” देवदूतांना तुमच्या आवाजातून त्याच्या शब्दाचा आज्ञाध्वनी ऐकू द्या आणि त्या वचनानुसार कृती करू द्या.

# 18
# परमेश्वराने तारलेल्यांनी असे म्हणावे

**स्तोत्र 107:2**
**परमेश्वराने उद्धरलेले जन असे म्हणोत कारण त्यांना त्याने शत्रूंच्या तावडीतून मुक्त केले आहे**

आपण परमेश्वराद्वारे उद्धरलेले लोक आहोत, आणि आपण असे म्हटलेच पाहिजे!

तुरुंगातून सुटल्यानंतर एखादा कैदी स्वतःला कैदी म्हणवून घेत फिरत नाही. तो हे निर्भयतापूर्वक आणि अभिमानाने जाहीर करतो की तो स्वतंत्र आहे! तो कैदी होता. ती आता भूतकाळातली गोष्ट झाली आहे. वर्तमानात तो कोण आहे हे अधिक महत्त्वाचे आहे! तो एक स्वतंत्र व्यक्ती आहे. त्याच्या स्वातंत्र्याच्या संपूर्ण अधिकारांचा तो वापरू शकतो.

विश्वासणारे म्हणून, आम्हाला अंधाराच्या शक्तींपासून मुक्त केले गेले आहे आणि येशू ख्रिस्ताच्या राज्यात सामील केले गेले आहे. देवाने त्याच्या लोकांना, म्हणजेच संतांना दिलेला वारसात सहभागी होण्यास आपण पात्र आहोत. येशू ख्रिस्ताच्या मौल्यवान रक्ताने आपण सोडवण्यात आलो आहे (कलस्सै 1:12-14). सोडवणे म्हणजे “मोलाने पुन्हा विकत घेणे”, बंदिवासातून मुक्त करणे आणि मूळ गौरवी स्थितीत पुनःस्थापित करणे. आपण परमेश्वराद्वारे उद्धरलेले आहोत. सैतानाचा आपल्यावर कसलाच दावा नाही, आपल्यावर प्रभुत्व नाही, आपल्यावर अधिकार नाही. आपण देवाने विकत घेतलेली त्याची संपत्ती आहोत (1 करिंथ 6:20).

- मी परमेश्वराने उद्धरलेला व्यक्ती आहे आणि मी असे म्हणतो!
- मी सैतान आणि त्याच्या सर्व दुरात्म्यांच्या सामर्थ्यापासून मुक्त झालो आहे (कलस्सै 1:13). अंधकाराच्या शक्तींचा माझ्यावर कोणताच हक्क नाही आणि माझ्यावर अधिकार देखील नाही.
- मी पापाच्या सामर्थ्यापासून मुक्त झालो आहे (रोमकरांस पत्र 6:6,14). पाप माझ्यावर वर्चस्व करू शकणार नाही.
- मी नियमशास्त्राच्या शापापासून मुक्त झालो आहे (गलती 3:13). आता मी अब्राहामाच्या आशीर्वादाखाली चालतो.
- मी सध्याच्या दुष्ट युगापासून मुक्त झालो आहे (गलती 1:4). वर्तमान युगातील मार्ग, प्रभाव आणि दुष्टाई यांची माझ्यावर कसलीच सत्ता नाही.
- मी प्रत्येक पापमय कृत्यातून मुक्त करण्यात आलो आहे (तिताला पत्र 2:14). भूतकाळातील पापी जीवनशैलीचा माझ्यावर अधिकार नाही. मी परमेश्वराचा होण्यासाठी आणि चांगल्या कामांसाठी पवित्र केला गेलो आहे.
- मी वाडवडिलांच्या निरर्थक आणि पापमय जीवनशैलीच्या पद्धतींपासून मुक्त झालो आहे (1 पेत्र 1:18,19). मी एक नवी सृष्टी आहे आणि नवीन जीवनात चालत आहे.
- मी उद्धरलेला व्यक्ती आहे आणि कोकऱ्याच्या रक्तामुळे मी शत्रूवर मात केली आहे (प्रकटीकरण 12:11). सैतान आणि त्याचे दुरात्मे माझ्या पायांखाली तुडविले गेले आहेत (लूक 10:19; रोमकरांस पत्र 16:20).
- मी परमेश्वराने उद्धरलेला व्यक्ती आहे आणि मी असे म्हणतो!

# 19
# हर्षाचा व तारणाचा शब्द कायम असू द्या

**स्तोत्र 118:15-17**
**15 उत्सवाचा व तारणाचा शब्द**
**नीतिमानांच्या वस्तीत आहे;**
**"परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करतो.**
**16 परमेश्वराचा उजवा हात उभारलेला आहे;**
**परमेश्वराचा उजवा हात पराक्रम करतो."**
**17 मी मरणार नाही, तर जगेन,**
**आणि परमेशाच्या कृत्यांचे वर्णन करीन.**

नीतिमानांच्या घरांमध्ये उत्सवाचा व तारणाचा शब्द असतो. इब्री भाषेत "तारण" हा शब्द *'येशुआ'* हा सर्वसमावेशक शब्द आहे (ग्रीक भाषेतील *'सोझो'* समान) आणि त्यात तारण, सुरक्षा, सुटका, विजय, समृद्धी, आरोग्य, सहाय्य, कल्याण, हीत आणि संपूर्णता समाविष्ट आहे.

या जगातील आव्हाने प्रत्येक घरात या ना त्या मार्गाने येण्याचा प्रयत्न करतात. नीतिमानांच्या कुटुंबांना जीवनातील आव्हाने आणि वादळांचा सामना करावा लागतो. तथापि, *"परमेश्वराचा उजवा हात"* नीतिमानांसाठी पराक्रम करतो. *"परमेश्वराचा उजवा हात"* हे देवाचे सामर्थ्य आहे जे नेहमीच विजयी असते आणि इतर कोणत्याही सामर्थ्यापेक्षा अधिक सामर्थ्यवान आहे. म्हणून, नीतिमानांच्या वस्तीत आनंद, विजय, उत्सव आणि तरुणाचा जयघोष असतो. म्हणून, आपण म्हणू शकतो, *"मी मरणार नाही, तर जगेन, आणि परमेशाच्या कृत्यांचे वर्णन करीन."*

जेव्हा आपण काही संघर्षांतून जात असतो तेव्हा आपण काय

केले पाहिजे? आपण आपला स्वर बदलतो का? नाही! आपण आपल्या घरांमध्ये उत्सव आणि तारणाचा स्वर कायम ठेवतो. आमचा देव पराक्रमी आहे हे आपण जाहीर करीत राहतो. आपण तारणाचा स्वर कायम ठेवतो कारण आपला देव आपल्याला वाचवतो, आपला सांभाळ करतो, आपले रक्षण करतो, आपल्याला रोगमुक्त करतो, आपला उद्धार करतो, आपली उन्नती करतो आणि आपल्याला विजय देतो! परमेश्वराचा उजवा हात सर्व ऋतूंमध्ये नेहमीच पराक्रमी आणि विजयी असतो. उत्सवाचा आणि तरुणाचा शब्द तुमच्या घरात ऐकण्यास येऊ द्या. प्रत्येक ऋतूमध्ये उत्सवाचा आणि तारणाचा शब्द कायम असू द्या.

# 20

# तुमच्या अंतःकरणातून तुमच्या जीवनाला आकार देणारी शक्ती येते

**नीतिसूत्रे 4:20-23**

**[20] माझ्या मुला, माझ्या वचनांकडे लक्ष लाव;**
**माझ्या सांगण्याकडे कान दे.**
**[21] ती तुझ्या डोळ्यांपुढून जाऊ देऊ नकोस;**
**ती आपल्या अंतःकरणात ठेव.**
**[22] कारण ती ज्यांना लाभतात, त्यांना ती जीवन देतात**
**आणि त्यांच्या सबंध देहाला आरोग्य देतात.**
**[23] सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंत:करणाचे विशेष रक्षण कर,**
**कारण त्यात जीवनाचा उगम आहे.**

देवाच्या वचनाने आपले अंतःकरण भरावे ही सूचना येथे करण्यात आली आहे. आपण त्याच्या वचनाकडे बारकाईने लक्ष देतो, कान देऊन त्याचे वचन ऐकतो, आणि त्याचे वचन आपल्या अंतरंगात राहावे म्हणून त्याच्या वचनावर आपले लक्ष केंद्रित करतो. त्याचे वचन त्यामुळे आपल्याला जीवन, आरोग्य आणि संपूर्णतेने आशीर्वादित करते. तो आपल्याला आपल्या अंतःकरणाचे रक्षण करण्यास सांगतो. वचनाच्या विरुद्ध असलेल्या कोणत्याही गोष्टीला आपण आपल्या अंतःकरणात येऊ देऊ नये. आपण आपल्या अंतःकरणाचे रक्षण केले पाहिजे, आणि प्रत्यक्षात, तेथे ठेवलेल्या वचनाचे रक्षण केले पाहिजे.

अंतःकरण, आपली आंतरिक व्यक्ती, फारच महत्त्वाची आहे. आपल्या अंतःकरणातून आपल्या जीवनाला आकार देणारी शक्ती बाहेर पडते. आपल्या अंतःकरणात जे आहे ते आपल्या जीवनात

मोकळे करण्याचा एक मार्ग म्हणजे आपण बोलतो त्या शब्दांद्वारे. आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या शक्ती, ज्या आपल्या अंतरंगातून येतात, त्या आपण बोलतो त्या शब्दांतून जाहीर होतात.

जर आपले अंतःकरण त्याच्या वचनाने भरलेले असेल, तर आपण जे शब्द बोलतो ते त्याच्या वचनाशी सुसंगत असतात. आम्ही त्याचे वचन बोलतो. आपल्या जीवनाला आकार देणाऱ्या शक्ती त्याच्या वचनातून येतात. त्यामुळे देवाच्या वचनाचे सामर्थ्य आपल्या जीवनात कार्य करण्यासाठी, आणि आपल्या जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावर, आपल्या वर्तमानावर आणि आपल्या भविष्यावर परिणाम करण्यासाठी मोकळे केले जाते.

तुमचे अंतःकरण देवाच्या वचनाने भरून टाका. त्याचे वचन बोला. तुमच्या जीवनाला आकार देणारी शक्ती तुमच्यातील देवाच्या वचनातून निर्माण होऊ द्या.

# 21
# नीतिमानाचे शब्द जीवन व सामर्थ्य मोकळे करतात

**नीतिसूत्रे 10:11,20,21,31,32**
**11 नीतिमानाचे मुख जीवनाचा झरा आहे;**
**दुर्जनाचे मुख बलात्काराने व्याप्त असते.**
**20 नीतिमानाची जिव्हा उत्कृष्ट रुप्यासारखी आहे;**
**दुर्जनांचे हृदय कवडीमोल आहे.**
**21 नीतिमानाची वाणी बहुतांचे पोषण करते,**
**परंतु मूर्ख अक्कल नसल्यामुळे मरतात.**
**31 नीतिमानाच्या मुखावाटे ज्ञान निघते,**
**पण उन्मत्त जिव्हा छाटली जाईल.**
**32 नीतिमानाच्या वाणीला जे काही ग्राह्य आहे तेच कळते,**
**पण दुर्जनांचे मुख उन्मत्तपणा वदते.**

या वचनांमध्ये आपण नीतिमानांच्या आणि दुष्टांच्या शब्दांमधील तफावत पाहतो. नीतिमानांचे शब्द “जीवनाचा झरा” आहेत. ते जीवन, संपूर्णता, कल्याण आणि आपल्याला माहित असणाऱ्या “जीवनाशी” संबंधित असलेल्या प्रत्येक गोष्टी प्रदान करतात. नीतिमान लोकांचे शब्द “उत्कृष्ट रुप्यासारखी” असतात, म्हणजे “अतिशय शुद्ध, बहुमोल आणि मौल्यवान” असतात. नीतिमानांचे शब्द *“बहुतांचे पोषण करतात”.* ते अनेक लोकांना पोषण, शक्ती, जीवन, सहाय्य आणि आशीर्वाद देतात. दोन अतिरिक्त गोष्टी नीतिमानांच्या शब्दांची वैशिष्ट्ये आहेत - ‘ज्ञान’ आणि ‘जे काही ग्राह्य (आनंददायक) आहे ते’.

शब्द इतरांना जीवन आणि आशीर्वाद देऊ शकतात. आपण जे शब्द बोलतो ते काही लोकांसाठी जीवनाच्या झऱ्याप्रमाणे ठरू शकतात.

आपले शब्द हे कोणीतरी शोधत असलेल्या उत्कृष्ट रुप्यासारखी असू शकतात आणि इतरांसाठी पोषण आणि शक्तीचे स्रोत ठरू शकतात.

तुमचे शब्द योग्य (नीतिमानाचे) आहेत याची खात्री करण्याचा एक निश्चित मार्ग म्हणजे देववचनाच्या सुसंगतीत बोलणे. आपण जर असे केले तर आपले शब्द ज्ञानाचे शब्द होतील आणि लोकांना आनंद, स्वातंत्र्य आणि मुक्तता देणारे शब्द होतील. नीतिमत्वाचे शब्द बोलणे निवडा. देववचनाच्या सुसंगतीत बोला.

# 22
# शब्द निरोगी करून संपूर्ण करतात

**नीतिसूत्रे 12:18**
**कोणी असा असतो की तलवार भोसकावी तसे अविचाराचे भाषण करतो,**
**परंतु सुज्ञांची जिव्हा आरोग्यदायी आहे.**

**नीतिसूत्रे 15:4**
**जिव्हेची सौम्यता जीवनाचा वृक्ष आहे.**
**पण तिची कुटिलता अंतःकरण विदारते.**

नीतिसूत्रे 12:18 मध्ये, आपण शिकतो की सुज्ञांची जिव्हा आरोग्यदायी असते. इब्री भाषेत "आरोग्य" यासाठी *'मार्पे'* हा शब्द वापरला गेला आहे ज्याचा अर्थ "उपचार, औषध, उपाय, निगा, सुटका, मनाची सुदृढता, संपूर्णता" असा होतो. शब्द, जर योग्यरित्या आणि सुज्ञानाने वापरले तर, ते आरोग्यदायी होऊ शकतात आणि स्वतःला व तुमचे ऐकणाऱ्यांना संपूर्णता आणू शकतात.

हाच शब्द *'मार्पे'* पुन्हा एकदा नीतिसूत्रे 15:4 मध्ये वापरला गेला आहे जेथे त्याचे भाषांतर "संपूर्णता" असे केले गेले आहे. जी जीभ हितकारक शब्द बोलते—शब्दशः, आरोग्यदायी व मोकळीकतेचे शब्द - ती जीवनाचा वृक्ष आहे. प्रकटीकरण 22:1,2 मध्ये आपण जीवनाच्या झाडाविषयी वाचतो - *"नंतर त्याने देवाच्या व कोकऱ्याच्या राजासनातून निघालेली नगरीच्या मार्गावरून वाहणारी 'जीवनाच्या पाण्याची' स्फटिकासारखी नितळ नदी मला दाखवली. नदीच्या दोन्ही बाजूंना बारा जातींची फळे देणारे जीवनाचे झाड होते, ते प्रत्येक महिन्यात आपले फळ' देते आणि त्या झाडाची पाने राष्ट्रांच्या आरोग्यासाठी उपयोगी पडतात."* जीवनाच्या झाडाची पाने आरोग्य

देत होती. जेव्हा आपण आरोग्यदायी, संपूर्णतेचे, सुटकेचे आणि निरोगीपणाचे शब्द बोलतो, तेव्हा आपण स्वतःला आणि ज्यांच्याशी आपण बोलतो त्यांना सुद्धा रोगमुक्तता प्राप्त करून देऊ शकतो.

शब्द आरोग्यदायी होऊ शकतात व संपूर्णता आणू शकतात. परमेश्वर म्हणतो की त्याचे वचन आपल्या संपूर्ण शरीरासाठी जीवन (ताजेपणा, सामर्थ्य) आणि आरोग्यदायी (*'मार्पे'*) आहे (नीतिसूत्रे 4:22). जेव्हा लोकांनी त्याला आरोळी मारली, तेव्हा देवाने त्याचे वचन पाठवून त्यांना बरे केले (*'राफा'* रोगमुक्ती, संपूर्ण बनवणे) (स्तोत्र 107:20). देवाच्या वचनात व्यक्तीला पूर्णपणे बरे करण्याची आणि संपूर्णता आणण्याची शक्ती आहे. म्हणून, देवाचे वचन बोला आणि त्याच्या वचनाची उपचार शक्ती तुमच्या मुखातील शब्दांद्वारे मोकळी होऊ द्या. निरोगी करणारे शब्द, जे चांगले औषध आहेत, व जे जीवनाच्या झाडासारखे आहेत ते तुमच्या मुखातून निघू द्या. आपल्यासाठी आणि आपल्या सभोवतालच्या लोकांसाठी आरोग्य आणि संपूर्णता आणण्यासाठी, देवाचे आरोग्यदायी शब्द तुमच्या मुखाद्वारे बोला.

# 23
# मधुर वचनांचे सामर्थ्य मोकळे करा

**नीतिसूत्रे 16:21,24**

**[21] जो मनाचा सुज्ञ त्याला समंजस म्हणतात. मधुर वाणीने शिक्षणाचा संस्कार अधिक होतो.**

**[24] ममतेची वचने मधाच्या पोळ्यासारखी मनाला गोड व हाडांना आरोग्य देणारी आहेत.**

कोणत्याही परिस्थितीत जे शब्द बोलले पाहिजेत त्याची निवड आपण करू शकतो. दयाळू, सौम्य, आनंददायी, समृद्ध करणारे, उत्थान करणारे आणि सकारात्मक शब्दांचा प्रभावशाली परिणाम होतो. मधुर वाणीने आणि दयाळूपणे बोललेले शब्द शिक्षण संस्कार वाढवतात. ते लोकांना प्राप्त होणारे मार्गदर्शन ग्रहण करण्यास अधिक सक्षम बनवतात, ते अधिक खात्रीशीर आणि मन वळविणारे असतात. मधुर, आनंददायी आणि समृद्ध करणारे शब्द एखाद्या व्यक्तीच्या आतील व्यक्तिमत्वाला बळ देतात आणि तसेच एखाद्या व्यक्तीला त्याच्या हाडांपासून आरोग्य देतात. आपण खुशामत करण्याबद्दल बोलत नाही. ते असे शब्द असतात जे प्रामाणिक नाहीत आणि ते पोकळ शब्द एखाद्याला फक्त चांगले वाटण्यासाठी वापरले जातात. आपण तर काळजीपूर्वक, मधुरतेने आणि सौम्यतेने बोलण्यात येणाऱ्या वास्तविक आणि खऱ्या शब्दांचा संदर्भ देत आहोत.

आपल्या संभाषणाचा भाग म्हणून आपण जेव्हा देवाचे सामर्थ्यवान वचन समाविष्ट करतो, तेव्हा आपण आपल्या शब्दांद्वारे विश्वास, आशा, हिम्मत, धैर्य, उपचार, सुज्ञता आणि सल्ला देऊ शकतो. तुमच्या बोलण्यात गोडवा असू द्या. प्रसन्नतेने बोला. लोकांना घडवणारे शब्द बोला. लोकांना समृद्ध आणि निरोगी करणारे शब्द बोला. लोकांसोबत

देवाविषयी बोलत असताना तो काय करू शकतो आणि त्याने काय अभिवचन दिले आहे ह्याचा स्पर्श सेवेद्वारे त्यांस प्राप्त होऊ द्या. मधुर वचनांचे सामर्थ्य मोकळे करा.

# 24
# तुमचे जीवन तुमच्याच शब्दांनी भरले जाते

**नीतिसूत्रे 12:14**
**आपल्या मुखातून निघालेल्या गोष्टींच्या योगे मनुष्य तृप्त होतो,**
**आणि मनुष्याला आपल्या हातच्या कर्माचे प्रतिफल मिळते.**

**नीतिसूत्रे 18:20**
**मनुष्याला आपल्या तोंडाळपणाची फळे पोटभर खावी लागतात;**
**त्याला आपल्या वाणीचे पीक भोगले पाहिजे.**

आपले शब्द सर्व प्रकारे आपल्या जीवनावर परिणाम करतात. ते आपल्या आतील व्यक्तिमत्वावर परिणाम करतात. मनुष्याचे पोट त्याच्या आतील व्यक्तित्वाचे दर्शक आहे. आपल्या आतील व्यक्तित्व चांगल्या गोष्टींनी भरले जाऊ शकते, तृप्त होऊ शकते, पोषित होऊ शकते आणि आपल्या शब्दांनी आशीर्वादित होऊ शकते, तसेच जसे अन्न खाण्याद्वारे आपले पोट भरते. आपले शब्द जीवनात आपल्यासोबत काय घडणार आहे त्यावर परिणाम करतात. आपल्या मुखातून निघालेल्या शब्दांच्या परिणामाने आपले जीवन तृप्त होते. वारंवार बोलत असलेल्या आपल्या शब्दांचे परिणाम आपण भोगत असतो.

तुमचे आतील व्यक्तिमत्व कोणत्या गोष्टींनी भरलेले असावे असे तुम्हाला वाटते? आत्मविश्वास, धैर्य, विश्वास, आशा, नीतिमत्ता, शांती, आनंद, शांतता, सुज्ञान, सामर्थ्य, आणि देवाचे पुत्र आणि कन्या या नात्याने आपल्यासाठी उपलब्ध असलेल्या सर्व चांगल्या गोष्टींनी भरलेले असावे का? नक्कीच! मग आपल्याला असे शब्द बोलण्याची गरज आहे जे आपल्याला अशा सद्‌गुणांनी भरतील जे देवाकडून त्याच्या वचनाच्या

आणि त्याच्या आत्म्याच्या सामर्थ्याने प्राप्त होतात. देवाचे वचन बोला. ख्रिस्तामध्ये जे सर्वकाही तुमचे आहे त्याची घोषणा करा. हे घोषित करा की तुम्ही परमेश्वराच्या राज्याचा भाग आहात आणि म्हणून तुम्हाला पवित्र आत्म्याकडून नीतिमत्व, शांती आणि आनंद प्राप्त झाले आहे. येशूने दिलेली शांती तुमच्याकडे आहे, जग देऊ शकत नाही अशी ती शांती आहे, मानवी बुद्धिकल्पनेपलीकडे असलेली ती शांती आहे आणि ही शांती तुमचे अंतःकरण व मन सुरक्षित ठेवते. तुमच्याकडे सामर्थ्य, प्रीती आणि संयमनाचा आत्मा आहे ह्याची घोषणा करा. परमेश्वर हाच तुमचा भरवसा आहे हे जाहीर करा. तुम्ही सिंहासारखे निर्भय आहात. तुम्ही हिमती आणि धैर्यवान आहात कारण तुम्ही जेथे जाल तेथे परमेश्वर तुमच्याबरोबर आहे. तुमच्या आतील व्यक्तीमत्वामध्ये चांगल्या गोष्टी निर्माण करणारे शब्द बोला.

तुमच्या जीवनातील अनुभव कशाने भरलेले असावेत असे तुम्हास वाटते? तुमचे वर्तमान आणि भविष्य कोणत्या गोष्टींनी भरलेले असावे असे तुम्हाला वाटते? तुमचे जीवन, तुमचे वर्तमान आणि तुमचे भविष्य यावर देवाची अभिवचने घोषित करा. तुमचे जीवन तुमच्या मुखातून निघालेल्या शब्दांच्या योगे तृप्त होते.

# 25
# तुमच्या शब्दांमध्ये जीवन आणि मृत्यूचे सामर्थ्य आहे

**नीतिसूत्रे 18:21**
**जिव्हेच्या हाती मृत्यू व जीवन ही आहेत;**
**तिची आवड धरणारे तिचे फळ भोगतात.**

देवाने जीवन आणि मृत्यूच्या बाबी जिभेच्या बलावर ठेवल्या आहेत, म्हणजेच आपण बोलतो त्या शब्दांमध्ये. आपले शब्द जीवन किंवा मृत्यू आणू शकतात. आपल्या शब्दांचे परिणाम स्वीकारण्यास आपली तयारी असले पाहिजे. आपल्या शब्दांचे फळ आपणास भोगावे लागतील.

"मृत्यू" म्हणजे "शारीरिकरित्या मरण होणे" आणि तसेच ह्या शब्दाचा उपयोग लाक्षणिक अर्थाने रोगराई, आजार आणि नाश यासाठी देखील केला जातो. "जीवन" सकारात्मकपणे कार्यरत असलेल्या प्रत्येक गोष्टीचा संदर्भ देते आणि त्यात ताजेपणा आणि सामर्थ्य यांचा समावेश होतो.

आपण बोलतो ते शब्द आपला नाश करू शकतात किंवा आपल्याला आशीर्वादित करू शकतात. आपण जे शब्द बोलतो ते आपल्याला जीवन आणि सामर्थ्य मिळवून देऊ शकतात, किंवा, ते आपले जीवन उध्वस्त करू शकतात व आपल्याला कमकुवत आणि रिकामे बनवू शकतात. देवाने शब्दांची रचना आपल्यावर त्याचा परिणाम आणि प्रभाव पडेल अशा पद्धतीने केली आहे. जे तुम्ही बोलता ते तुमची उभारणी करू शकते किंवा तुमचा नाश करू शकते.

म्हणून, आपण बोलताना असे शब्द निवडले पाहिजे जे स्वतःवर आणि इतरांवर जीवन व आशीर्वाद मोकळे करतात. देवाचे वचन बोलण्यापेक्षा दुसरे काहीही चांगले असू शकत नाही. आपल्या जीवनावर देवाची अभिवचने बोला. ख्रिस्तामध्ये नवी उत्पत्ती म्हणून देवाने तुमच्याबद्दल जे घोषित केले आहे ते बोला. त्याच्या वचनानुसार आपल्या जीवनात आशीर्वाद, समृद्धी, यश, विपुलता आणि चांगुलपणा जाहीर करा. हे घोषित करा की तुम्ही अनेकांसाठी आशीर्वाद व्हाल. आपण आशीर्वाद देण्याकरिता आशीर्वादित केले गेले आहोत असे जाहीर करा. ही घोषणा करा की तुम्ही देवाचे सर्व उद्देश आणि त्याने नेमून दिलेले सर्व कार्य पूर्ण कराल. तुमच्या जीवनातून देवाचे गौरव होईल असे घोषित करा. तुमचे वर्तमान आणि भवितव्य ह्यावर जीवन आणि आशीर्वाद मोकळे करण्यासाठी तुमचे शब्द वापरा.

# 26
# तुमच्या मुखात असणारे त्याचे वचन राष्ट्रांना प्रभावित करू शकते

**यिर्मया 1:9,10**
**9 तेव्हा परमेश्वराने आपला हात पुढे करून माझ्या मुखाला स्पर्श केला,**
**व तो मला म्हणाला, "पाहा, मी आपली वचने तुझ्या मुखात घातली आहेत;**
**10 पाहा, उपटण्यास व विध्वंस करण्यास,**
**नासधूस करण्यास व पाडून टाकण्यास,**
**बांधण्यास व लागवड करण्यास**
**मी तुला आज राष्ट्रांवर व राज्यांवर नेमले आहे."**

या दोन वचनांमध्ये, आपण भविष्यवादीय शब्दाचे सामर्थ्य पाहतो. राष्ट्रे आणि राज्ये यांच्यावर देवाने यिर्मयाच्या मुखात घातलेले वचन तो बोलेल तेव्हा, गोष्टी मुळापासून उपटल्या जातील, त्यांचा विध्वंस होईल, त्यांची नासधूस केली जाईल व त्या पाडून टाकण्यात येतील. देवाने त्याला दिलेले वचन जेव्हा यिर्मया बोलेल, तेव्हा, देवाला ज्या राष्ट्रांना आणि राज्यांना खाली पाडायचे होते त्यांच्यातील गोष्टी उपटल्या जातील आणि कोसळतील. आणि यिर्मयाने भविष्यवादीय वचन बोलल्यामुळे राष्ट्रांमध्ये आणि राज्यांमध्ये गोष्टी बांधल्या जातील, स्थापित केल्या जातील, व उभारल्या जातील.

भविष्यवादीय शब्द हा पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने लोकांद्वारे बोललेला शब्द आहे. देवाच्या लोकांच्या जीवनात पवित्र आत्मा अजूनही कार्यरत आहे. राष्ट्रे आणि लोकांवर भविष्यवाणी करण्यासाठी, प्रेरित करणारे शब्द बोलण्यासाठी किंवा भविष्यवादीय शब्द बोलण्यासाठी

तो अजूनही आपल्याला प्रवृत्त करतो. जेव्हा देव त्याचे शब्द आपल्या मुखात घालतो आणि आपण ते बोलतो, तेव्हा आपण राष्ट्रे आणि राज्यांवर प्रचलित असलेल्या परिस्थितीवर (आध्यात्मिक, सामाजिक, आर्थिक इ.) परिणाम करतो. आपल्या मुखातून निघणारे त्याचे शब्द राष्ट्रांवर परिणाम करू शकतात. देव त्याचे वचन पूर्ण होण्याबद्दल सावध असतो (यिर्मया 1:12).

# 27
# शुष्क अस्थींना संदेश दे म्हणजे त्या सजीव होतील

**यहेज्केल 37:1-7**

**1 परमेश्वराचा वरदहस्त माझ्यावर आला; आणि परमेश्वराच्या आत्म्याला स्फूर्ती होऊन त्याने मला उचलले व खोऱ्यात नेऊन ठेवले, तेथे अस्थीच अस्थी होत्या.**
**2 त्याने मला त्यांच्यामधून चोहोकडून फिरवले तेव्हा पाहा, त्या खोऱ्याच्या जमिनीवर पुष्कळ अस्थी होत्या; त्या अति शुष्क होत्या.**
**3 मग तो मला म्हणाला, "मानवपुत्रा, ह्या अस्थी सजीव होतील काय?"**
**मी म्हणालो, "प्रभू परमेश्वरा, हे तुलाच ठाऊक."**
**4 तेव्हा तो मला म्हणाला, "ह्या अस्थींविषयी संदेश देऊन त्यांना म्हण, शुष्क अस्थींनो, परमेश्वराचे वचन ऐका :**
**5 प्रभू परमेश्वर ह्या अस्थींना म्हणतो, पाहा, मी तुमच्यात श्वास घालतो म्हणजे तुम्ही सजीव व्हाल.**
**6 मी तुम्हांला स्नायू लावीन, तुमच्यावर मांस चढवीन, तुम्हांला त्वचेने आच्छादीन, तुमच्यात श्वास घालीन, म्हणजे तुम्ही सजीव व्हाल आणि तुम्हांला समजेल की मी परमेश्वर आहे."**
**7 मला आज्ञा झाली त्याप्रमाणे मी संदेश दिला; मी संदेश देत असता आवाज झाला; आणि पाहा, भूकंप होऊन अस्थींना अस्थी लागून जडल्या.**

हा शास्त्रभाग यहेज्केलच्या भविष्यवादिय अनुभवाचा एक भाग प्रकट करतो. ह्या शुष्क अस्थी इस्राएल राष्ट्राचे चित्र होते, जे त्यांच्या स्वतःच्या भूमीतून विखुरलेले आणि आशाहिन झाले होते (यहेज्केल 37:11,12). देवाने यहेज्केलला ह्या शुष्क अस्थींना भविष्यवादिय शब्द — देवाने दिलेले शब्द — बोलायला लावले. अस्थींना अस्थी लागून जडल्या, त्यांच्यावर मांस चढले, त्यांच्यात श्वास येऊन ते सजीव झाले व अतिशय मोठे सैन्य आपल्या पायांवर उभे राहिले (यहेज्केल 37:10).

भविष्यवादिय वचनाद्वारे संपूर्ण राष्ट्राच्या नियतीवर परिणाम झाला. भविष्यवादिय वचन हे एक वाहन होते ज्याद्वारे देवाच्या उद्देशांची पूर्तता करण्यासाठी देवाचे सामर्थ्य पृथ्वीवर मोकळे करण्यात आले होते.

आजही, पवित्र आत्मा आपल्याला भविष्यवादिय संदेश बोलण्यासाठी प्रेरणा देतो. हे आपल्या स्वतःच्या जीवनावर, इतर लोकांवर, शहरांवर, प्रदेशांवर आणि राष्ट्रांवर असू शकते. तो आपल्याला बोलण्याची प्रेरणा देतो ते शब्द जेव्हा आपण बोलतो, शुष्क अस्थी सजीव होतात! जे मृत आहे ते पुन्हा सजीव केले जाते! लोक आणि राष्ट्रे आशेने आणि जीवनाने उभे होतात. लक्षात ठेवा, जसा पवित्र आत्मा तुम्हाला प्रेरणा देतो, तसे तुम्ही शुष्क अस्थींशीं बोला, आणि ते सजीव केले जातील!

# 28

# तुमचे शब्द स्वर्गात ऐकले जातात

**दानिएल 10:12**

**तो मला म्हणाला, “दानिएला, भिऊ नकोस; कारण ज्या दिवशी तू समज घेण्याचा, व आपल्या देवापुढे नम्र होण्याचा निश्चय केलास त्याच दिवशी तुझे शब्द ऐकण्यात आले; त्या तुझ्या शब्दांवरून मी आलो आहे.**

जे शब्द आपण इथे पृथ्वीवर बोलतो ते स्वर्गात ऐकले जातात. आपण बोलतो त्या शब्दांना प्रतिसाद म्हणून परमेश्वर देवदूतांना पाठवतो.

आपण प्रार्थनेत शब्द बोलतो. शब्द बोलून आपण आपला विश्वास प्रकट करतो. अंधकाराच्या शक्तींविरुद्ध लढताना आत्म्याची तलवार चालवत असताना आपण शब्द बोलतो. लोकांना आशीर्वाद देण्यासाठी आपण शब्द बोलतो. लोकांना उपचार, सुटका आणि चमत्कार प्राप्त व्हावा यासाठी आपण शब्द बोलतो. पर्वत हलविण्यासाठी आणि वादळ शांत करण्यासाठी आपण शब्द बोलतो. पृथ्वीवरील आपल्या अधिकाराचा वापर करून बांधण्यासाठी आणि मोकळे करण्यासाठी आपण शब्द बोलतो. आपले शब्द स्वर्गात ऐकले जातात! आमच्या शब्दांना प्रतिसाद म्हणून देवदूत पाठवले जातात.

तुमचे शब्द स्वर्गात ऐकले जातात हे तुम्हाला माहीत असल्याने तुम्ही कोणते शब्द बोलाल? देवाचे वचनच स्वर्गात स्थिर आहे. *“हे परमेश्वरा, तुझे वचन स्वर्गात सर्वकाळ स्थिर आहे”* (स्तोत्र 119:89). आपण प्रार्थनेत, विश्वासाने, संघर्षामध्ये, सेवाकार्यात, अधिकाराचा वापर करताना—सर्व परिस्थितींमध्ये—जे शब्द बोलतो ते शब्द स्वर्गात

आधीच स्थापित केलेल्या देवाच्या वचनाशी सुसंगत असले पाहिजेत. लक्षात ठेवा, तुमचे शब्द स्वर्गात ऐकले जातात. नेहमी स्वर्गाशी सुसंगतीत बोला, आणि स्वर्ग तुमच्या वतीने कार्य करील.

# 29
# शब्दांचे प्रेषण अध्यात्मिक क्षेत्रातून नैसर्गिक क्षेत्राकडे होते

**दानीएल 10:17-19**

**17 स्वामी महाराज, मी तर आपला सेवक, माझ्या स्वामीबरोबर बोलण्याचे सामर्थ्य मला कोठून? मला तर मुळी त्राण राहिले नाही; माझ्यात दम राहिला नाही."**

**18 तेव्हा मनुष्याप्रमाणे दिसणाऱ्या एकाने मला स्पर्श करून माझ्यात त्राण आणले.**

**19 तो म्हणाला, "परमप्रिय मानवा, भिऊ नकोस; तुला शांती असो, हिंमत धर, नेट धर." तो माझ्याबरोबर बोलला तेव्हा मला शक्ती आली व मी म्हणालो, "माझ्या स्वामी, तू आता बोलावे, कारण तू माझ्यात हिंमत आणली आहेस."**

दानिएलाची देवदूतासोबत भेट झाल्यामुळे तो भारावून गेला, अशक्त, शक्तीहीन आणि कदाचित घाबरला देखील असावा. देवदूताने त्याला स्पर्श केला आणि हे शब्द म्हटले, *"भिऊ नकोस; तुला शांती असो, हिंमत धर."* आणि दानिएलात त्राण आले. देवदूताने दानिएलाला बोललेल्या शब्दांमुळे त्याच्यामध्ये शांती आणि शक्ती प्रसारित झाली. शब्द आध्यात्मिक क्षेत्र आणि नैसर्गिक क्षेत्र जोडतात. शब्दांचे प्रेषण अध्यात्मिक क्षेत्रातून नैसर्गिक क्षेत्राकडे होते.

मनुष्य ह्या नात्याने, नैसर्गिक आणि आध्यात्मिक दोन्ही क्षेत्रात कार्य करण्यास सक्षम होण्यासाठी देवाने आपली रचना केली आहे. विश्वासणारे या नात्याने, आध्यात्मिक क्षेत्रात आपण येशू ख्रिस्तामध्ये देवाच्या उजवीकडे बसलो आहोत. आपण ख्रिस्तामध्ये आहोत. आपण देवाचे वारस आहोत आणि येशूबरोबर सोबतीचे वारस आहोत. आध्यात्मिक क्षेत्रात ही आपली ओळख आहे. आपले शब्द, अध्यात्मिक

क्षेत्रात देवाने आपल्याला जे काही दिले आहे ते घेऊन, नैसर्गिक क्षेत्रात एखाद्याला ते प्रदान करण्यास सक्षम करतात.

उदाहरणार्थ, जेव्हा आपण आजारी लोकांची सेवा करतो आणि आरोग्यप्राप्तीची आज्ञा करतो, तेव्हा आपल्यात नैसर्गिक असे काही आहे का जे अलौकिकरित्या आरोग्य प्रदान करू शकते? खचितच काही नाही. आपण जे करीत आहोत ते म्हणजे येशू ख्रिस्ताने पूर्ण केलेले कार्य, अध्यात्मिक क्षेत्रातील आपल्यावर असणारा अभिषेक आणि अधिकार घेऊन त्या व्यक्तीला त्याच्या शरीरामध्ये आरोग्यप्राप्ती होण्यासाठी त्याचा प्रबंध करून देत आहोत. आपले शब्द आध्यात्मिक क्षेत्राला नैसर्गिक क्षेत्राशी जोडतात. जेव्हा आपण देवाच्या वचनावर आधारित बोलतो, तेव्हा आपण आध्यात्मिक क्षेत्रात जे काही आपले आहे ते घेऊन नैसर्गिक क्षेत्रात ते मोकळे करू शकतो. परमेश्वराचे राज्य यावे हे पाहण्यासाठी, व त्याची इच्छा जशी स्वर्गात तशीच पृथ्वीवरही पूर्ण होण्यासाठी आपण या जगात आहोत. असे करण्याचा एक मार्ग म्हणजे आपण त्याच्या वचनाशी सुसंगतपणाने बोलणे जेणेकरून त्याने आध्यात्मिक क्षेत्रात आपल्याला जे दिले आहे ते येथे नैसर्गिक क्षेत्रात मोकळे केले जाईल.

# 30

# "मी सशक्त आहे" असे अशक्तही म्हणो

**योएल 3:9,10**
**9 राष्ट्रांमध्ये हे जाहीर करा;**
**यज्ञयाग करून लढाईची तयारी करा,**
**वीरांची उठावणी करा;**
**सर्व लढवय्यांना एकत्र होऊ द्या,**
**आणि त्यांना चाल करू द्या.**
**10 तुमचे फाळ ठोकून त्यांच्या तलवारी बनवा,**
**आपल्या कोयत्यांचे भाले बनवा;**
**"मी वीर आहे" असे अशक्तही म्हणो.**

योएल अध्याय 3 हे यहोशाफाटच्या खोऱ्यातील हर्मगिदोनाच्या लढाईबद्दल आणि परमेश्वराच्या दिवसाविषयीची भविष्यवाणी आहे. राष्ट्रांना युद्धासाठी एकत्र केले जात आहे. अगदी शांततापूर्ण अवजारे (फाळ आणि कोयता) युद्धाच्या शस्त्रांमध्ये (तलवारी आणि भाले) रूपांतरित झाल्याचे वर्णन योएल करतो. या सर्व प्रक्रियेत एक चित्तवेधक विधान आहे – *"मी वीर आहे"* असे अशक्तही म्हणो. अशक्तांना असे म्हणायचे नाही की "मी अशक्त आहे." अशक्तांना म्हणायचे होते, "मी वीर आहे." येथे तात्पर्य असे आहे की "मी वीर आहे" असे म्हणून अशक्त लोक वीर होऊ शकतात आणि युद्धात पुढे जाऊ शकतात.

वर्तमान क्षणी आपल्याला तसे वाटत नसले तरीही देवाने त्याच्या वचनात आपल्यासाठी जे घोषित केले आहे त्याची त्याच प्रकारे पुष्टी करणे आपल्यासाठी योग्य आहे का?

पापाशी संघर्ष करणाऱ्यांनी पापावर विजय मिळवण्यासाठी "माझ्यावर पापाचे वर्चस्व राहणार नाही" असे म्हणणे योग्य ठरेल का? नक्कीच!

ज्यांना पाप आणि परीक्षांचा सामना करावा लागतो (म्हणजे आपल्या सर्वांना), त्यांना असे म्हणू द्या, "माझा जुना पापी स्वभाव ख्रिस्ताबरोबर वधस्तंभावर खिळला गेला आहे आणि माझ्या जीवनावरील पापाची शक्ती मोडली गेली आहे. माझ्यावर पापाचे वर्चस्व राहणार नाही."

आजारी लोकांना आरोग्य प्राप्त व्हावे म्हणून "येशूला" असे म्हणणे योग्य ठरेल का? नक्कीच!

आजारी लोकांना म्हणू द्या, "येशूने माझे सर्व आजार आणि दुःख स्वतःवर घेतले आणि त्याला बसलेल्या फटक्यांनीं मला आरोग्य प्राप्त झाले आहे."

त्यांच्या गरजा भागवता याव्यात म्हणून गरजूंनी "माझा देव माझ्या सर्व गरजा पुरवतो" असे म्हणणे योग्य ठरेल का? नक्कीच!

गरजूंनी म्हणावं, "परमेश्वर माझा मेंढपाळ आहे; मला काही उणे पडणार नाही. माझा देव आपल्या संपत्त्यनुरूप तुमची सर्व गरज ख्रिस्त येशूच्या ठायी गौरवाच्या द्वारे पुरवील."

ज्यांना शक्तीहीन वाटत आहे त्यांनी हे म्हणणे योग्य आहे काय की, "खरोखर मी सामर्थ्याने परिपूर्ण झालो आहे कारण पवित्र आत्मा माझ्यावर आला आहे" जेणेकरून ते आत्म्याच्या सामर्थ्याने कार्य करू शकतील? नक्कीच!

आपण असे म्हणूया, "पवित्र आत्मा माझ्यावर आल्याने मला सामर्थ्य प्राप्त झाले आहे आणि दीनांस सुवार्ता सांगण्यास, भग्नहृदयी जनांस बरे करण्यास, धरून नेलेल्यांची सुटका घोषित करण्यासाठी

मला अभिषेक केला आहे.”

तुम्हाला अगदी विपरीत वाटत असेल तरी, देवाचे वचन तुमच्याबद्दल काय म्हणते त्याची घोषणा करा. देवाचे वचन सत्य आहे. वस्तुस्थिती बदलू शकते. देवाचे सत्य शाश्वत आहे आणि ते कधीच बदलणार नाही. तुम्ही ज्या गोष्टींचा सामना करीत आहात त्या वस्तुस्थितीमध्ये देवाच्या वचनाच्या सत्याशी सुसंगत राहून बदल केला जाऊ शकतो. “मी वीर आहे” असे अशक्तही म्हणो, आणि असे म्हणून बलवान होवो.

# 31
# तुमच्या शब्दांनी परमेश्वराला खेदित करू नका

**मलाखी 3:13-16**
**13 परमेश्वर म्हणतो, तुम्ही माझ्याबरोबर कठोर भाषण केले आहे;**
**तरी तुम्ही म्हणता,**
**‘आम्ही तुझ्याविरुद्ध काय बोललो?’**
**14 तुम्ही म्हणालात,**
**‘देवाची सेवा करणे व्यर्थ आहे;**
**त्याने आज्ञा केल्याप्रमाणे आम्ही केले व सेनाधीश परमेश्वरापुढे आम्ही शोकवस्त्रे धारण करून चाललो**
**ह्यांपासून लाभ काय?**
**15 आता आम्ही गर्विष्ठांना सुखी म्हणतो;**
**दुराचारी संपन्न झाले आहेत;**
**त्यांनी देवाची परीक्षा पाहिली तरी त्यांचा निभाव लागला आहे.”’**
**16 तेव्हा परमेश्वराचे भय बाळगणारे एकमेकांशी बोलले;**
**ते परमेश्वराने कान देऊन ऐकले**
**आणि परमेश्वराचे भय धरणारे**
**व त्याच्या नामाचे चिंतन करणारे**
**ह्यांची एक स्मरणवही त्याच्यासमोर लिहिण्यात आली.**

कल्पना करा की परमेश्वराने त्याच्या लोकांचे बोलणे ऐकले आणि त्यांनी बोललेल्या गोष्टींमुळे तो दुखावला गेला आणि खेदित झाला आहे. देव आपले शब्द ऐकतो. वचन 16 आपल्याला सूचित करते की ज्यांनी परमेश्वराविषयी आदराने बोलले व त्याच्या नामाचे चिंतन केले त्यांची नोंद करण्यासाठी एक स्मरणवही लिहिण्यात आली आहे.

आपण बोललेले शब्द देव ऐकतो. तुमचे बोलणे ऐकल्यावर परमेश्वराला कसे वाटावे असे तुम्हास वाटते? निश्‍चितच, आपल्या शब्दांनी आपण देवाला दुखवू किंवा खेदित करू इच्छित नाही.

आपण जे बोलतो त्याद्वारे परमेश्वराची महिमा आणि स्तुती होईल आणि त्याचे मन प्रसन्न होईल याची खात्री आपण कशा प्रकारे करू शकतो? जेव्हा आपले बोलणे त्याच्या वचनाशी सुसंगत आणि त्याच्या दृष्टीने योग्य असते.

तुमच्या शब्दांनी परमेश्वराला खेदित होऊ देऊ नका. परमेश्वराने जे सांगितले आहे तेच सांगा. प्रत्येक परिस्थितीत त्याचे वचन बोला. त्याला दिसू द्या की प्रत्येक परिस्थितीत तुम्ही त्याचा आणि त्याच्या शब्दाचा आदर करता.

# 32
# “असा शास्त्रलेख आहे” असे म्हणायला शिका – जसे येशूने केले

**मत्तय 4:1-4**

**[1] तेव्हा सैतानाकडून येशूची परीक्षा व्हावी म्हणून आत्म्याने त्याला अरण्यात नेले.**

**[2] मग त्याने चाळीस दिवस व चाळीस रात्री उपास केला. त्यानंतर त्याला भूक लागली.**

**[3] तेव्हा परीक्षक त्याच्याजवळ येऊन म्हणाला, “तू देवाचा पुत्र आहेस तर ह्या धोंड्यांच्या भाकरी व्हाव्यात अशी आज्ञा कर.”**

**[4] परंतु त्याने उत्तर दिले की, “‘मनुष्य केवळ भाकरीने नव्हे, तर परमेश्वराच्या मुखातून निघणाऱ्या वचनाने जगेल,’ असा शास्त्रलेख आहे.”**

प्रभु येशू आमचे परिपूर्ण ‘उदाहरण’ आहे ज्याचे सर्व गोष्टींमध्ये आपण अनुकरण व अनुसरण करतो. येशूने अरण्यात ज्या तीन परीक्षांना तोंड दिले ते आपल्यासाठी नोंदवले गेले आहे. त्याला सामना करावा लागला अशा ह्या एकमेव परीक्षा नव्हत्या. तो सर्व प्रकारे (प्रत्येक क्षेत्रात, प्रत्येक मार्गात) आपल्याप्रमाणे पारखलेला होता; तरी निष्पाप राहिला (इब्री 4:15). आपल्याकडे सर्वच परीक्षांची नोंद नाही. परंतु, मत्तय 4 मध्ये नोंदवलेल्या तीन परीक्षांमध्ये, प्रत्येक वेळी प्रभू येशूने वचन बोलण्याद्वारे परीक्षांना प्रत्युत्तर दिले हे लक्षात येते. प्रत्येक वेळी “असा शास्त्रलेख आहे” असे तो म्हणाला. यास्तव, आपण खात्री बाळगू शकतो की प्रत्येक परीक्षेला ह्याच पद्धतीने वचन बोलण्याद्वारे तो सामोरे गेला.

प्रत्येक परीक्षेत, प्रत्येक परिस्थितीत, “असा शास्त्रलेख आहे” असे म्हणायला शिका. परमेश्वर जे बोलला तेच बोला. तुम्हाला आव्हान

देणाऱ्या परीक्षा आणि परिस्थितींवर मात करण्यासाठी वचन बोला. परीक्षांचा सामना करताना म्हणा, "असा शास्त्रलेख आहे, माझे शरीर माझ्यामध्ये वास करणाऱ्या पवित्र आत्म्याचे मंदिर आहे. असा शास्त्रलेख आहे की, माझ्यावर पापाचे वर्चस्व राहणार नाही; मी माझे शरीर नीतिमत्तेचे साधन म्हणून अर्पण करतो." अशा परिस्थितीचा सामना करताना, ज्यामध्ये भक्कम आव्हाने आहेत असे वाटते, तेव्हा असे म्हणा, "असा शास्त्रलेख आहे, मी देवापासून जन्मलो आहे आणि मी या जगावर मात केली आहे. माझ्या विश्वासाच्याद्वारे जगावर मात करणारा हा विजय आहे. परमेश्वर मला नेहमी विजय मिळवून देतो. या परिस्थितीतही मी विजयी होईन." असे म्हणायला शिका, "असा शास्त्रलेख आहे." येशूने सुद्धा तसे केले. प्रत्येक परिस्थितीत देवाचे वचन बोला.

# 33

# एका शब्दात दुरात्म्यांना बाहेर काढा

**मत्तय 8:16**
**मग संध्याकाळ झाल्यावर लोकांनी पुष्कळ भूतग्रस्तांना त्याच्याकडे आणले; तेव्हा त्याने भुते शब्दानेच घालवली व सर्व दुखणाइतांना बरे केले.**

शुभवर्तमानांमध्ये येशूच्या सेवेबद्दल वाचताना, त्याने दुष्ट आत्म्यांशी कसा व्यवहार केला हे आपणांस शिकायला मिळते. आदेशाचा शब्द बोलून त्याने भूतांवर आपला अधिकार आणि प्रभुत्व वापरले. मत्तय येथे नमूद करतो की त्याने केवळ शब्दाने भुते बाहेर काढली. तो फक्त आदेशाचा एक शब्द बोलला.

येशूच्या उदाहरणाचे अनुकरण करू या. आपले शब्द ख्रिस्तामध्ये आपल्याला दिलेल्या अधिकाराची आणि प्रभुत्वाची अभिव्यक्ती आहेत. त्याचे नाव वापरण्याच्या अधिकाराद्वारे आपल्याला दिलेला अधिकार आपण वाहतो. त्याच्या अधिकारात आपण चालतो. जेव्हा आपल्याला सैतानी शक्तींचा सामना करावा लागतो, तेव्हा आपण अधिकाराचे शब्द बोलून तसे करतो. आदेशाच्या एका शब्दाने आपण भुते काढून टाकतो.

अधिकाराचे शब्द बोलायला शिका. तुम्ही हे स्वतःसाठी तसेच इतरांची सेवा करताना करा. जेव्हा भीतीच्या विचारांना सामोरे जावे लागते तेव्हा असे म्हणायला शिका, "येशूच्या नावाने, मी भीतीच्या आत्म्याला आता निघून जाण्याची आज्ञा करतो. येशूच्या नावाने भीतीचे विचार मी नाकारतो." सामान्यतः, आपण कारणीभूत असलेल्या स्थितीनुसार आत्म्याला आज्ञा करतो. जर तुम्हाला असे वाटत असेल की

एखादी असामान्य किंवा स्पष्ट न करता येणारी "गोष्ट" गोंधळ निर्माण करत आहे, तर त्या गोंधळावर अधिकार घ्या. असे म्हणायला शिका, "येशूच्या नावाने, या कार्यात गोंधळ निर्माण करणाऱ्या आत्म्यांवर मी अधिकार घेतो. त्यांचा गोंधळ मी बांधून टाकित आहे. येशूच्या नावाने त्यांना निघून जाण्याची आज्ञा मी देत आहे." एखाद्या आजारी व्यक्तीची सेवा करताना जेव्हा तुम्हाला माहीत आहे की ही स्थिती एखाद्या दुष्ट आत्म्यामुळे आहे, तेव्हा तुम्ही असे म्हणा, "येशूच्या नावाने, मी या आजार निर्माण करणाऱ्या आत्म्यावर अधिकार घेतो आणि आताच त्याला सोडून जाण्याची आज्ञा देतो."

आदेशाच्या शब्दाने दुष्ट आत्म्यांना काढा. येशूने तसे केले आणि आपणही तसे केले पाहिजे.

# 34
# जेव्हा तुम्ही त्याला पृथ्वीवर पत्करता, तेव्हा स्वर्गात तुमचे उच्चारण होते

**मत्तय 10:32,33**
**32 जो कोणी माणसांसमोर मला पत्करील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर पत्करीन;**
**33 पण जो कोणी माणसांसमोर मला नाकारील त्याला मीही आपल्या स्वर्गातील पित्यासमोर नाकारीन.**

येशूचे शब्द अगदी स्पष्ट आहेत. जर आपण त्याला माणसांसमोर पत्करू तर तो आपल्याला स्वर्गातील पित्यासमोर पत्करेल.

"पत्करेल" हा शब्द मूळ ग्रीक भाषेत *'होमोलॉगिया'* असा आहे, जो ग्रीक *'होमो'* ज्याचा अर्थ "समान" आणि ग्रीक *'लोगॉस'* म्हणजे "काहीतरी सांगितले गेले आहे" असे मिळून एक मिश्रित शब्द आहे. म्हणून, "कबुली देणे" म्हणजे "तेच बोलणे, सहमती देणे, संमती देणे, मान्य करणे, दावा करणे."

"पत्करणे" म्हणजे "दुसऱ्या व्यक्तीप्रमाणेच एक समान बोलणे." बायबल आधारित कबुली म्हणजे देवाने जे म्हटले आहे त्याच्याशी - त्याच्या वचनाशी सहमत होणे आहे. देवाने जे सांगितले त्याच समान सांगणे आहे. त्याने जे सांगितले तेच आपण सांगतो. देवाच्या वचनाला विरोध करते अशी तुमची स्वतःची गोष्ट तुम्ही बोलू शकत नाही आणि मग त्याला कबुली म्हणू शकत नाही.

तो कोण आहे हे येशूने सांगितल्याप्रमाणे आपण देखील तेच कबूल केले पाहिजे. येशूबद्दलची आपली कबुली त्याने स्वतःबद्दल जे

सांगितले त्याच्याशी सहमत असली पाहिजे. येशू हा ख्रिस्त (मसीहा), जिवंत देवाचा पुत्र आहे. तोच मार्ग, सत्य व जीवन आहे; त्याच्याद्वारे आल्यावाचून पित्याकडे कोणी येत नाही. जेव्हा आपण त्याची कबुली देतो, म्हणजे, त्याने स्वतःबद्दल जे सांगितले होते तेच लोकांसमोर बोलतो, तेव्हा तो स्वर्गातील पित्यासमोर आपली कबुली देईल (त्याच्यासोबत आपल्या संबंधात आपण स्वतःबद्दल जे बोलतो त्यामध्ये आपल्याशी सहमत होईल). मग आपण असे म्हणू शकू की, "मी येशूच्या रक्ताने धुतलेलं देवाचं लेकरू आहे, पापापासून वाचवला गेलो आहे, देवाच्या राज्यात प्रवेश केला आहे" वगैरे, आणि येशू तुमच्याबद्दल हेच स्वर्गातील पित्यासमोर कबूल करेल!

येशूबद्दल तेच सांगा जे त्याने स्वतःबद्दल सांगितले व देवाचे वचन त्याच्याबद्दल जे प्रकट करते. तो तारणारा आहे. तो रोगमुक्त करणारा आहे. तो सोडवणारा आहे. तो शांतीचा अधिपती आहे. त्याला मनुष्यांसमोर पत्करा. तो पित्यासमोर तुम्हाला पत्करेल.

# 35

# शब्द तुमच्या अंतःकरणातील गोष्टी तुमच्या जीवनात आणतात

**मत्तय 12:33-35**

**33 'झाड चांगले आणि त्याचे फळ चांगले' असे म्हणा; अथवा 'झाड वाईट आणि त्याचे फळ वाईट' असे म्हणा; कारण फळावरून झाड कळते.**
**34 अहो सापाच्या पिलांनो, तुम्ही वाईट असता तुम्हांला चांगल्या गोष्टी कशा बोलता येतील? कारण अंतःकरणात जे भरून गेले आहे तेच मुखावाटे निघणार.**
**35 चांगला माणूस आपल्या अंतःकरणाच्या चांगल्या भांडारातून चांगल्या गोष्टी काढतो आणि वाईट माणूस आपल्या वाईट भांडारातून वाईट गोष्टी काढतो.**

एखादे झाड त्याच्या फळावरून ओळखले जाते. झाडाला येणारे फळ हे त्या झाडात काय आहे आणि ते कोणत्या प्रकारचे आहे यावर अवलंबून असते. ह्या गोष्टीला येशू लोकांशी संबंधित करतो. जर अंतःकरण वाईट असेल तर मुखातून वाईट गोष्टी निघतील कारण अंतःकरणात जे भरून गेले आहे तेच मुखावाटे निघणार.

वचन 35 मध्ये, आपण शिकतो की आपण आपल्या जीवनात जे उत्पन्न करतो (फळ) ते आपल्या अंतर्यामात काय आहे यावर अवलंबून आहे. जर तुमच्या आत चांगली ठेव (चांगला ठेवा) असेल तर तुम्हाला चांगले फळ प्राप्त होईल - तुमच्या आयुष्यातील चांगल्या गोष्टी येऊ द्या.

आपल्या जीवनात (फळ) जे आत आहे ते (चांगला खजिना) बाहेर येण्यासाठी शब्द महत्त्वाची भूमिका बजावतात कारण अंतःकरणाच्या विपुलतेतून (चांगला खजिना) आपले मुख बोलते.

शब्द तुमच्या अंतःकरणातील गोष्टी तुमच्या जीवनात आणतात. आपल्या अंतःकरणातील ठेव आपण बोलतो त्या शब्दांद्वारे आपल्या जीवनात मोकळी केली जाते.

चांगली ठेव ठेवा. ख्रिस्ताचे वचन आपल्यामध्ये विपुलतेने टिकून राहावे अशी सूचना आम्हाला देण्यात आली आहे (कलस्सै 3:16). तुमच्या आत देवाच्या वचनाची समृद्ध ठेव ठेवा. मग तुम्ही जे शब्द बोलता ते तुमच्यात असणाऱ्या देवाच्या वचनाशी सुसंगत होतील. तुम्ही वचनानुसारच बोलू लागाल कारण तुमच्या आत त्याचाच ठेवा आहे. तुमच्याद्वारे चांगल्या गोष्टी देखील येतील कारण तुमच्या अंतःकरणातून तुमच्या जीवनाला आकार देणारे सामर्थ्य बाहेर पडते (नीतिसूत्रे 4:22). शब्द तुमच्या अंतःकरणातील गोष्टी तुमच्या जीवनात आणतात. तुमचे जीवन वचनाने भरा. वचन बोला.

# 36
# तुमच्या शब्दांद्वारे तुम्ही निर्दोष किंवा दोषी ठरता

**मत्तय 12:36,37**

**[36] मी तुम्हांला सांगतो की, माणसे जो जो व्यर्थ शब्द बोलतील त्याचा हिशेब त्यांना न्यायाच्या दिवशी द्यावा लागेल.**

**[37] कारण तू आपल्या बोलण्यावरून निर्दोषी ठरशील आणि आपल्या बोलण्यावरून दोषी ठरशील."**

आमचे शब्द किती महत्त्वाचे आहेत? येशूने म्हटले की आपण बोललेल्या व्यर्थ शब्दांचाही हिशोब आपल्याला द्यावा लागेल. आपण नीतिसूत्रे 18:21 मध्ये पाहिले आहे की आपल्या शब्दांमध्ये जीवन आणि मृत्यूचे सामर्थ्य आहे. मत्तय 12:36,37 मध्ये, येशू आपल्या शब्दांचे शाश्वत परिणाम आपल्याला प्रकट करतो. आपल्या शब्दांद्वारे आपण निर्दोष किंवा दोषी ठरू. येथे आणि परलोक दोन्हीमध्ये शब्द इतके महत्त्वाचे असल्यास, आपण आपले शब्द गांभीर्याने घेतलेच पाहिजेत.

"व्यर्थ" ह्या शब्दासाठी ग्रीक भाषेत *'अर्गोस'* हा शब्द वापरण्यात आला आहे ज्याचा अर्थ "निष्क्रिय, निकामी, निरर्थक, निरुपयोगी, मंद, वांझ" असा होतो. येशूने म्हटले की प्रत्येक व्यर्थ शब्दाचा हिशोब आपण देऊ, असे शब्द बोलतो जे आपल्याला खरोखर बोलायचे नव्हते, म्हणजेच असे शब्द ज्यांचा आपल्याला सक्रियरित्या वापर करायचा नव्हता. हे कसे केले जाईल ते मला माहित नाही, परंतु त्याचा इशारा आपण गांभीर्याने घेतला पाहिजे.

तुमच्यासाठी आणि तुमच्या सभोवतालच्या इतरांसाठी व्यर्थ

शब्द बोलण्याऐवजी उपयुक्त, फळदायकतेचे आणि फायदेशीर असे शब्द बोला. तुमच्या स्वतःच्या आणि इतरांच्या जीवनात असे शब्द बोला जे जीवन, आशीर्वाद, सामर्थ्य आणि शक्ती प्रदान करतील. असे शब्द बोला जे स्वतःला आणि तुमच्या सभोवतालच्या लोकांना न्याय्य ठरवतील, उन्नत करतील, प्रोत्साहन देतील, उंचावतील आणि समृद्ध करतील. वचन बोला.

# 37
# बांधण्यासाठी व मोकळे करण्यासाठी ‘शब्द’ आपल्याला स्वर्गाच्या राज्याचा अधिकार देतात

**मत्तय 16:18,19**
**18 आणखी मी तुला सांगतो, तू पेत्र आहेस आणि ह्या खडकावर मी आपली मंडळी रचीन व तिच्यापुढे अधोलोकाच्या द्वारांचे काहीच चालणार नाही.**
**19 मी तुला स्वर्गाच्या राज्याच्या किल्ल्या देईन आणि पृथ्वीवर जे काही तू बांधशील ते स्वर्गात बांधले जाईल व पृथ्वीवर जे काही तू मोकळे करशील ते स्वर्गात मोकळे केले जाईल.”**

मंडळी खडकावर, म्हणजेच जिवंत देवाचा पुत्र येशू ख्रिस्तावर (मसीहा) रचली गेली आहे. पेत्राने केलेली ही मोठी कबुली होती जी पित्याने त्याला प्रकट केली होती. येशू जी मंडळी उभारत आहे ती सामर्थ्ययुक्त अशी मंडळी आहे जिला नरकातील सर्व शक्ती मिळून ताब्यात ठेवू शकत नाही, प्रतिबंध करू शकत नाही किंवा तिच्यावर विजयी होऊ शकत नाही. अशा ह्या मंडळीला, प्रभु येशूने स्वर्गाच्या राज्याचे – देवाच्या स्वतःच्या राज्याचे अधिकार (किल्ल्या) दिले आहेत. देवाचे राज्य या भूतलावर आणण्यासाठी आहे मंडळी या जगात आहे आणि त्यासाठी तिला स्वर्गाच्या राज्याचा अधिकार देण्यात आलेला आहे.

देवराज्याच्या अधिकाराचा वापर या पृथ्वी क्षेत्रावर कशाप्रकारे केला जाणार आहे? येशूने म्हटले की आपण “पृथ्वीवर बांधू” आणि “पृथ्वीवर मोकळे करू”. “बांधणे” या शब्दाचा अर्थ “निषिद्ध करणे, मनाई करणे, नकार देणे आणि बेकायदेशीर घोषित करणे” असा होतो.

"मोकळे करणे" या शब्दाचा अर्थ "नाश करणे, बंद करणे, बंधमुक्त करणे, सोडवणे, मुक्त करणे, विघटित करणे, पूर्ववत करणे, फेकून देणे, उलथून टाकणे आणि नाहीसा करणे" असा होतो. बांधायचे कसे आणि मोकळे कसे केले पाहिजे? हे आपण येशूला त्याच्या सेवेमध्ये करताना पाहतो. त्याच्या बोललेल्या शब्दांद्वारे त्याच्या अधिकाराचा वापर करून त्याने असे केले. बहिऱ्या-मुक्यांना तो म्हणाला, *"मोकळा हो"* आणि त्यांचे कान आणि जीभ मोकळी झाली (मार्क 7:33-35). तो स्त्रीला म्हणाला, *"तू आपल्या विकारापासून मुक्त झाली आहेस"* (लूक 13:12). येशूने अधिकारवाणीचे शब्द बोलले ज्यामुळे लोकांना सुटका प्राप्त झाली आणि सैतानाचे कार्य थांबले.

आपण त्याच्याच आदर्शाचे अनुसरण करतो. येशू नावाच्या अधिकारात आपण आपले शब्द बोलतो. जे शब्द आपण आपल्याला सोपवण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करत बोलतो त्याद्वारे आपण बांधतो आणि मोकळे करतो. विश्वासणारा म्हणून तुम्हाला सोपवण्यात आलेल्या देवराज्याच्या अधिकाराचा वापर करण्यासाठी तुमच्या शब्दांचा वापर करा. बांधण्यासाठी आणि मोकळे करण्यासाठी तुमचे शब्द देवराज्याच्या अधिकाराला मोकळे करतात! अधिकाराचे शब्द बोला.

# 38
# डोंगराशी बोल

**मत्तय 17:20**
**तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "तुमच्या अल्पविश्वासामुळे; कारण मी तुम्हांला खचीत सांगतो की, जर तुमच्यामध्ये मोहरीच्या दाण्याएवढा विश्वास असला तर ह्या डोंगराला 'इकडून तिकडे सरक' असे तुम्ही म्हटल्यास तो सरकेल; तुम्हांला काहीच असाध्य होणार नाही.**

विश्वासाबद्दल शुभवर्तमानातील येशूच्या शिकवणीचा जर आपण अभ्यास केला तर आपल्याला आढळेल की त्याने आपल्या विश्वास जाहीर बोलण्यावर खूप भर दिला. मत्तय 17 मध्ये, जेव्हा शिष्य भूत काढण्यात अयशस्वी ठरले, आणि ते असे का करू शकले नाहीत असा प्रश्न जेव्हा त्यांनी येशूला विचारला, तेव्हा येशूने त्यांना त्यांच्यातील अविश्वास किंवा विश्वासाचा अभाव दाखवला. त्यानंतर त्याने त्यांना (आणि आपल्यालासुद्धा) विश्वासाद्वारे निर्माण होणारी शक्यता, त्याद्वारे आपण काय करू शकतो, आणि आपला विश्वास कसा वापरायचा किंवा त्याचा उपयोग कसा करायचा हे शिकवले.

थोडक्यात, विश्वास केवळ भुते काढणे आणि त्यांची कार्ये उखडून टाकणे इतकेच करत नाही तर नैसर्गिक जगामध्ये देखील परिणामी बदल घडवून आणू शकतो (उदाहरणार्थ, हा डोंगर इकडून तिकडे हलवणे). विश्वासाने, येशू म्हणाला, "तुम्हांला काहीच असाध्य होणार नाही." आपल्या अंतःकरणात असलेल्या विश्वासाने आपण कार्य सिद्धीस नेऊ शकतो. येशूने म्हटले की आपल्या अंतःकरणातील विश्वास इतका प्रभावी आहे की फक्त मोहरीच्या दाण्याइतका विश्वास डोंगर हलवू शकतो. विश्वासाचा वापर करण्याचा मार्ग म्हणजे तो 'बोलणे'! तुमचा विश्वास जाहीर करा. तुमच्या अंतःकरणात विश्वास बाळगून, कोणत्या

गोष्टीसाठी तुम्ही विश्वास करीत आहात त्याचे वर्णन करणारे शब्द बोला.

आपण डोंगराशी बोललेच पाहिजे, असेही त्याने स्पष्ट केले. जेव्हा आपल्याला डोंगर हलवायचा असतो तेव्हा आपण डोंगराशी बोललेच पाहिजे. अनेकदा आपण इतरांसोबत डोंगराबद्दल बोलण्याची चूक करतो. कधी कधी, आपण परमेश्वराकडे डोंगराविषयी अशाप्रकारे बोलतो किंवा तक्रार करतो जणू काही तो डोंगर तिथे आहे हे त्याला आधीपासून माहीतच नव्हते. येशूने आपल्याला स्पष्टपणे सांगितले की आपण आपल्या अंतःकरणातील विश्वासाने डोंगराशी बोलले पाहिजे. दुरात्म्यांशी बोला. रोगांशी बोला. वादळांशी बोला. परिस्थितीशी बोला. अभावाशी बोला. बंद असणाऱ्या दारांशी बोला. आपल्या नैसर्गिक क्षेत्रातील गोष्टींशी बोला. तुमच्या विश्वासानुसार आज्ञा द्या. तो म्हणाला, *"तुम्हाला काहीही असाध्य होणार नाही."* विश्‍वासाबद्दल येशूने दिलेल्या सूचनांचे पालन करूया. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 39
# तुम्हाला अपेक्षित असलेला परिणाम जाहीर करा

**मार्क 5:25-34**
**25 आणि तेथे रक्तस्रावाने बारा वर्षे पिडलेली एक स्त्री होती.**
**26 तिने बऱ्याच वैद्यांच्या हातून पुष्कळ हाल सोसून आपल्याजवळ होते नव्हते**
**ते सर्व खर्चून टाकले होते तरी तिला काही गुण न येता तिचा रोग बळावला**
**होता.**
**27 येशूविषयीच्या गोष्टी ऐकून ती त्या गर्दीत शिरली आणि त्याच्यामागे येऊन**
**त्याच्या वस्त्राला शिवली.**
**28 कारण ती म्हणत होती, "केवळ ह्याच्या वस्त्रांना शिवले तरी मी बरी होईन."**
**29 तेव्हा लगेचच तिचा रक्ताचा झरा सुकून गेला व आपण त्या पीडेपासून बरे**
**झालो आहोत असा तिला शरीरात अनुभव आला.**
**30 आपणामधून शक्ती निघाली आहे हे येशूने आपल्या ठायी लगेच ओळखले**
**आणि गर्दीमध्ये वळून म्हटले, "माझ्या वस्त्रांना कोण शिवले?"**
**31 त्याचे शिष्य त्याला म्हणाले, "लोकसमुदाय आपणाभोवती गर्दी करत आहे हे**
**आपण पाहता, तरी आपण म्हणता, मला कोण शिवले?"**
**32 मग जिने हे केले होते तिला पाहण्यास त्याने सभोवार बघितले.**
**33 तेव्हा ती स्त्री, आपल्या बाबतीत जे काही घडले ते जाणून भीत भीत व कापत**
**कापत त्याच्याकडे आली व त्याच्या पाया पडून तिने त्याला सर्व खराखुरा**
**वृत्तान्त सांगितला.**
**34 तो तिला म्हणाला, "मुली, तुझ्या विश्वासाने तुला बरे केले आहे; शांतीने जा**
**आणि तुझ्या पीडेपासून मुक्त हो."**

या स्त्रीने सुरुवातीला स्वतःच्या मनात विचार केला असावा, "केवळ ह्याच्या वस्त्रांना शिवले तरी मी बरी होईन." शेवटी, ती तसे बोलू सुद्धा लागली, "केवळ ह्याच्या वस्त्रांना शिवले तरी मी बरी होईन." अशा प्रकारे ती जे बोलली ते इतरांना कळले आणि आपल्यासाठी ते

नोंदविण्यात आले. येशूने या स्त्रीला म्हटले की तिच्या विश्वासाने तिला बरे केले आहे. तिचे शब्द आणि कृती तिच्या विश्वासासोबत सुसंगत होते. तिने विश्वास ठेवला. ती बोलली. तिने कृती केली.

अपेक्षित परिणाम व्यक्त करीत तिने आपला विश्वास जाहीर केला. ती म्हणू लागली की जेव्हा ती येशूच्या कपड्याला स्पर्श करील तेव्हा ती बरी होईल. प्रभू येशूने तिचा विश्वास, ज्यामुळे आरोग्यप्राप्तीचा चमत्कार घडून आला, मान्य केला.

काळ बदलला आहे. परंतू, देवावरील विश्वासाचे पवित्र शास्त्रातील तत्त्व अजूनही कायम आहे. आपल्या अंतःकरणातील विश्वासाला देव अजूनही प्रतिसाद देतो. आपला विश्वास आपल्या बोलण्यातून आणि कृतीतून व्यक्त होतो. तुमचा विश्वास जाहीर करा. ज्या गोष्टीसाठी तुम्ही देवावर विश्वास ठेवला आहे, त्याबद्दलचा तुमचा अपेक्षित परिणाम जाहीर करा.

# 40
# तुम्ही जे बोलता ते सिद्धीस जाणार ह्याचा विश्वास करा

**मार्क 11:22,23**
**22 येशूने त्यांना उत्तर दिले, “देवावर विश्वास ठेवा.**
**23 मी तुम्हांला खचीत सांगतो की, जो कोणी ह्या डोंगराला ‘तू उपटून समुद्रात टाकला जा,’ असे म्हणेल आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल.**

मार्क 11:22,23 एक असा शास्त्रभाग आहे ज्यामध्ये देवावर असलेला आपला विश्वास कसा वापरला जातो याबद्दलची स्पष्ट शिकवण येशूने दिलेली आहे. विश्वास कसा वापरायचा हे येशूने नुकतेच अंजिराच्या झाडाला बोलण्याद्वारे दाखवून दिले होते. त्याने अंजिराच्या झाडाला बोलल्यामुळे झालेला परिणाम शिष्यांनी पाहिला होता. मग येशूने त्यांना, देवावर त्यांचा विश्वास कसा वापरता येईल, हे समजावून सांगितले.

येशूने आपल्याला देवावर विश्वास ठेवून डोंगराशी बोलण्याची आणि त्याला हलण्याची आज्ञा देण्याची सूचना दिली. तुम्ही जे बोलत आहात त्याबद्दल तुमच्या मनात शंका येऊ देऊ नका. तुम्ही म्हणता ते घडून येईल यावर विश्वास ठेवा आणि तुम्ही जे बोलता ते तुम्हाला प्राप्त होईल. आपला विश्वास देवावर आहे. पण त्याच वेळी, आपण नैसर्गिकरित्या काहीतरी करतो. आपण विश्वासाचे शब्द बोलतो. आपला विश्वास आहे की ज्या परमेश्वरावर आपला विश्वास आहे तो आपण बोललेले शब्द पूर्णत्वास नेईल. आमचा विश्वास आहे की आपण

देवाचे सहकारी आहोत. जेव्हा आपण विश्वासाचे शब्द बोलतो, तेव्हा परमेश्वर ज्याच्यावर आपण विश्वास ठेवला आहे तो आपल्या वतीने कार्य करतो आणि ते शब्द पूर्णत्वास आणतो. देवावरील विश्वासामुळेच, आपण जे बोलू ते होईल यावरही आपण विश्वास ठेवू शकतो कारण देव ते घडवून आणण्यास सक्षम आहे.

परमेश्वरावर विश्वास ठेवा. तुमचा विश्वास जाहीर करा. तुम्ही जे बोलता ते पूर्ण होईल यावर विश्वास ठेवा कारण देव ते घडवून आणतो. तुम्ही म्हणता ते पूर्णत्वास येईल यावर विश्वास ठेवा.

# 41
# प्रार्थनेत विश्वासाचे शब्द बोला

**मार्क 11:22-24**
**22 येशूने त्यांना उत्तर दिले, "देवावर विश्वास ठेवा.**
**23 मी तुम्हांला खचीत सांगतो की, जो कोणी ह्या डोंगराला 'तू उपटून समुद्रात टाकला जा,' असे म्हणेल आणि आपल्या अंतःकरणात शंका न बाळगता, आपण म्हणतो तसे घडेलच असा विश्वास धरील त्याच्या शब्दाप्रमाणे घडून येईल.**
**24 म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल *ते* आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे *ते* तुम्हांला मिळेल.**

ह्याच शास्त्रभागात ज्यामध्ये देवावर असलेला आपला विश्वास कसा वापरला पाहिजे हे प्रभू येशूने आपल्याला शिकवले, त्यामध्येच तो पुढे प्रार्थनेबद्दल शिकवत राहिला. *"म्हणून मी तुम्हांला सांगतो, तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल ते ...". "म्हणून मी तुम्हाला सांगतो..."* याचा अर्थ "या कारणास्तव, मी तुम्हाला हे सांगतो..." किंवा "म्हणूनच मी हे तुम्हाला सांगतो..." असा होतो. मार्क 11:24 मध्ये येशूने आपल्याला प्रार्थनेबद्दल दिलेले अभिवचन आणि मार्क 11:23,23 मध्ये दिलेली प्रार्थना करण्याची पद्धत यांना त्याने आपल्याला शिकवलेल्या गोष्टींशी जोडलेली आहे.

येशूने म्हटले की तुम्ही प्रार्थना करून जे काही मागाल ते आपल्याला मिळालेच आहे असा विश्वास धरा म्हणजे ते तुम्हांला मिळेल. जेव्हा आपण त्याच्या इच्छेप्रमाणे काही मागतो तेव्हा पित्याकडे आपण जे मागितले ते आपल्याला मिळाले आहे हे देखील आपल्याला ठाऊक असते (1 योहान 5:14,15). म्हणून, आपला विश्वास आहे की आपण प्रार्थना केली त्या वेळी ते आपल्याला मिळाले आहे. ती पूर्ण झालेली

बाब आहे. ते आत्म्यात केले जाते. मार्क 11:23 मध्ये त्याने आपल्याला जे शिकवले ते आता आपण वापरतो. आपण गरजेशी, परिस्थितीशी, समस्येशी, डोंगराशी बोलतो आणि प्रार्थनेत आपल्याला जे प्राप्त झाले आहे त्याची घोषणा करतो. आपण डोंगर सरकल्याचे घोषित करतो. प्रार्थनेत आपण जे मागितले ते आपल्याला प्राप्त झाले आहे असा विश्वास ठेवण्याद्वारे, आणि त्या परिस्थितीला हे जाहीर करण्याद्वारे की जे काही आपण मागितले ते आपल्याला प्राप्त झाले आहे, देवावरील विश्वासाचा वापर केला जातो. प्रार्थनेत विश्वासाचे शब्द बोला. प्रार्थनेमध्ये देवाप्रति विश्वासाचे शब्द, आणि मग तुम्ही ज्या परिस्थितीबद्दल प्रार्थना केली त्याबद्दल विश्वासाच्या शब्दांचा समावेश होतो.

# 42
# त्याच्या वचनाशी सहमत असा

**लूक 1:37,38,45**
**37 कारण 'देवाला काहीच अशक्य होणार नाही."**
**38 तेव्हा मरीया म्हणाली, "पाहा, मी प्रभूची दासी; आपण सांगितल्याप्रमाणे मला होवो." मग देवदूत तिच्यापासून निघून गेला.**
**45 जिने विश्वास ठेवला ती धन्य, कारण प्रभूने तिला सांगितलेल्या गोष्टींची पूर्णता होईल."**

**लूक 1:37 (सुधारित आवृत्ती 1885)**
**कारण परमेश्वराने दिलेले कोणतेही वचन सामर्थ्य-शून्य असणार नाही.**

पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने ती गर्भधारणा करणार ही बातमी मरीयेकडे घेऊन आलेल्या देवदूताने *"देवाला काहीच अशक्य होणार नाही"* असे म्हणत संदेश पूर्ण केला. हा शब्द "काहीच नाही" तीन ग्रीक शब्द *'पास'* (सर्व, प्रत्येक), *'रेमा'* (शब्द, उच्चार), आणि *'ओउ'* (नाही) यांचे संमिश्र आहे. म्हणून, सुधारित आवृत्तीमध्ये पाहिल्याप्रमाणे वचन 37 चे अधिक चांगले भाषांतर *"...देवाचा कोणताही शब्द सामर्थ्यशून्य नाही"* ह्या प्रकारे होतो. देवाकडून आलेला प्रत्येक शब्द प्रबळ आहे आणि तो पूर्ण होईल.

परमेश्वर बोलला होता. देवदूताने याची साक्ष दिली. मरीयेने फक्त देवाच्या वचनाशी सहमत होऊन प्रतिसाद दिला. ती म्हणाली, *"आपण सांगितल्याप्रमाणे मला होवो."* तिचा या शब्दाशी सहमत होण्याचा अर्थ असा होतो की तेव्हापासून तिने तिच्यावर जे काही बोलले होते त्याप्रमाणे त्याच्याशी सुसंगत होऊन सर्व काही केले. नंतर, अलिशिबेद्वारे पवित्र आत्म्याने मरीयेला प्रोत्साहित केले आणि ही पुष्टी केली की तिने विश्वास

ठेवल्यामुळे, तिच्याशी बोललेल्या वचनाची पूर्णता तिला बघायला मिळेल.

आपण लिखित शास्त्रवचनांमध्ये वाचलेले देवाचे कोणतेही वचन पूर्ण होण्यासाठी सामर्थ्यशून्य नाही. पवित्र शास्त्रात आपणासाठी दिलेला प्रत्येक शब्द प्रबळ आहे आणि पूर्ण होईलच. त्याच्या वचनावर विश्वास ठेवणे म्हणजे आपण त्याच्या वचनाशी सहमत आहोत. आपण सहमत आहोत आणि मरीयेप्रमाणेच म्हणतो, *"आपण सांगितल्याप्रमाणे मला होवो."* त्याच्या वचनासोबतच्या आपल्या सहमतीमध्ये आपण कसे विचार करतो, बोलतो आणि कार्य करतो ह्याचा समावेश होतो. वचनाच्या विरुद्ध बोलून आपण त्याच्या त्याच्या वचनाशी सहमत आहोत असे आपण म्हणू शकत नाही. जर आपण देवाशी आणि देवाच्या वचनाशी सहमत आहोत, तर आपले शब्द देखील त्याच्या वचनाशी सहमत असले पाहिजेत. जेव्हा आपण आपला विश्वास जाहीर करतो, त्याच्या वचनाशी सहमत असतो, तेव्हा प्रभूकडून आपल्याशी बोललेल्या गोष्टींचे कार्यप्रदर्शन होईल.

# 43
# रोगांना निघून जाण्याची आज्ञा करा

**लूक 4:38,39**
**38 मग तो सभास्थानातून उठून शिमोनाच्या घरी गेला. शिमोनाची सासू कडक तापाने पडली होती, तिच्यासाठी त्यांनी त्याला विनंती केली.**
**39 तेव्हा त्याने तिच्यावर ओणवून तापाला दटावले, तेव्हा तिचा ताप निघाला व लगेच ती उठून त्यांची सेवा करू लागली.**

आपण जीवनात व सेवाकार्यात प्रभु येशूचे अनुसरण करतो. लोकांचे आजार व रोग बरे करताना येशूने त्यांची सेवा कशी केली? आजारपण आणि रोग दूर करण्यासाठी कुठेही येशू पित्याला विनंती प्रार्थना करताना आपल्याला दिसत नाही. होय, प्रार्थनेत येशूने पित्यासोबतच्या सहभागीतेमध्ये बराच वेळ घालवला. परंतु आजार आणि रोगांशी व्यवहार करताना, येशूने अधिकारवाणीने रोगाला निघून जाण्याची आज्ञा केली. लूक 4:38,39 हे अश्याप्रकारचेच एक उदाहरण आहे. प्रभू येशूने तापाला दटावले. त्याने तापाला दटावून त्याला निघून जाण्याची आज्ञा केली आणि तो लगेच निघून गेला.

येशू नेहमीच बरोबर असतो. तो शाश्वत वचन आहे. आतापर्यंत जर आपल्या ईश्वरविज्ञानात आजार आणि रोगांप्रति येशूने केल्याप्रमाणे व्यवहार समाविष्ट नसेल, तर आपल्या ईश्वरविज्ञानात बदल करण्याची आवश्यकता आहे आणि येशूने जे सांगितले आणि केले त्याशी स्वतःला सुसंगत करण्याची आवश्यकता आहे.

तुम्हाला आणि मला येशूने केलेली कृत्ये आणि त्याहूनही मोठी कृत्ये करायची आहेत (योहान 14:12). आणि अर्थातच, त्याने ज्याप्रकारे ते केले तसेच आपल्याला देखील करायचे आहे. येशूने आजार आणि

रोगांना दटावले आणि त्यांना निघून जाण्याची आज्ञा दिली. त्यामुळे तुम्ही आणि मी त्याच्या सारखेच बोलले पाहिजे. आपण देखील रोगांना निघून जाण्याची आज्ञा दिली पाहिजे. आपण हे आपल्या स्वतःच्या शरीरासाठी तसेच इतरांची सेवा करत असताना करू शकतो. येशूचे अनुसरण करा. त्याने जे केले ते करा. तुमचे शब्द त्याने तुम्हाला दिलेल्या अधिकाराची अभिव्यक्ती आहेत. रोगांना निघून जाण्याची आज्ञा द्या. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 44
# वादळाशी बोला

**लूक 8:22-25**
**22 नंतर त्या दिवसांत एकदा असे झाले की, तो आपल्या शिष्यांसह मचव्यात गेला आणि "आपण सरोवराच्या पलीकडे जाऊ" असे त्यांना म्हणाला; तेव्हा त्यांनी मचवा सोडला.**
**23 नंतर ते हाकारून जात असता तो झोपी गेला; मग सरोवरात मोठे वादळ सुटून मचव्यात पाणी भरू लागले व ते धोक्यात होते.**
**24 तेव्हा ते त्याच्याजवळ येऊन त्याला जागे करून म्हणाले, "गुरूजी, गुरूजी, आपण बुडालो!" तेव्हा त्याने उठून वाऱ्यास व पाण्याच्या कल्लोळास धमकावले, आणि ते बंद होऊन निवांत झाले.**
**25 तेव्हा त्याने त्यांना म्हटले, "तुमचा विश्वास कोठे आहे?" ते भयभीत होऊन विस्मित झाले व एकमेकांना म्हणाले, "हा आहे तरी कोण? कारण वारे व पाणी ह्यांनादेखील हा आज्ञा करतो व ते त्याचे ऐकतात."**

वादळ आणि पाण्याच्या कल्लोळास येशूने धमकावले व त्यांना शांत राहण्याची आज्ञा दिली, आणि त्यांनी त्याचे आज्ञापालन केले. ह्या हेतूने की ते त्यांच्या विश्वासाने ही परिस्थिती हाताळू शकले असते, येशू आपल्या शिष्यांकडे वळला आणि त्यांना विचारले, "तुमचा विश्वास कोठे आहे?". त्याने जसे केले तसेच ते देखील त्यांच्या विश्वासाने करू शकले असते.

पित्यासोबत आपण कसे राहावे व चालावे ह्याचा आदर्श प्रभू येशूने आपल्यासाठी ठेवला केला. पवित्र आत्म्याच्या अभिषेकाखाली चालणे आणि सेवा करणे म्हणजे काय हे त्याने आपल्याला दाखवून दिले आहे. विश्‌वास काय करू शकतो हेही त्याने आपल्याला दाखवले आहे. अचेतन गोष्टींशी, जसे की अंजिराचे झाड, आजारपण, रोग, वादळ आणि पाण्याच्या लाटा, ह्याच्याशी तो बोलला. त्याने त्यांना त्याचा

आदेश पाळण्याची आज्ञा दिली आणि त्यांनी तसे केले. येशूने जे केले त्यात आपण त्याचे अनुकरण केले पाहिजे का? नक्कीच!

पुन्हा जेव्हा तुम्ही वादळाचा सामना कराल – मग ते अक्षरशः वारे आणि लाटा असोत किंवा जीवनातील इतर कोणतेही “वादळ” असो, तेव्हा येशूने जे केले असते तेच करा. वादळाशी बोला. त्याला शांत राहण्याची आज्ञा द्या. विघ्नांना निघून जाण्याची, थांबण्याची, स्तब्ध राहण्याची आज्ञा द्या. गोंधळ निर्माण करणाऱ्या, वाईट इच्छांच्या, गप्पांच्या, कलहाच्या, संघर्षाच्या, अयोग्य गोष्टींच्या वादळांना थांबण्याची आज्ञा द्या.

# 45
# लोकांसाठी बंधन मुक्ततेची घोषणा करा

**लूक 13:10-16**

**[10] तो शब्बाथ दिवशी एका सभास्थानात शिकवत होता.**

**[11] तेव्हा पाहा, अठरा वर्षे विकाराचा आत्मा लागलेली एक स्त्री तेथे होती; ती कुबडी असल्यामुळे तिला नीट उभे राहता येत नव्हते.**

**[12] येशूने तिला पाहून बोलावले व म्हटले, "बाई, तू आपल्या विकारापासून मुक्त झाली आहेस."**

**[13] त्याने तिच्यावर हात ठेवताच ती सरळ झाली व देवाचा महिमा वर्णू लागली.**

**[14] येशूने शब्बाथ दिवशी रोग बरा केला म्हणून सभास्थानाचा अधिकारी संतप्त होऊन लोकसमुदायाला म्हणाला, "ज्यांत काम केले पाहिजे असे सहा दिवस आहेत; तर त्या दिवसांत येऊन बरे होऊन जात जा, शब्बाथ दिवशी येऊ नका."**

**[15] परंतु प्रभूने त्याला उत्तर दिले, "अहो ढोंग्यांनो, तुमच्यापैकी प्रत्येक जण आपला बैल किंवा गाढव शब्बाथ दिवशी ठाणावरून सोडून पाण्यावर नेतो ना?**

**[16] ही तर अब्राहामाची कन्या आहे; पाहा, हिला सैतानाने अठरा वर्षे बांधून ठेवले होते; शब्बाथ दिवशी हिला ह्या बंधनापासून सोडवणे योग्य नव्हते काय?"**

या शास्त्रभागात उल्लेख केलेल्या स्त्रीला 18 वर्षांपासून पाठीमध्ये विकार होता. ती कुबडी असल्यामुळे तिला नीट उभे राहता येत नव्हते. सैतानाने तिला बंधनात कैद केले होते. या प्रकरणात विकाराच्या आत्म्याने हा विकार निर्माण केला होता. येशूने कशाप्रकारे तिची सेवा केली? तो शब्द बोलला आणि त्याने तिला स्पर्श केला. तो म्हणाला, *"बाई, तू आपल्या विकारापासून मुक्त झाली आहेस."* विकाराच्या आत्म्याद्वारे सैतानाने 18 वर्षे जे केले ते त्याच्या अधिकारवाणीच्या शब्दांद्वारे एका क्षणात नाहीसे झाले.

येशूचे विश्वासणारे म्हणून, साप आणि विंचू यांना तुडवण्याचा, आणि शत्रूच्या सर्व शक्तींवर, आपल्याला अधिकार देण्यात आला आहे (लूक 10:19). येशूचा अधिकार त्याच्या शरीराद्वारे, म्हणजेच तुमच्या आणि माझ्यासारख्या विश्वासणाऱ्यांनी बनलेल्या मंडळीद्वारे, व्यक्त केला जातो. आपण बोलतो त्या शब्दांनी अधिकार वापरला जातो. अधिकाराने, आपण लोकांना त्यांच्या बंधनातून मुक्त झाल्याचे घोषित करतो. व्यसनांमध्ये जखडलेल्यांना, “येशूच्या नावाने, तुमच्या व्यसनांपासून मुक्त व्हा” असे आपण घोषित करतो. जे भयाने ग्रासले आहेत त्यांना, “येशूच्या नावाने, या यातनादायक भीतीपासून मुक्त व्हा” असे आपण घोषित करतो. त्याच प्रकारे, आपण लोकांना इतर प्रकारच्या बंधनातून मुक्त करतो. अधिकाराचे शब्द बोला. लोकांना त्यांच्या बंधनातून मुक्ततेची घोषणा करा.

# 46
# अभिषिक्त शब्दांमध्ये पवित्र आत्म्याचे जीवन असते

**योहान 6:63**
**आत्मा हा जिवंत करणारा आहे, देहापासून काही लाभ नाही; मी जी वचने तुम्हांला सांगितली आहेत ती आत्मा व जीवन अशी आहेत.**

**योहान 6:63 (गुड न्यूज भाषांतर)**
**फक्त देवाचा आत्माच सार्वकालिक जीवन देतो; मानवी शक्ती अजिबात कामाची नाही. मी जी वचने तुम्हाला सांगितली आहेत, ती देवाचा जीवनदायी आत्मा तुम्हापर्यंत आणतात.**

येशूने नुकतेच त्याच्यामध्ये राहणे, त्याचा देह खाणे आणि त्याचे रक्त पिणे याविषयी त्याच्या शिष्यांसोबत बोलणे पूर्ण केले होते. आणि मग त्यांना हे कळावे की तो शाब्दिक, नैसर्गिक गोष्टींबद्दल बोलत नव्हता, त्यासाठी त्याने हे स्पष्ट केले की पवित्र आत्माच आपल्याला जीवन देतो (परमेश्वरासमान असणारे जीवन). देह (नैसर्गिक) हे करू शकत नाही. मग त्याने त्याच्या शब्दांकडे लक्ष वेधले. जे शब्द तो बोलला ते आत्मा, आध्यात्मिक किंवा पवित्र आत्म्याचे होते, आणि त्यांना देवाच्या आत्म्याचे जीवन त्याच्या शब्दांद्वारे प्राप्त होते. येशू पवित्र आत्म्याद्वारे अभिषिक्त होता. तो बोलत असताना, त्याच्या शब्दांद्वारे त्याच्या श्रोत्यांना पवित्र आत्म्याचे जीवन प्राप्त झाले.

आपण पवित्र आत्म्याने अभिषिक्त केले गेले आहोत (2 करिंथ 1:21). आपल्याद्वारे त्याचा अभिषेक कार्यरत असून, आपण जे शब्द बोलतो ते देव त्याच्या पवित्र आत्म्याच्या जीवनाचे वाहक म्हणून वापरतो. म्हणून, जेव्हा आपण अभिषेकाने भरून किंवा आत्म्याच्या प्रेरणेने

बोलतो, तेव्हा त्या शब्दांमुळे अलौकिक गोष्टी घडतात. ते लोकांसाठी देवाचे जीवन मोकळे करतात. स्थिती आणि परिस्थितींमध्ये ते देवाचे सामर्थ्य मोकळे करतात. आपल्या क्षेत्रात देवाला जे कार्य करावयाचे आहे, हे शब्द त्यासाठीचे वाहन आहे. आत्मा तुम्हाला प्रेरित करतो त्याप्रमाणे धैर्याने बोला, हे जाणून की अभिषिक्त शब्दांमध्ये पवित्र आत्म्याचे जीवन असते.

# 47
# विश्वासाने आज्ञा करा

**योहान 11:40-43**

**40 येशूने तिला म्हटले, "तू विश्वास ठेवशील तर देवाचा गौरव पाहशील असे मी तुला सांगितले नव्हते काय?"**

**41 ह्यावरून [मृताला ठेवले होते तेथून] त्यांनी धोंड काढली; तेव्हा येशूने दृष्टी वर करून म्हटले, "हे बापा, तू माझे ऐकलेस म्हणून मी तुझे आभार मानतो.**

**42 मला माहीत आहे की, तू सर्वदा माझे ऐकतोस, तरी जो लोकसमुदाय सभोवती उभा आहे त्याच्याकरता मी बोललो; ह्यासाठी की, तू मला पाठवले आहेस असा त्यांनी विश्वास धरावा."**

**43 असे बोलून त्याने मोठ्याने हाक मारून म्हटले, "लाजरा, बाहेर ये."**

मृत्यू पावून चार दिवस झालेल्या लाजराच्या थडग्यासमोर उभे असताना प्रभु येशूने मार्थाला आश्वासन दिले की जर तिने विश्वास ठेवला तर ती देवाचे गौरव पाहिल. त्याची प्रार्थना आधीच ऐकल्याबद्दल त्याने पित्याचे आभार मानले. आणि मग येशूने आज्ञेचे शब्द उच्चारले, *"लाजरा, बाहेर ये."*

येशूने पित्याकडे प्रार्थना केली होती. त्याची प्रार्थना ऐकण्यात आली आहे हे त्याला ठाऊक होते. परंतु अपेक्षित परिणाम घडून येण्यासाठी त्याने नैसर्गिक क्षेत्रात आज्ञांचे शब्द देखील बोलले. आपला हा विश्वास आहे की आपण देवाचे गौरव पाहणार आहोत, देवाची पराक्रमी कृत्ये आपल्यासमोर प्रदर्शित होणार आहेत. येशूप्रमाणे, आपणही विश्वासाने प्रार्थना केली पाहिजे. आणि येशूप्रमाणेच, आपण विश्वासाने आज्ञायुक्त शब्द देखील बोलले पाहिजेत.

तुम्ही कोणत्या गोष्टींसाठी देवावर विश्वास ठेवत आहात? कधी

कधी, लाजरप्रमाणे, आपण ज्या गोष्टीची अपेक्षा करतो की ती देवाने करावी, ती गोष्ट थडग्यात मृतावस्थेत पडून असू शकते. वेळ निघून गेली आहे. जरा उशीर झालेला दिसतोय. पण देवाचे अभिवचन स्पष्ट आहे. जर आपण विश्वास ठेवला तर आपण देवाचे गौरव पाहू. आपण देवाची पराक्रमी कृत्ये पाहू. आपण विश्वासाच्या प्रार्थना केल्या पाहिजे. आणि आपण विश्वासाने आज्ञा दिली पाहिजे. तुमचा विश्वास धैर्याने बोला. तुमच्या “लाजराला” बाहेर येण्याची आज्ञा करा!

# 48

# वचन तुम्हाला तुमच्या वतनात आणते

**प्रेषितांची कृत्ये 20:32**
**आता बंधूंनो, मी तुम्हांला प्रभूकडे व त्याच्या कृपेच्या वचनाकडे सोपवतो; तो तुमची वाढ करण्यास व पवित्र केलेल्या सर्व लोकांमध्ये तुम्हांला वतन देण्यास समर्थ आहे.**

प्रेषित पौल हे स्पष्ट करतो की देवाचे वचन आपली वाढ करते आणि येशू ख्रिस्तामध्ये पवित्र केलेल्या सर्व लोकांना त्यांच्या वतनात चालण्यास (ताबा घेण्यास) सक्षम करते. अर्थातच, आपल्या वतनात चालण्याची इच्छा आपल्या सर्वांनाच असते. तारण पावलेल्या त्याच्या पुत्र आणि कन्या म्हणून, देवाने आपल्यासाठी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात, प्रदान केलेल्या सर्व गोष्टींचा, आपल्याला आनंद घ्यायचा आहे. परंतु आपल्या अंतरंगात आपली वाढ होण्यासाठी हेतुपुरस्सर देवाच्या वचनाशी आपण संलग्न असले पाहिजे जेणेकरुन आपल्याला देवाने आपल्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या पुरवठ्यामध्ये आणि विशेषाधिकारांमध्ये चालता येईल.

आपल्याला वचनासोबत सुसंगत होता येईल यासाठी अनेक मार्ग आहेत. आपण त्याचे वचन वाचले पाहिजे, त्याच्या वचनातुन प्रकाश प्राप्त केला पाहिजे, त्याच्या वचनावर मनन केले पाहिजे, त्याचे वचन आपल्यामध्ये राहू (वस्ती करू) द्यावे आणि त्याच्या वचनाचे पालन केले पाहिजे. रोमकरांस पत्र 10:17 आपल्याला सांगते त्याप्रमाणे त्याचे वचन आपल्या अंतःकरणात विश्वास निर्माण करते. आणि, या संपूर्ण पुस्तकात आपण बघत आलो आहोत त्याप्रमाणे, देवाच्या वचनावर असलेला आपला विश्वास आपण जाहीर केला पाहिजे. असे केल्यामुळे आपण देवाच्या वचनाशी सुसंगत होतो. आपल्या वतनामध्ये चालण्याची

एक गुरुकिल्ली म्हणजे आपल्या जीवनावर देवाचे वचन जाहीर करणे. अर्थातच, आपण हे कोणते निरर्थक पठण किंवा कोणता पोकळ विधी म्हणून करीत नाही. आपण देव आणि त्याच्या वचनावर विश्वास ठेवून त्याचे वचन बोलतो. आणि जेव्हा आपण असे करतो, तेव्हा आपल्या वतनामध्ये चालण्यासाठी त्याच्या वचनाद्वारे आपली वाढ होते. देवावर आणि त्याच्या वचनावर तुमचा विश्वास जाहीर करा.

# 49

# मला सांगितल्यानुसार घडणार असा माझा विश्वास आहे

**प्रेषितांची कृत्ये 27:23-25**

**23 कारण ज्याचा मी आहे व ज्याची मी सेवा करतो त्या देवाचा दूत गेल्या रात्री माझ्याजवळ उभा राहून म्हणाला,**
**24 'पौला, भिऊ नकोस; तुला कैसरापुढे उभे राहिले पाहिजे; आणि पाहा, तुझ्याबरोबर जे तारवातून चालले आहेत ते सर्व देवाने तुला दिले आहेत.'**
**25 म्हणून गृहस्थांनो, धैर्य धरा; माझा देवावर भरवसा आहे की त्याने मला जसे कळवले तसेच घडेल.**

परमेश्वरापासून एका देवदूताने पौलासाठी संदेश आणला होता. आणि पौलाने परमेश्वरावरच्या त्याच्या विश्वासाची घोषणा करीत धैर्याने म्हटले की देवदूताने त्याला जसे कळवले तसेच घडून येईल.

आपल्याकडे देवाचे लिखित वचन, पवित्र शास्त्र आहे, जे देवदूतांच्या शब्दापेक्षाही निश्चित वचन आहे. देवाने आपल्याला जे सांगितले आहे ते त्याच्या लिखित वचनातून आपण घेऊ शकतो, त्याने सांगितलेल्या गोष्टी त्याने ख्रिस्तामध्ये आपल्यासाठी आधीच पूर्ण केल्या आहेत, ज्या गोष्टी त्याने आपल्यासाठी या जीवनात करण्याचे अभिवचन दिले आहे, आणि ते घेऊन त्याने जे सांगितले आहे त्यावर आपला विश्वास जाहीर करू शकतो. देवाने त्याच्या पवित्र वचनात सांगितल्याप्रमाणे गोष्टी घडतील असा तुमचा विश्वास आहे हे धैर्याने घोषित करा. तुमच्या वर्तमानातील आणि भविष्यातील प्रत्येक गोष्ट देवाने बोललेल्या गोष्टींशी जुळून येतील.

आणि मग, असे काही प्रसंग पण असतात जेव्हा देव त्याच्या

पवित्र आत्म्याद्वारे आपल्याशी एकतर आत्म्याच्या अंतर्गत साक्षीद्वारे, भविष्यवाणीद्वारे, स्वप्ने आणि दृष्टान्तांद्वारे इ. आपल्याशी बोलेल. एकदा तपासणी केल्यानंतर आपल्याला खात्री पटली की पवित्र आत्म्याने खरोखरच आमच्यासाठी तो विशिष्ट शब्द बोलला आहे, तर मग आपण ते धैर्याने घोषित करू शकतो की आम्हाला विश्वास आहे की जसे आम्हाला कळवले गेले आहे तसेच घडून येईल.

धैर्याने घोषित करा, "मी देवावर विश्वास ठेवतो."

माझा विश्वास आहे की देवाने माझ्याबद्दल त्याच्या वचनात सांगितल्याप्रमाणेच घडून येईल.

# 50
# अस्तित्वात नसलेल्या गोष्टींना असल्यासारखी आज्ञा करा

**रोमकरांस पत्र 4:17**

**“मी तुला पुष्कळ राष्ट्रांचा बाप केले आहे” असे अब्राहामाविषयी शास्त्रात जे लिहिलेले आहे — त्याप्रमाणे तो आपल्या सर्वांचा बाप आहे. ज्या देवावर त्याने विश्वास ठेवला, जो देव मेलेल्यांना जिवंत करतो व जे अस्तित्वात नाही त्याला ते असल्यासारखी आज्ञा करतो, त्याच्या दृष्टीने तो असा आहे.**

प्रेषित पौल, पवित्र आत्म्याद्वारे, अब्राहामाच्या विश्वासाच्या वाटचालीबद्दल अंतर्दृष्टी प्रकट करतो. अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला. देवाची योजना पृथ्वीवर पूर्ण होण्यासाठी अब्राहामाने विश्वासाद्वारे देवाशी भागीदारी केली. अब्राहामाने ज्या देवावर विश्वास ठेवला आणि भागीदारी केली, तो असा देव आहे जो मेलेल्यांना जिवंत करतो व जे अस्तित्वात नाही त्याला ते असल्यासारखी आज्ञा करतो. अब्राहामाला विश्वास ठेवावा लागला की जे मेलेले दिसत होते ते जिवंत केले जाईल, विशेषत: त्यांचे निर्जीव झालेले शरीर आणि व साराच्या गर्भाशयाचे निर्जीवपण. आणि अब्राहामाला जे अस्तित्वात नाही त्याला ते असल्यासारखी आज्ञा करणे शिकावे लागले. देवाने प्रथम तसे केले. अब्राहामाला मूल नसतानाही, देव अब्राहामाबद्दल बोलला आणि म्हणाला की त्याने अब्राहामाला पुष्कळ राष्ट्रांचा बाप केले आहे. आणि मग देवाने अब्राम आणि साराय यांची नावे बदलून अब्राहाम आणि सारा अशी केली, परिणामस्वरूप, त्यांना, जे अस्तित्वात नव्हते त्याला असल्यासारखी आज्ञा देण्यास लावले.

विश्वास हे मालकी पत्रक आहे, अपेक्षित किंवा इच्छित गोष्टींच्या

मालकीचा पुरावा. विश्वास म्हणजे खात्री, अद्याप न दिसणाऱ्या गोष्टींची खात्री, भौतिक इंद्रियांना अद्याप प्रकट न झालेल्या गोष्टी. या प्रकारचा विश्वास, जेव्हा तो जाहीर केला जातो, तेव्हा गोष्टींना त्यांच्या नैसर्गिक स्थितीत आहेत त्याप्रमाणे नाही, तर अध्यात्मिक स्थितीत आहेत त्याप्रमाणे पुकारतो. या प्रकारचा विश्वास अस्तित्वात नसलेल्या गोष्टींना असल्यासारखी आज्ञा करतो. विश्वास म्हणजे ही खात्री आहे की एकदा देव जे काही बोलला की ते पूर्ण होते. तुमचा विश्वास जाहीर करा. ज्या गोष्टी अद्याप नैसर्गिक स्थितीत नाहीत त्यांना असल्यासारखी आज्ञा करा कारण देव बोलला आहे.

# 51

# देवाने दिलेल्या अभिवचनानुसार बोला

**रोमकरांस पत्र 4:18-21**

**18 "तशी तुझी संतती होईल," ह्या वचनाप्रमाणे त्याने 'बहुत राष्ट्रांचा बाप' व्हावे म्हणून आशेला जागा नसताही त्याने आशेने विश्वास ठेवला.**

**19 तथापि विश्वासाने दुर्बळ न होता, आपले निर्जीव झालेले शरीर (तो सुमारे शंभर वर्षांचा होता) व सारा हिच्या गर्भाशयाचे निर्जीवपण ही त्याने लक्षात घेतली;**

**20 परंतु देवाच्या अभिवचनाकडे पाहून तो अविश्वासामुळे डळमळला नाही, तर विश्वासाने सबळ होऊन त्याने देवाचा गौरव केला;**

**21 आणि देव आपण दिलेले अभिवचन पूर्ण करण्यासही समर्थ आहे अशी त्याची पक्की खात्री होती.**

प्रेषित पौलाद्वारे पवित्र आत्मा हे प्रकट करतो की देवाने जे अभिवचन दिले होते ते प्राप्त करण्यासाठी अब्राहाम देवावरील विश्वासाने कसा चालला. आशेला जागा नसताही अब्राहामाने आशेने विश्वास ठेवला. त्याचा काय विश्वास होता? देवाने त्याच्याबद्दल जे सांगितले होते तेच तो होईल असा त्याचा विश्वास होता. जरी त्याची व साराची शारीरिक वास्तविक दशा त्यांची वस्तुस्थिती होती, त्याने त्याच्या वस्तुस्थितीला त्याच्या विश्वासावर प्रभावित होऊ दिले नाही. त्याला देवाचे वचन प्राप्त झाले होते. देव त्याच्या परिस्थितीबद्दल बोलला होता आणि देवाचा तो शब्द त्याच्या जीवनातील अंतिम अधिकार होता. अब्राहामाचा विश्वास देवाने जे अभिवचन दिले होते त्यावर आधारित होता आणि ह्यावर की देव ते अभिवचन पूर्ण करण्यास सक्षम आहे. जीवनातील प्रत्येक गोष्ट—जो विश्वास त्याने ठेवला, त्याने जे काही केले आणि तो जे काही बोलला—ते सर्व देवाने जे बोलले होते त्याला सुसंगत होते व त्यानुसारच होते. देवाने जे सांगितले आहे

त्यानुसार विश्वास बोलतो.

अनेकदा आपल्या स्वतःच्या जीवनात, आपली वर्तमान परिस्थिती पवित्र शास्त्रात आपल्यासाठी लिहिलेल्या किंवा अभिवचन दिलेल्या गोष्टींच्या विपरीत असू शकते. देवाचे वचन काहीतरी अभिवचन देते आणि आपले अनुभव कदाचित याच्या अगदी विरुद्ध असतील. देवाचे वचन घोषित करते की देव 'यहोवा राफा' आहे आणि शरीर आजाराने ग्रासलेले असू शकते. देवाचे वचन घोषित करते की तुम्ही जे काही कराल ते यशस्वी होईल, परंतु अलीकडचे अनुभव अपयशांनी भरलेले असू शकतात. देवाचे वचन विजयाचे अभिवचन देते, परंतु पराभवाची अनेक क्षेत्रे असू शकतात. आपण काय केले पाहिजे? आपण आपला अनुभव ही देवाची इच्छा म्हणून स्वीकारावा, की आपण आपल्या जीवनासाठी देवाची इच्छा म्हणून देवाचे वचन स्वीकारावे?

अब्राहामाच्या विश्वासाच्या पावलांवर पाऊल टाकण्यासाठी आम्हाला बोलावले गेले आहे. आशेला जागा नसताही आपण आशेने देवावर आणि त्याच्या वचनावर विश्वास ठेवला पाहिजे. वस्तुस्थितींमुळे तुमचा विश्वास कमकुवत होऊ देऊ नका. देवाच्या वचनावर तुमचा विश्वास प्रस्थापित करा. विश्वास देवाच्या अभिवचनानुसार बोलतो. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 52
# जीवनात राज्य करा – प्रभुत्वाचे शब्द बोला

**रोमकरांस पत्र 5:17**
**कारण जर त्या एकाच इसमाच्या द्वारे, त्या एकाच इसमाच्या अपराधाने मरणाचे राज्य चालू झाले, तर जे कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता स्वीकारतात, ते विशेषेकरून त्या एकाच येशू ख्रिस्ताच्या द्वारे जीवनात राज्य करतील.**

ज्या गोष्टींमध्ये आदामाने आपल्याला खाली नेले त्या सर्वांतून प्रभू येशूने आपल्याला बाहेर काढले आहे. कृपेचे व नीतिमत्त्वाचे दान ह्याची विपुलता आपल्याला प्राप्त झाली आहे. देवाने आपल्या जीवनावर त्याची कृपा केली आहे. ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे त्याने आपल्याला त्याचे स्वतःचे नीतिमत्वाचे दान दिले आहे. पूर्वी आम्ही पापी असे होतो. पण आता चित्र वेगळं आहे. येशूच्या ठायी आपण देवाचे नीतिमत्व आहोत. आपल्याला देवाची विपुल कृपा प्राप्त झाली आहे. कृपा म्हणजे देव आपल्याला ते देतो ज्यासाठी आपण पात्र नाही किंवा जे आपण स्वतः कधीही कमवू शकत नाही. देवाच्या कृपेने आपल्याला जे दिले गेले आहे तेच खरोखर आपले आहे. ते आपल्याकडे आहे. त्याचा आनंद घेण्यासाठी, त्याद्वारे जगण्यासाठी आणि आपल्या स्वतःचे म्हणून देवाने ते आपल्याला दिले आहे.

देवाने त्याच्या कृपेने आपल्याला मुक्तपणे दिलेल्या अनेक गोष्टींपैकी एक म्हणजे त्याने आपल्याला येशू ख्रिस्ताद्वारे जीवनात राजांप्रमाणे जगण्यासाठी आणि राज्य करण्यासाठी स्थापित केले आहे. येशूद्वारे, म्हणजे, त्याच्यामुळे आणि त्याने प्रदान केलेल्या अधिकाराद्वारे, आपल्याला जीवनात राज्य आणि प्रभुत्व करायचे आहे. हे सत्य समजून घ्या. तुम्ही आध्यात्मिक अधिकार आणि प्रभुत्व असलेली व्यक्ती

आहात. ह्याचा वापर केला नाही तर याचा काही उपयोग राहणार नाही. राजे काय करतात? त्यांच्या शब्दांद्वारे राजे अधिकार आणि प्रभुत्वाचा वापर करतात. ते शब्द बोलतात, ते हुकूम करतात जेणेकरुन त्यांनी काढलेल्या फर्मानाची अंमलबजावणी त्यांच्या प्रभावक्षेत्रात केली जाते.

पतनामुळे आलेल्या सर्व गोष्टी जसे की पाप, सैतान व त्याचे दुरात्मे, आजारपण, दारिद्रय, सैतानी बंधने इत्यादींसह आदामाने आपल्याला पारतंत्राच्या स्वाधीन केले. आदामाने आपल्याला ज्या सर्व पारतंत्र्यात नेले त्या सर्व गोष्टींमधून प्रभू येशूने आपल्याला बाहेर आणले व आता त्या सर्वांवर जीवनात राज्य आणि प्रभुत्व करण्यासाठी स्थापित केले आहे. परंतु जर आपण आपले प्रभुत्व वापरत नाही तर आपल्याला ते कधीच अनुभवता येणार नाही. प्रभुत्वाचे शब्द बोला. फर्मान जारी करा. वचनाची घोषणा करा. तुमचा विश्वास जाहीर करा आणि तुमच्या प्रभावक्षेत्रातील प्रत्येक गोष्टीवर देवाच्या राज्याच्या सत्याने राज्य आणि शासित होऊ द्या.

# 53
# विश्वास अशा प्रकारे बोलतो

**रोमकरांस पत्र 10:6-8**

**6 परंतु विश्वासाने प्राप्त होणारे नीतिमत्त्व म्हणते, "तू आपल्या मनात म्हणू नकोस की, उर्ध्वलोकी कोण चढेल?" (अर्थात ख्रिस्ताला खाली आणण्यास).**

**7 किंवा "अधोलोकी कोण उतरेल?" (अर्थात ख्रिस्ताला मेलेल्यांतून वर आणण्यास).**

**8 तर ते काय म्हणते? "ते वचन तुझ्याजवळ आहे, तुझ्या मुखात व तुझ्या अंतःकरणात आहे"; (आमच्या विश्वासाचा विषय असलेले जे वचन आम्ही गाजवत आहोत) ते हेच आहे.**

प्रेषित पौलाने रोमकरांस पत्राच्या 4 थ्या अध्यायात उल्लेख केला आहे की अब्राहामाने देवावर विश्वास ठेवला आणि ते त्याला नीतिमत्त्व असे गणण्यात आले. त्याने हे देखील स्थापित केले आहे की ख्रिस्तामध्ये आपल्याला विपुल कृपा प्राप्त झाली आहे आणि देवाने आपल्याला नीतिमत्वाचे दान दिले आहे. आता जेव्हा आपण देवाबरोबर योग्य स्थितीत आहोत, तर मग देवावरील विश्वास कसा व्यक्त होतो? आम्ही विश्वासाचे आणि नीतिमत्वाचे लोक कशा प्रकारे बोलतो?

निराशा आणि हताशा आपण बोलत नाही. आपण अशाप्रकारे देखील बोलत नाही की देव वर स्वर्गात इतका दूर आहे की तो आपल्याला सहाय्य करू शकत नाही. देव मेलेला आहे आणि आपल्याला सहाय्य करण्यास शक्तीहीन आहे असेही आपण बोलत नाही. त्याऐवजी, प्रेषित पौल आपल्यासाठी, जे आपण नवीन करारातील विश्वासणारे आहोत, जुन्या करारातील सत्य लागू करतो. तो आपल्याला तेच सांगत आहे जे मोशेने देवाच्या लोकांना अनुवाद 30:11-14 मध्ये सांगितले होते. वचन तुमच्या जवळ आहे. देवाने सांगितलेले वचन तुमच्या

मुखात आणि तुमच्या अंतःकरणात आहे. येथे स्पष्ट निष्कर्ष असा आहे की त्या वचनावर तुम्ही विश्वास ठेवावा म्हणून ते तुमच्या अंतःकरणात, आणि गाजवले जावे म्हणून तुमच्या मुखात आहे. त्यानंतर तो त्याला विश्वासाच्या वचनाशी, येशूच्या शुभवर्तमानाचा संदेश ज्याचा प्रचार आपण करतो त्याच्याशी लागू करतो.

आपल्याला समजावे असे महत्त्वाचे सत्य येथे हे आहे की विश्वास बोलतो. देवाचे वचन, जे सतत आपल्या अंतःकरणात आणि मुखात असले पाहिजे, ते विश्वास बोलतो. कधीही निराशाजनक गोष्टी बोलू नका. हताशेच्या गोष्टी कधीही बोलू नका. देवाच्या वचनावर तुम्ही विश्वास ठेवावा म्हणून ते तुमच्या अंतःकरणात आहे, आणि तुम्ही ते गाजवावे म्हणून ते तुमच्या मुखात आहे. वचन बोला. देवाच्या वचनावर तुमचा विश्वास जाहीर करा.

# 54

# कबुलीद्वारे तारणप्राप्ती होते

**रोमकरांस पत्र 10:6-10**

**6 परंतु विश्वासाने प्राप्त होणारे नीतिमत्त्व म्हणते, “तू आपल्या मनात म्हणू नकोस की, उर्ध्वलोकी कोण चढेल?” (अर्थात ख्रिस्ताला खाली आणण्यास).**

**7 किंवा “अधोलोकी कोण उतरेल?” (अर्थात ख्रिस्ताला मेलेल्यांतून वर आणण्यास).**

**8 तर ते काय म्हणते? “ते वचन तुझ्याजवळ आहे, तुझ्या मुखात व तुझ्या अंतःकरणात आहे”; (आमच्या विश्वासाचा विषय असलेले जे वचन आम्ही गाजवत आहोत) ते हेच आहे**

**9 की, येशू प्रभू आहे असे जर ‘तू आपल्या मुखाने’ कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठवले असा ‘आपल्या अंत:करणात’ विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल.**

**10 कारण जो अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो व जो मुखाने कबूल करतो त्याचे तारण होते.**

आणखी एक सत्य जे आपण या शास्त्रभागात अधोरेखित केले पाहिजे ते म्हणजे विश्वास ठेवण्याचे आणि कबूल करण्याचे महत्त्व. आपल्या अंतःकरणात देवाच्या वचनावर विश्वास ठेवल्याने आपण देवाबरोबर योग्य स्थितीत येतो (“अंत:करणाने विश्वास ठेवतो तो नीतिमान ठरतो”). देवापासून प्राप्त करण्यासाठी आपण योग्य ठिकाणी, स्थितीत आहोत. आणि मग पवित्र शास्त्र आपल्याला दुसरे पाऊल उचलण्याची सूचना देते. आम्हाला मुखाने कबूल करण्याची सूचना दिली जाते, ज्यामुळे आपल्याला तारण प्राप्त होते किंवा त्याचा अनुभव येतो (“तारणप्राप्तीसाठी कबुली  केली जाते”).

प्रभू येशू ख्रिस्ताने वधस्तंभावरील त्याच्या मृत्यूद्वारे आणि मेलेल्यांतून पुनरुत्थानाद्वारे नीतिमत्व आणि तारण आपल्यासाठी दान

म्हणून उपलब्ध करून दिले आहे. ग्रहण करणाऱ्या प्रत्येकासाठी ते उपलब्ध आहे. तारण उपलब्ध करून देण्यात आले आहे, परंतु ते प्राप्त करण्यासाठी आपल्याला विश्वास ठेवायचा आहे आणि कबुली द्यायची आहे. कबुलीचे महत्त्व लक्षात घ्या. जेव्हा आपण विश्वास ठेवतो, तेव्हा आपण प्राप्त करण्याच्या स्थितीत येतो. पण कबुलीद्वारे आपल्याला तारणाची प्राप्ती होते.

तारण, जसे आपल्याला नवीन करारातुन लक्षात येते, एक सर्वसमावेशक शब्द आहे ज्यामध्ये सार्वकालिक जीवन, पापांची क्षमा, पापावर विजय, आजारातून बरे होणे, संघर्षात विजय, शत्रूच्या प्रत्येक दुष्कृत्यांतून सुटका, हानीपासून बचाव, धोक्यापासून संरक्षण आणि संपूर्णता यांचा समावेश होतो. याचा अर्थ तारले जाणे, रोगमुक्त होणे, सोडवले जाणे, विजय मिळवणे, वाचविले जाणे, संरक्षण होणे आणि पूर्ण केले जाणे. देवाच्या वचनावर विश्वास ठेवणे आणि देवाच्या वचनाची कबुली दिल्याने यापैकी प्रत्येक गोष्टीचा अनुभव आपण करू शकतो. तुमचा विश्वास जाहीर करा कारण कबुलीद्वारे तारणप्राप्ती होते.

# 55
# त्याची सर्व अभिवचने "होय आणि आमेन" म्हणत घोषित करा

**2 करिंथ. 1:19,20**

**[19] कारण देवाचा पुत्र येशू ख्रिस्त ह्याची घोषणा आमच्याकडून म्हणजे मी, सिल्वान व तीमथ्य ह्यांच्याकडून तुमच्यामध्ये झाली ती होय, नाही, अशी नव्हती, तर त्याच्या ठायी होय अशीच होती.**

**[20] देवाची वचने कितीही असोत, त्याच्या ठायी होय हे आहे; म्हणून आम्ही देवाच्या गौरवाला त्याच्या द्वारे आमेन म्हणतो.**

बहुतेक वेळा आपण लोकांना असे सांगताना ऐकले असेल की देव आपल्यासोबत असतो आणि काही वेळा त्याची उपस्थिती जाणवत नाही. आपल्याला सुनिश्चितपणे माहित नाही. लोक आपल्याला सांगतात की कधी कधी देवाची अभिवचने पूर्ण होतात आणि कधी ती पूर्ण होत नाहीत. त्या सर्व लोकांकडे पहा ज्यांनी देवावर विश्वास ठेवला आणि तरीही अपयशी झाले, किंवा मरण पावले किंवा त्यांनी आपत्ती अनुभवली. हे सर्व तथ्य आणि सत्य असले तरी, लोकांच्या अनुभवांमुळे देव कोण आहे किंवा देवाचे वचन काय म्हणते हे बदलण्याचा अधिकार आपल्याला आहे का? देव आणि त्याच्या वचनापेक्षा अनुभव अधिक विश्वसनीय आहेत का? आपण आपले ईश्वरविज्ञान लोकांच्या अनुभवावर आधारित ठेवतो, कि, देव आणि त्याच्या वचनावर आपले ईश्वरविज्ञान आधारित ठेवतो?

प्रेषित पौल स्पष्ट करतो की देव चंचल नाही जसे काही जणांना वाटते. येशूमध्ये, "होय" आणि "नाही" नाही, परंतु नेहमी आणि निश्चित "होय" अशीच आहे. देवामध्ये कसलेच कपट नाही, तो दुतोंड्या नाही,

चंचल नाही आणि तो कधीही बदलत नाही (याकोब 1:17, मेसेज बायबल आणि पॅशन भाषांतरावर आधारित). प्रेषित पौल धैर्याने घोषित करतो की येशूमध्ये देवाची सर्व अभिवचने “होय” अशीच आहेत. देवाची सर्व अभिवचने खरी आणि विश्वासू आहेत आणि त्यांची पूर्णता येशूमध्ये आढळते. आणि म्हणून आपण देवाच्या गौरवाला त्याच्या द्वारे “आमेन” म्हणतो.

येशूमध्ये देवाची सर्व अभिवचने “होय आणि आमेन” अशीच आहेत. आपण हीच अपेक्षा बाळगली पाहिजे. येशूमध्ये देवाच्या सर्व अभिवचनांची पूर्तता आपण पाहणार आहोत जेणेकरून आपल्या जीवनातून देवाला गौरव प्राप्त होईल. या सत्यात दृढ व्हा, की येशूमध्ये, देवाची सर्व अभिवचने खरी आहेत. ती ‘होय’ अशीच आहेत. देवाच्या सर्व वचनांवर तुमचा विश्वास जाहीर करा. देवाच्या सर्व अभिवचनांना तुमचा ‘होय आणि आमेन’ घोषित करा आणि ते पूर्ण झालेले पाहण्याची तुमची अपेक्षा आहे हे दिसू द्या.

# 56
# आम्ही विश्वास धरतो आणि त्यामुळे आम्ही तो बोलतोही

**2 करिंथ 4:13,14**
**13 ‘मी विश्वास धरला म्हणून बोललो,’ ह्या शास्त्रलेखानुसार जो विश्वासाचा आत्मा तोच आत्मा आमच्या ठायी असल्यामुळे आम्ही विश्वास धरतो आणि त्यामुळे बोलतोही.**
**14 हे आम्हांला ठाऊक आहे की, ज्याने प्रभू येशूला उठवले तो येशूबरोबर आम्हांलाही उठवील व तुमच्याबरोबर सादर करील.**

प्रेषित पौलाने येथे स्तोत्र 116:10 उद्‌त केले आहे. खरं तर, प्रेषित पौल, पवित्र आत्म्याच्या प्रेरणेने, त्या वचनाचा फक्त एक भाग उद्‌त करतो, कदाचित एका विशिष्ट सत्यावर जोर देण्यासाठी जे तो विश्वासणाऱ्यांना सांगू इच्छितो. आपण जो विश्वास धरतो त्यानुसार बोलतो. आपण आपला विश्वास जाहीर केला पाहिजे. विश्वास बोलतो. दोन्ही करारांमध्ये “विश्वासाचा आत्मा” बदललेला दिसत नाही. जुन्या करारातील लोकांद्वारे असो किंवा नवीन करारातील लोकांद्वारे असो, देवावरील विश्वासाचा सार बदललेला नाही. विश्वासाचे तत्व अजूनही तेच आहे आणि ते हे आहे – माझा विश्वास आहे आणि मी विश्वासाने बोलतो, किंवा सोप्या शब्दांत असे म्हणता येईल, विश्वास बोलतो.

आम्ही विश्वास धरला आणि त्यामुळे तो विश्वास बोलतो. आमचा विश्वास आहे आणि आम्ही आमचा विश्वास बोलतो. संपूर्ण पवित्र शास्त्रात विश्वासाचे हे मूलभूत तत्त्व आहे. जो विश्वास आपण करतो तो बोलला गेलाच पाहिजे. विश्वास बोलला गेला पाहिजे. आम्ही देव व त्याच्या वचनावर विश्वास ठेवतो. मग आपण त्यानुसारच बोलायला हवे.

देव कोण आहे व त्याने आपल्याला काय अभिवचन दिले आहे याबद्दल आपण आपला विश्वास जाहीर करतो.

आम्ही येशूवर विश्वास ठेवतो आणि तसेच वधस्तंभावरील त्याचा मृत्यू, त्याचे पुनरुत्थान, स्वर्गारोहण आणि गौरविले जाणे याद्वारे त्याने आपल्यासाठी जे साध्य केले आहे त्यावरही विश्वास ठेवतो. म्हणून आम्ही ते बोलतो आणि घोषित करतो. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 57
# कृपायुक्त सेवा देण्यासाठी आपल्या शब्दांचा वापर करा

**इफिसकरांस पत्र 4:29**
**तुमच्या मुखातून कसलेच कुजके भाषण न निघो, पण गरजेप्रमाणे उन्नतीकरता जे चांगले तेच मात्र निघो, ह्यासाठी की, तेणेकडून ऐकणाऱ्यांना कृपादान प्राप्त व्हावे.**

शब्द त्यांच्या श्रोत्यांना काहीतरी देतात. भ्रष्ट (वाईट, कुजलेले, निरर्थक) शब्द भ्रष्टाचार देतात (त्या गोष्टी ज्यांचा काहीच फायदा होत नाही). चांगले शब्द बळ, कृपा आणि संपूर्णता देतात.

शब्द हे पात्र आहेत. शब्द वाहक असतात. शब्द हे ट्रान्समीटर प्रमाणे आहेत. शब्द "सेवक" आहेत. ते प्राप्तकर्त्यांच्या जीवनात काहीतरी करतात. ते आशीर्वाद देऊ शकतात, उभारू शकतात आणि मजबूत करू शकतात. किंवा ते विध्वंस करू शकतात, अशक्त करू शकतात, दुखवू शकतात आणि नासधूस करू शकतात.

विश्वासणारे म्हणून, आपण असे शब्द बोलले पाहिजेत जे विश्वासाने भरलेले आहेत व इतरांचा देखील विश्वास वाढवतात. विश्वासाने भरलेले शब्द बोला जेणेकरुन आपले ऐकणाऱ्यांमध्ये विश्वास निर्माण होईल, त्यांना प्रेरणा मिळेल आणि त्यांच्यामध्ये जागृती येईल. आपण सुज्ञानाचे शब्द बोलले पाहिजेत. आपल्याला सहाय्य करणारे, पालनपोषण करणारे, मार्गदर्शन करणारे आणि आशीर्वाद देणारे शब्द बोलले पाहिजेत. तुमचे शब्द हुशारीने वापरा. लोकांना आशीर्वाद देण्यासाठी ते वापरा. इतरांना आशीर्वादित करण्यासाठी तुमचा विश्वास जाहीर करा.

# 58
# आत्म्याची तलवार वापरा

**इफिसकरांस पत्र 6:17**
**तारणाचे शिरस्त्राण व आत्म्याची तलवार म्हणजे देवाचे वचन, ही घ्या.**

प्रेषित पौलाने इफिसकरांस पत्र 6:12 मध्ये नमूद केल्याप्रमाणे आपण आध्यात्मिक संघर्षाच्या मध्यभागी आहोत. शत्रूचा पराभव झाला आहे, आणि तरीही, उरलेल्या वेळेमध्ये, तो अजूनही त्याच्या गनिमी डावपेजांचा वापर करतो. विश्वासणारे म्हणून, देवाने आपल्याला आध्यात्मिक युद्धाची शस्त्रे दिली आहेत जी विजयी जीवन जगण्यासाठी आणि सामर्थ्याने सेवा करण्यासाठी पुरेशी आहेत. या शस्त्राचा एक भाग म्हणजे आक्रमणाचे एक शक्तिशाली शस्त्र - 'आत्म्याची तलवार'. ही ती तलवार आहे जी आपल्याला पवित्र आत्म्याने दिली आहे. खुद्द सर्वसमर्थ पवित्र आत्म्याद्वारे ही चैतन्यदायी व समर्थित केली गेली आहे. परंतु, ती तलवार घेऊन आपल्याला तिचा वापर करायचा आहे. त्यासाठी असणारे आश्वासन हे आहे की जेव्हा आपण ही तलवार वापरतो, तेव्हा पवित्र आत्मा स्वतः आपल्या वतीने कार्य करतो कारण ही त्याची तलवार आहे.

तलवार, म्हणजेच देवाचे वचन, आपल्याकडे असणारे आक्रमणाचे ते शस्त्र आहे जे शत्रूवर हल्ला करते आणि त्याला परास्त टाकते. आपण ही तलवार कशी वापरली पाहिजे? बरं, आपण आपल्या शब्दांसोबत काय करतो? आपण शब्द बोलतो. प्रकटीकरणाच्या पुस्तकातही येशू, जो देवाचे वचन आहे, त्याच्या विषयी आपल्याला स्पष्ट चित्र दिसते की "त्याच्या 'तोंडातून तीक्ष्ण धारेची' तलवार निघते" (प्रकटीकरण 19:13,15). तर, वचनाची तीक्ष्ण तलवार हे देवाचे वचन आहे जे आपण

आपल्या मुखावाटे बोलतो.

देवाचे वचन बोलण्याद्वारे आपण आत्म्याची तलवार वापरतो. प्रत्येक वेळी जेव्हा तुम्ही देवाचे वचन घोषित करता आणि देवाच्या वचनावर तुमचा विश्वास जाहीर करता तेव्हा शत्रूवर जखमा होऊ लागतात. जेव्हा शत्रू तुमच्या विरुद्ध येतो, मग ते तुमच्या मनात चुकीचे विचार आणण्याद्वारे असोत, किंवा तुमच्या जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात हस्तक्षेप करण्याद्वारे असो, त्याच्याविरुद्ध आत्म्याची तलवार वापरा. सर्वसमर्थ पवित्र आत्म्याविरुद्ध त्याचा टिकाव लागत नाही. देवाचे वचन बोला. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 59
# भविष्यवादीत शब्दांचा वापर करीत चांगले युद्ध करा

**1 तीमथ्य 1:18**

**माझ्या मुला तीमथ्या, तुझ्याविषयी पूर्वीच झालेल्या संदेशानुसार ही आज्ञा मी तुला सांगून ठेवतो की, तू त्यांच्या द्वारेच सुयुद्ध कर;**

भविष्यवादीय संदेश हे पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने किंवा प्रेरणेने बोललेले संदेश आहेत. आजही भविष्यवाणी आणि भविष्यवादीय सेवेचे कृपादान ख्रिस्ताच्या शरीरात खरोखर कार्यरत आहेत. जेव्हा भविष्यवाण्या आपल्यासाठी बोलल्या जातात, तेव्हा आपण हे समजून घेतले पाहिजे की हे संदेश दिले जाण्याचे एक कारण म्हणजे आपल्याला आध्यात्मिक युद्धात शक्ती प्रदान करणे आहे. शत्रूविरूद्ध चांगले युद्ध करण्यासाठी आपण या भविष्यवाण्यांचा उपयोग केला पाहिजे.

शत्रू सैतान आणि त्याचे दुरात्मे चोरी करण्यासाठी, घात करण्यासाठी व नष्ट करण्यासाठी येतात. आपल्याला देवाच्या उद्देशांपासून विचलित करण्याकरिता ते व्यत्यय आणू इच्छितात आणि काही मार्गाने भटकावण्याचा प्रयत्न करतात. देवाचे उद्देश, देवाचे वचन आणि आपल्या जीवनात देवाच्या सामर्थ्याची घोषणा करणाऱ्या, आपल्या जीवनावर बोलल्या गेलेल्या भविष्यवाण्यांना आपण विश्वासाने धरून ठेवतो. या भविष्यवाण्यांसह, आपण एक चांगले युद्ध करतो. ज्या अध्यात्मिक संघर्षात आपण गुंतलो आहोत त्यामध्ये भविष्यवाणीचे शब्द आपण शत्रूविरूद्ध शस्त्रे म्हणून वापरले पाहिजेत. लक्षात ठेवा, शब्द बोलले गेले पाहिजेत. तुमच्या जीवनावर बोलले गेलेले भविष्यवादीय शब्द बोला (ज्यांची अर्थातच तुम्ही चाचणी केली आहे व

ते पवित्र आत्म्यापासून आहेत याची तुम्हाला खात्री आहे). देवाने त्याच्या आत्म्याद्वारे तुमच्या जीवनावर जे घोषित केले आहे त्याची घोषणा करा. देवाने सांगितले आहे की ते शब्द शत्रूविरूद्ध तुमच्या शस्त्रांचा भाग आहेत. ते भविष्यवादीय शब्द बोला. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 60
# ख्रिस्तामध्ये तुमच्यातील प्रत्येक चांगली गोष्ट मान्य करा

**फिलेमोन 1:6**
**आणि असे मागतो की, तुमच्यामध्ये [असलेल्या ख्रिस्त येशूमध्ये] जे काही चांगले आहे त्याचे पूर्ण ज्ञान झाल्याने तुझ्या विश्वासाचे भागीपण सफळ व्हावे.**

पौलाने फिलेमोनला लिहिलेल्या पत्राचा संदर्भ फारच विशिष्ट आहे. पळून गेलेला दास अनेसिम, जो पौलाच्या सेवेद्वारे आता विश्वासणारा झाला आहे, त्याला त्याचा मालक फिलेमोन, जो आता त्याच्या ह्या पूर्वीच्या दासाचा प्रभूमध्ये बंधू आहे, त्याच्याकडे परत पाठवण्यासाठी पौल हे पत्र लिहीत आहे. जेव्हा पौल ह्या लहान पत्राची सुरुवात करतो तेव्हा तो एका महत्त्वाच्या सत्याकडे लक्ष वेधतो की ख्रिस्तामध्ये असल्यामुळे आपल्यात असलेल्या प्रत्येक चांगल्या गोष्टीला (सर्व संपदा आणि आशीर्वाद) जेव्हा आपण मान्य करतो (पूर्णपणे ग्रहण करतो) तेव्हा आपल्या विश्वासाचे भागीपण सफळ (उत्पादक, प्रभावशाली, चैतन्यपूर्ण) होते.

देवाने आपल्याला ख्रिस्तामध्ये आणून आपल्यामध्ये ठेवलेल्या चांगल्या गोष्टी ओळखण्यासाठी, मान्य करण्यासाठी आणि त्यांना आज्ञा करण्यासाठी आपण ते जाहीर करणे शिकले पाहिजे. आपण ख्रिस्तामध्ये कोण आहोत हे आपण ओळखले पाहिजे व मान्य केले पाहिजे. हे स्वतःसाठी आणि इतरांसाठीही करा. देवाने ख्रिस्तामध्ये आपल्यासाठी जे काही केले आहे त्यामध्ये आपण सहभागिता करतो. यामुळेच आपली सहभागिता प्रभावी होत जाते. दुर्बलतेबद्दल, आपण किती गरीब आणि दयनीय आहोत, आपण किती पापी आणि भ्रष्ट

आहोत, असे बोलण्यापेक्षा ख्रिस्तामध्ये असल्यामुळे आपल्यामध्ये असलेल्या चांगल्या गोष्टींचा आपण स्वीकार करूया.

**टीप:** पापाकडे लक्ष दिले जाऊ नये, किंवा जर काही चुकीचे असेल तर आपण त्याकडे दुर्लक्ष केले पाहिजे आणि सुधारणा आणू नये, असे आपण येथे म्हणत नाही आहे. त्रुटी, दोष आणि चुकीच्या गोष्टींचा सामना आपण केला पाहिजे आणि जेथे सुधारणूक गरजेची आहे तेथे सुधारणा आणलीच पाहिजे. परंतु सुधारणा केली गेल्यानंतर आणि प्राप्त झाल्यानंतर, ही गोष्ट आपण जाणीवपूर्वक करतो की भूतकाळातील गोष्टी मागे सोडून देऊन ख्रिस्तामध्ये आपल्यापैकी प्रत्येकामध्ये असलेल्या चांगल्या गोष्टींकडे आपण लक्ष देतो.

# 61
# त्याचा शब्द तुमचे विश्व सुस्थितीत ठेवून त्याचे नियंत्रण करू शकतो

**इब्रीलोकांस पत्र 1:3**
**हा त्याच्या गौरवाचे तेज व त्याच्या तत्त्वाचे प्रतिरूप असून आपल्या सामर्थ्याच्या शब्दाने विश्वाधार आहे, आणि [स्वतः आमच्या] पापांची शुद्धी केल्यावर तो उर्ध्वलोकी राजवैभवाच्या 'उजवीकडे बसला.'**

जुन्या करारातील अनेक घटनांमध्ये आपण आधीच पाहिल्याप्रमाणे, इथे इब्री लोकांस पत्रातही, पुन्हा एकदा, पवित्र शास्त्र आपल्याला हे शिकवते की सर्व गोष्टी, संपूर्ण विश्व त्याच्या वचनाच्या सामर्थ्याने राखले गेले आहे, टिकून आहे, नियंत्रित केले आहे आणि सुरक्षित ठेवले आहे.

त्याच सर्वशक्तिमान देवाने आपल्याला पृथ्वीवरील आपल्या जीवनासाठी त्याचे वचन दिले आहे. निश्‌चितच त्याने आपल्याला दिलेले त्याचे वचन आपले "छोटेसे विश्व" सुस्थितीत ठेवू शकते, टिकवून ठेवू शकते, त्याचे नियंत्रण करू शकते आणि व्यवस्थित ठेवू शकते.

मग ह्यात प्रमुख गोष्ट म्हणजे त्याने आपल्याला पवित्र शास्त्रात लिखित स्वरूपात दिलेले त्याचे वचन ग्रहण करणे आणि ते आपल्या विश्वात लागू करणे. पवित्र शास्त्रात पाहिल्याप्रमाणे आपण असे करण्याचा एक मार्ग म्हणजे त्याच्या वचनावर विश्वास ठेवणे आणि त्याचे वचन आपल्या विश्वात जाहीर करणे.

हे जाणून घ्या की देवाच्या वचनात तुमचे विश्व सुस्थितीत ठेवण्यासाठी व त्याचे नियंत्रण करण्यासाठी पुरेसे सामर्थ्य आहे. अशा

काही वेळा असू शकतात जेव्हा गोष्टी तुटल्यासारख्या वाटू शकतात. गोष्टी हाताबाहेर किंवा नियंत्रणाबाहेर गेल्यासारखे वाटू शकते. देवाच्या वचनाच्या सामर्थ्यावर विश्वास ठेवा. तुमचे जीवन, तुमचे वर्तमान आणि तुमचे भविष्य, तसेच स्थिती आणि परिस्थितीवर त्याचे वचन बोला. त्याची अभिवचने बोला. घोषित करा की तुमच्या विश्वातील प्रत्येक गोष्ट देवाच्या वचनाच्या अधीन आहे आणि त्या सर्व त्याच्या वचनाशी सुसंगत होतील. तुमचा विश्वास जाहीर करा. तुम्हाला देवाच्या वचनाचे सामर्थ्य तुमच्या जीवनात कार्य करताना दिसून येईल.

# 62
# येशूच आपल्या कबुलीचा प्रमुख याजक आहे

**इब्री लोकांस पत्र 3:1**
**म्हणून पवित्र बंधूंनो, स्वर्गीय पाचारणाचे भागीदारहो, आपण पत्करलेल्या मार्गाचा प्रेषित व प्रमुख याजक ख्रिस्त येशू ह्याच्याकडे लक्ष लावा.**

मागील धड्यात आपण हे स्पष्ट केले आहे की “कबुली” (ग्रीक *‘होमोलॉगिया’*) या शब्दाचा अर्थ “समान गोष्ट सांगणे” किंवा “शब्दांसह सहमत असणे” असा होतो. नवीन करारातील या संदर्भात कबुली म्हणजे देव आणि त्याच्या वचनाशी आपण आपली सहमती दर्शवतो. जेव्हा आपण देवाने बोललेली गोष्ट बोलतो, किंवा जेव्हा आपण आपल्या शब्दांनी देवाशी सहमत असतो, तेव्हा आपण आपली कबुली देत आहोत.

इब्री लोकांस पत्राचा लेखक आपल्याला येशूकडे निर्देशित करीत म्हणतो की तो आपल्या कबुलीचा प्रेषित (अग्रेसर, पुढारी) आणि प्रमुख याजक (प्रतिनिधी) आहे. येशू त्या विश्वासाचे प्रतिनिधित्व करीत आहे जो आपण स्वर्गात कबूल करतो किंवा पत्करतो. याचा अर्थ असा आहे की जेव्हा आपण देवाच्या वचनाशी सुसंगत होतो आणि देव जे बोलला आहे त्याच्याशी सहमती दर्शवतो, तेव्हा येशू आपल्या वतीने पित्यासमोर ते कबूल करतो आणि त्याचे प्रतिनिधित्व करतो.

लक्षात ठेवा, येशूच तुमच्या कबुलीचा प्रमुख याजक आहे. त्याच्या वचनाशी सहमत होऊन बोला. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 63

# तुम्ही केलेली कबुली दृढ धरून राहा

**इब्री लोकांस पत्र 4:14**

**तर मग आकाशातून पार गेलेला देवाचा पुत्र येशू हा थोर प्रमुख याजक आपल्याला आहे, म्हणून आपण जो पत्कर केलेला आहे तो दृढ धरून राहू.**

**इब्री लोकांस पत्र 10:23**

**आपण न डळमळता आपल्या आशेचा पत्कर दृढ धरू; कारण ज्याने वचन दिले तो विश्वसनीय आहे;**

आपल्याकडे येशू हा आपला थोर प्रमुख याजक असल्यामुळे, आपण आपली कबुली – जी आपण त्याच्या वचनाशी सहमत होऊन घोषित करीत आहोत, दृढ धरून (शक्तीचा वापर करून धरणे, घट्ट चिकटून राहणे) ठेवली पाहिजे. त्याबरोबरच, आपल्याला माहीतच आहे की ज्याने अभिवचन दिले आहे तो विश्वासू आहे. त्याची अभिवचने पाळण्यात तो चुकणार नाही. म्हणून, आपण न डगमगता आपल्या विश्वासाची कबुली दृढ धरून राहतो.

जेव्हा देव आणि त्याच्या वचनाबद्दल आपल्या विश्वासाला आव्हान देणाऱ्या गोष्टी येतात, तेव्हा आपण न डगमगता आपल्या कबुलीस दृढ धरून ठेवावे. देव आणि त्याच्या वचनाशी सहमत राहून तुमचा विश्वास जाहीर करीत राहा.

जेव्हा देवाच्या वचनाची पूर्तता होण्यास उशीर होत असेल, तेव्हा आपण न डगमगता आपली कबुली दृढ धरून राहिली पाहिजे. देव आणि त्याच्या वचनाशी सहमत राहून तुमचा विश्वास जाहीर करीत रहा.

जेव्हा गोष्टी बिघडल्यासारख्या वाटतात तेव्हा खंबीरपणे उभे राहून, न डगमगता आपल्या विश्वासाची कबूली दृढ धरून ठेवा. आपल्यासाठी स्वर्गात एक थोर प्रमुख याजक आहे, जो आमच्या कबुलीचे प्रतिनिधित्व करतो आणि जो त्याच्या अभिवचनांप्रति विश्वासू आहे. देव आणि त्याच्या वचनाशी सहमत राहून तुमचा विश्वास जाहीर करीत रहा.

# 64
# त्याच्या शब्दाने विश्वाची रचना झाली

**इब्री लोकांस पत्र 11:3**
**विश्वासाने आपल्याला कळते की, देवाच्या शब्दाने विश्वाची रचना झाली, अशी की, जे दिसते ते दृश्य वस्तूंपासून झाले नाही.**

विश्वासाद्वारे, आपल्याला कळते की हे विश्व देवाच्या वचनाद्वारे रचले गेले (निर्मिले गेले, घडवले गेले, बांधले गेले, आकारले गेले). दृश्यमान, नैसर्गिक जग हे अदृश्य, आध्यात्मिक क्षेत्रातून आले आहे. देवाने त्याच्या वचनाद्वारे सर्व गोष्टी निर्माण केल्या, आणि जे अस्तित्वात नव्हते ते त्याने अस्तित्वात आणले. नैसर्गिक, दृश्यमान जगातील प्रत्येक गोष्ट देव व तसेच देवाच्या वचनाच्या अधीन आहे.

म्हणून, आपण गोष्टी अशा प्रकारे पाहू या. आपल्यापैकी प्रत्येकाचे आपले एक जग असते ज्यामध्ये आपण राहतो. “आपले जग” या शब्दांद्वारे आपण जबाबदारीच्या आणि प्रभावाच्या आपल्या वैयक्तिक क्षेत्रांचा संदर्भ देत आहोत – जशी आपली घरे, कुटुंबे, प्रगतिपट, व्यवसाय, सेवेचे क्षेत्र इ. आपल्या जगात अस्तित्वात नसलेल्या बऱ्याच गोष्टी आहेत. आपल्या जगात अस्तित्वात नसलेल्या गोष्टी देव त्याच्या शब्दाच्या सामर्थ्याने अस्तित्वात आणू शकतो. त्याचा शब्द आपले जग निर्माण करू शकतो, तयार करू शकतो, बांधू शकतो आणि आकार देऊ शकतो. आज जेव्हा तुम्ही तुमच्या जगाकडे पाहता, तेव्हा कदाचित ते “आकारविरहित व शून्य”, गडद आणि रिकामे दिसत असेल. देवाच्या वचनात तुम्हाला हव्या असलेल्या आणि अभिवचन दिलेल्या अनेक गोष्टी कदाचित तुमच्या जगात अस्तित्वात नसतील. तुमचे जग निर्माण करण्याचे सामर्थ्य देवाच्या वचनात आहे असा विश्वास

तुम्ही करता काय? तुमच्या जगात जे अस्तित्वात नाही ते देवाचे वचन अस्तित्वात आणू शकते यावर तुमचा विश्वास आहे का? देवाचे वचन दृढ धरा. त्याचे वचन सत्य आहे. त्याचे वचन जिवंत आणि सामर्थ्याने भरलेले आहे. त्याच्या वचनावर विश्वास ठेवा. आपल्या जगावर त्याचे वचन बोला. त्याच्या वचनाला, तुमचे जग निर्माण करू द्या, तयार करू द्या, बांधू द्या आणि आकार देऊ द्या. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 65

# प्रभुने म्हटले आहे, त्यामुळे आपण देखील धैर्याने म्हणतो

**इब्री लोकांस पत्र 13:5,6**

**5 तुमची वागणूक द्रव्यलोभावाचून असावी; जवळ आहे तेवढ्यात तुम्ही तृप्त असावे; कारण त्याने स्वतः म्हटले आहे, "मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही."**

**6 म्हणून आपण धैर्याने म्हणतो:**

**"प्रभू मला साहाय्य करणारा आहे,**
**मी भिणार नाही;**
**मनुष्य माझे काय करणार?"**

इब्री लोकांस पत्राच्या लेखकाकडे आपण कसे बोलावे याचा एक साधा तर्क आहे - कारण प्रभूने म्हटले आहे, म्हणून आम्ही देखील धैर्याने म्हणतो. आपण धैर्याने पुष्टी करतो व स्वतः प्रभूने जे म्हटले आहे त्याच्याशी सहमत होऊन बोलतो.

प्रभू म्हणाला, *"मी तुला सोडून जाणार नाही व तुला टाकणार नाही."* म्हणून, आपण धैर्याने म्हणतो, "प्रभू मला साहाय्य करणारा आहे, मी भिणार नाही."

प्रभूने म्हटले आहे, *"त्याला बसलेल्या फटक्यांनी आपल्याला आरोग्य प्राप्त झाले आहे."* म्हणून, आपण धैर्याने म्हणतो, "त्याने माझे व्याधी आपल्यावर घेतले, आणि माझे क्लेश वाहिले, आणि त्याला बसलेल्या फटक्यांनी मला आरोग्य प्राप्त झाले आहे."

प्रभूने म्हटले आहे, "तुम्ही पाण्याच्या प्रवाहाजवळ लावलेल्या

झाडासारखे व्हाल." म्हणून, आपण धैर्याने म्हणतो, "मी आपल्या हंगामात फळ देतो, माझे पान कोमेजणार नाही आणि मी जे काही हाती घेतो ते सिद्धीस जाईल."

यात आपण अजून भर घालू शकतो.

प्रत्येक परिस्थितीत, प्रभूने जे म्हटले आहे तेच धैर्याने म्हणण्याची नेहमी सवय करा. तुमचा विश्वास धैर्याने बोला कारण प्रभूने काय म्हटले आहे ते तुम्हाला ठाऊक आहे आणि त्यामुळे तुम्ही त्याच्याशी सहमत होऊन बोलू शकता. तो तुम्हाला कधीच निराश करणार नाही.

दोघे जण एकमेकांबरोबर सहमत असतील तेव्हाच ते एकत्र चालू शकतात (आमोस 3:3). आपण प्रभुसोबत तेव्हाच चालू शकतो जेव्हा आपण त्याच्याशी सहमत असू. प्रभूच्या वचनाशी सहमत असल्यामुळे आपण त्याच्याशी सहमत आहोत. प्रभू बोलला आहे, आणि म्हणूनच, आपण जाणूनबुजून आणि धैर्याने त्याच्याशी सहमत होऊन बोलतो.

# 66
# तुमची जीभ नियंत्रणात ठेवा, तुमच्या संपूर्ण व्यक्तिमत्वावर नियंत्रण करा

**याकोब 1:26**
**आपण धर्माचरण करणारे आहोत, असे कोणाला वाटत असेल व तो आपल्या जिभेला आळा घालत नसेल, आणि आपल्या मनाची फसवणूक करून घेत असेल तर त्याचे धर्माचरण व्यर्थ आहे.**

**याकोब 3:1-6**
**1 माझ्या बंधूंनो, तुम्ही पुष्कळ जण शिक्षक होऊ नका; कारण आपल्याला अधिक दंड होईल हे तुम्हांला माहीत आहे.**
**2 कारण आपण सगळेच पुष्कळ चुका करतो. कोणी जर बोलण्यात चुकत नाही तर तो मनुष्य पूर्ण होय, तो सर्व शरीरही कह्यात ठेवण्यास समर्थ आहे.**
**3 घोड्यांनी आपल्या कह्यात राहावे म्हणून आपण त्यांच्या तोंडात लगाम घातला, तर त्यांचे सर्व शरीर आपण फिरवतो.**
**4 तारवेही पाहा, ती एवढी मोठी असतात व प्रचंड वाऱ्याने लोटली जात असतात, तरी सुकाणदाराची इच्छा असते तिकडे ती अगदी लहानशा सुकाणाने फिरवली जातात.**
**5 तशीच जीभही लहानसा अवयव असून मोठ्या गोष्टींची फुशारकी मारते. पाहा, लहानशी आग केवढ्या मोठ्या रानाला पेटवते!**
**6 जीभ ही आग आहे; ती अनीतीचे भुवन आहे; आपल्या अवयवांत सर्व शरीर अमंगळ करणारा अवयव जीभ आहे; ती सृष्टीचे चक्र पेटवणारी आणि नरकाने पेटवलेली अशी आहे.**

एक "परिपूर्ण मनुष्य" म्हणजे, जो पूर्णपणे प्रौढ आणि परिपक्व आहे, आध्यात्मिक दृष्ट्या म्हटले तर, तो मनुष्य जो आपल्या जिभेवर ताबा ठेवू शकतो. जेव्हा आपण आपल्या शब्दांबद्दल सावध असतो

आणि आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवू शकतो, तेव्हा आपण आपल्या संपूर्ण शरीरावर नियंत्रण किंवा प्रभुत्व मिळवू शकतो किंवा *"सर्व प्रकारे स्वतःवर नियंत्रण ठेवू शकतो"* (द पॅशन ट्रान्सलेशन).

हे आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवण्यास सक्षम असण्याचे किंवा आपण जे बोलतो त्यावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्व दर्शवते. आपल्या शब्दांवर नियंत्रण ठेवण्याच्या सर्वोत्कृष्ट शिस्तींपैकी एक म्हणजे देवाला जे मान्य असेल तेच आपण नेहमी बोलू याची खात्री करणे. देवाला जे आवडते ते बोला. ज्याद्वारे देवाचे गौरव होईल ते बोला. त्याच्या वचनाशी जे सहमत आहे तेच बोला. विश्वास जाहीर करा. जर आपण हे करू शकलो, तर आपण सर्व प्रकारे स्वतःवर नियंत्रण करू शकू.

आपल्या जिभेला नियंत्रित करण्याचा एक उत्तम मार्ग म्हणजे देवाचे वचन जे काही म्हणते ते जाणूनबुजून बोलण्याची सवय करणे होय. पवित्र शास्त्रात आपल्याला अशा अनेक आध्यात्मिक पद्धती दिसून येतात. उदाहरणार्थ, आपल्याला माहित आहे की आपण देवाला स्तुती आणि भक्तीची अर्पणे सादर करतो. प्रार्थना कशी करायची आणि वेगवेगळ्या प्रकारे प्रार्थना कशा करायच्या हे आपल्याला माहीत आहे. देवाचे वचन कसे वाचायचे, त्याचा अभ्यास कसा करायचा आणि देवाच्या वचनावर मनन कसे करायचे हे आपल्याला ठाऊक आहे. त्याचप्रमाणे, आपल्या आध्यात्मिक अनुशासनाचा भाग म्हणून, आपण वचन बोलण्यासाठी वेळ काढू शकतो. या पुस्तकाच्या सुरुवातीला, आम्ही वैयक्तिकृत पद्धतीने लिहिलेल्या, देवाच्या वचनातील घोषणांची उदाहरणे दिली आहेत, ज्यामध्ये जीवनातील सुरुवातीपासून ते शेवट पर्यंतच्या सर्व क्षेत्रांचा समावेश आहे. तुम्ही या पद्धतीचा किंवा इतर कोणत्याही इतर पद्धतीचा वापर करून तुमच्या स्वतःच्या जीवनावर देवाचे वचन घोषित करू शकता. प्रत्येक दिवशी करावा लागणारा अर्थहीन विधी म्हणून करू नका. सत्याच्या प्रेरणेने हे करा कारण तुमचा विश्वास जाहीर करण्याच्या महत्वाचे तुम्हाला प्रकटीकरण किंवा

समज आहे. तुम्ही जेव्हा तुमच्या जिभेला अशाप्रकारे प्रशिक्षित करता, तेव्हा आपल्या शब्दांबद्दल सावधगिरी बाळगणे, आणि त्याच्या वचनाशी सहमत होऊनच आपण बोलत आहोत हे सुनिश्चित करणे तुमच्यासाठी अगदी सहज होईल. तुमचा विश्वास जाहीर करणे तुमच्यासाठी सहज होईल.

# 67
# तुमचे शब्द तुमचे जीवन मार्गदर्शित, नियंत्रित, व आशीर्वादित करतात

**याकोब 3:3-6**

**3 घोड्यांनी आपल्या कह्यात राहावे म्हणून आपण त्यांच्या तोंडात लगाम घातला, तर त्यांचे सर्व शरीर आपण फिरवतो.**

**4 तारवेही पाहा, ती एवढी मोठी असतात व प्रचंड वाऱ्याने लोटली जात असतात, तरी सुकाणदाराची इच्छा असते तिकडे ती अगदी लहानशा सुकाणाने फिरवली जातात.**

**5 तशीच जीभही लहानसा अवयव असून मोठ्या गोष्टींची फुशारकी मारते. पाहा, लहानशी आग केवढ्या मोठ्या रानाला पेटवते!**

**6 जीभ ही आग आहे; ती अनीतीचे भुवन आहे; आपल्या अवयवांत सर्व शरीर अमंगळ करणारा अवयव जीभ आहे; ती सृष्टीचे चक्र पेटवणारी आणि नरकाने पेटवलेली अशी आहे.**

पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाखाली लिहिलेल्या पत्रामध्ये याकोब, आपण बोलतो त्या शब्दांचे सामर्थ्य आणि प्रभाव प्रकट करण्यासाठी, आपल्या जगातील चित्रांचा वापर करतो. तो वापरत असलेल्या उदाहरणांचा विचार करा – घोड्यांच्या तोंडातील लगाम, तारवातील सुकाणे, रानातील आग. एक शक्तिशाली घोडा, त्याच्या तोंडात घातलेल्या लगामाद्वारे, स्वाराची इच्छा असेल त्या दिशेने चालवला व नियंत्रित केला जातो. त्याचप्रमाणे, एक मोठे जहाज, वारा आणि लाटांच्या मध्यभागी असताना देखील सुकाणदाराची इच्छा असते तिकडे ते अगदी लहानशा सुकाणाने फिरवले जाते. लहानशी आग मोठ्या रानाचा नाश करू शकते. मुद्दा असा आहे की आपले शब्द लहान, कमकुवत आणि क्षुल्लक वाटू शकतात. तरीही, पवित्र आत्म्याची इच्छा आहे की आपल्याला हे समजावे की, आपण जे शब्द बोलतो ते

शक्तिशाली आहेत, ते आपले संपूर्ण जीवन मार्गदर्शित, निर्देशित व नियंत्रित करू शकतात.

वचन 6 मध्ये, याकोब दुष्ट जिभेचे वर्णन करतो. एक दुष्ट जीभ "पेटवणारी" आहे किंवा नरकातूनच येणाऱ्या दुष्टतेने प्रेरित किंवा पेटलेली आहे. येथे सादर केलेल्या दुष्ट जिभेचा प्रभाव विचारात घ्या. दुष्ट जीभ एखाद्या व्यक्तीचे संपूर्ण शरीर किंवा त्याचे संपूर्ण व्यक्तित्व (आत्मा, प्राण आणि शरीर) अमंगळ करते. ती "पेटवते" किंवा त्या व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर छाप पाडते, परिणाम करते आणि प्रभावित करते. वाईट शब्द आपल्या संपूर्ण व्यक्तित्वाला आणि आपल्या संपूर्ण आयुष्याला अशुद्ध आणि उध्वस्त करतात. आता, जर आपल्याकडे चांगली जीभ असेल तर – ती जीभ जी देवाच्या वचनाच्या अग्नीने "पेटलेली" आहे (देवाचे वचन अग्नीसारखे आहे. यिर्मया 23:29). एक चांगली जीभ देवाच्या वचनाद्वारे प्रेरित आणि त्याच्याशी सुसंगत असणारे शब्द बोलते. असे शब्द आपल्या संपूर्ण व्यक्तित्वाला आशीर्वादित आणि विकसित करतात आणि तसेच आपल्या संपूर्ण जीवनाला आशीर्वादित आणि विकसित करतात.

जीवनाच्या संपूर्ण वाटचालीमध्ये आपले शब्द आपल्याला मार्गदर्शन करतात, नियंत्रित करतात व निर्देशित करतात. आपले शब्द आपल्या संपूर्ण व्यक्तित्वाला आणि आपल्या संपूर्ण जीवनाच्या वाटचालीला आशीर्वाद देऊ शकतात. वचन बोला. विश्वासाचे शब्द बोला. तुम्ही जे शब्द बोलता ते तुम्हास आशीर्वादित करो व तुमचे जीवन उन्नत करो.

# 68

# सातत्याने विश्वास जाहीर करा

**याकोब 3:7-12**

**7 श्वापदे, पक्षी, सरपटणारे प्राणी व समुद्रातील जीव ह्या प्रत्येकाचा स्वभाव मनुष्यस्वभावाला वश होत आहे, आणि झाला आहे;**

**8 परंतु मनुष्यांपैकी कोणीही जिभेला वश करण्यास समर्थ नाही; ती शांतिरहित असून दुष्ट आहे व प्राणघातक विषाने भरलेली आहे.**

**9 तिच्या योगे, जो प्रभू व पिता त्याची आपण स्तुती करतो; आणि 'देवाच्या प्रतिमेप्रमाणे' केलेल्या माणसांना तिच्याच योगे शापही देतो.**

**10 एकाच तोंडातून स्तुती व शाप निघतात. माझ्या बंधूंनो, ह्या गोष्टी अशा प्रकारे होता कामा नयेत.**

**11 झर्‍याच्या एकाच छिद्रातून गोड पाणी व कडू पाणी निघते काय?**

**12 माझ्या बंधूंनो, अंजिराला जैतुनाची फळे किंवा द्राक्षवेलाला अंजीर येतील काय? तसेच खार्‍या पाण्यातून गोड पाणी निघणार नाही.**

पवित्र आत्म्याद्वारे, याकोब, आपण बोलतो त्या शब्दांमध्ये सातत्याने चांगले, योग्य, शुद्ध आणि स्वच्छ असण्याचे महत्त्व संबोधित करतो. आपण नेहमी आपल्या शब्दांवर नियंत्रण ठेवले पाहिजे जेणेकरून आपल्या मुखातून नेहमी जीवन आणि आशीर्वादाचे शब्द निघतील. आपण दुहेरी भाषण करू नये, म्हणजेच, कधी जीवन आणि आशीर्वाद आणि कधी मृत्यू आणि शाप देणे, असे आपण बोलू नये. नेहमी, प्रत्येक परिस्थितीत, सातत्याने जीवन आणि आशीर्वाद बोला.

त्याचप्रमाणे, आपण कधीकधी विश्वासाचे बोलणे आणि नंतर इतर वेळेस भीती, शंका आणि अविश्वास बोलू नये. सातत्याने, नेहमी विश्वास जाहीर करा. जर आपण सतत आपले अंतःकरण आणि मन देवाच्या वचनाने भरले तर आपण हे नक्कीच करू शकतो. जर आपण सातत्याने स्वतःला विश्वासाच्या शब्दांनी भरले तर आपण सातत्याने

विश्वासाचे शब्द बोलू.

जीभेवर ताबा ठेवा. जीवन, आशीर्वाद आणि विश्वास नेहमी बोलण्यासाठी स्वत: ला प्रशिक्षित करा. सातत्याने तुमचा विश्वास जाहीर करा.

# 69
# सैतानाचा प्रतिकार करा

**याकोब 4:7**
**म्हणून देवाच्या अधीन व्हा; आणि सैतानाला अडवा, म्हणजे तो तुमच्यापासून पळून जाईल.**

परमेश्वराप्रती आपण आज्ञाधारक झाले पाहिजे आणि मग सैतानाचा प्रतिकार केला पाहिजे. “प्रतिकार” ह्या शब्दाचा अर्थ “सैतान जे काही आपल्यापुढे सादर करतो त्याच्या विरुद्ध उभे राहणे आणि त्याचा विरोध करणे.” पवित्र शास्त्रामध्ये आपण नवीन करारात पाहतो त्याप्रमाणे, “असा शास्त्रलेख आहे...” असे म्हणत, आत्म्याच्या तलवारीचा म्हणजेच देवाच्या वचनाचा वापर करून, आणि येशू ख्रिस्तामध्ये आपल्याजवळ असलेल्या अधिकाराद्वारे आज्ञा करणारे शब्द बोलून, आपण सैतानाचा प्रतिकार करतो. देवाचे वचन महत्त्वाचे आहे असा विचार करत असताना, सैतान जे काही करण्याचा प्रयत्न करीत आहे त्यास आपल्या प्रतिकाराचा आणि आक्रमक विरोधाचा भाग म्हणून देवाचे वचन बोलणे देखील तितकेच महत्त्वाचे आहे.

जेव्हा शत्रू चुकीचे आणि वाईट विचार, युक्ती, कल्पना, मतभेत आणि तर्क तुमच्या मनात घालतो, तेव्हा देवाचे वचन त्या संबंधात काय म्हणते ते तुमच्या मनात ताबडतोब समोर आणणे महत्त्वाचे आहे. आणि त्यासोबतच सैतानाने मांडलेल्या त्या वाईट कल्पनेबद्दल देवाचे वचन काय म्हणते ते बोलणे देखील महत्त्वाचे आहे. “असा शास्त्रलेख आहे ...” असे आपण म्हटले पाहिजे.

हे करण्यासाठी खंबीर आणि आक्रमक व्हा. तुमच्या विश्वासात खंबीर राहून सैतानाचा प्रतिकार करा (1 पेत्र 5:9). तुमचा विश्वास

जाहीर करा. जितक्यांदा तो परत येईल तितक्यांदा तुमचा विश्वास जाहीर करीत चला. सैतानाला कळू द्या की तुमच्या आयुष्यात तुम्ही त्याला पाऊल ठेवू देणार नाही.

# 70
# आशीर्वादाचे शब्द मोकळे करा

**1 पेत्र 3:8-12**

**8 शेवटी, तुम्ही सर्व एकचित्त, समसुखदु:खी, बंधुप्रेम करणारे, कनवाळू व नम्र मनाचे व्हा.**

**9 वाइटाबद्दल वाईट, निंदेबद्दल निंदा असे करू नका; तर उलट आशीर्वाद द्या; कारण आशीर्वाद हे वतन मिळण्यासाठी तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे.**

**10 कारण,**

**"जीविताची आवड धरून,**
**चांगले दिवस पाहावे, अशी ज्याची इच्छा असेल,**
**त्याने वाइटापासून आपली जीभ**
**व कपटी भाषणापासून आपले ओठ आवरावेत;**
**11 त्याने वाइटाकडे पाठ फिरवून बरे ते करावे.**
**त्याने शांतीच्या प्राप्तीसाठी झटावे व तिचा मार्ग धरावा.**
**12 कारण 'परमेश्वराचे नेत्र नीतिमानांवर असतात,**
**व त्याचे कान त्यांच्या विनंतीकडे असतात;**
**तरी वाईट करणाऱ्यावर परमेश्वराची करडी नजर आहे.'**

आपली निंदा केली गेली किंवा अन्याय केला गेला असला तरीही, आपल्याद्वारे आशीर्वाद परत करण्याचा एक मार्ग म्हणजे, आपण आशीर्वादाचे शब्द बोलणे. येशूने आपल्याला शिकवल्याप्रमाणे, *"जे तुम्हाला शाप देतात त्यांना आशीर्वाद द्या"* (मत्तय 5:44). म्हणून, आपल्यावर अन्याय झाला असला तरीही आपण जाणूनबुजून त्यांच्यासाठी आणि त्यांच्यावर आशीर्वादाचे शब्द बोलतो. ही एक निवड आहे जी आपण करतो. जिभेवर ताबा ठेवण्याची निवड करा आणि तिला अपशब्द बोलू देऊ नका. ते टाळा. त्याऐवजी, आशीर्वादाचे शब्द

मोकळे करण्याची जाणीवपूर्वक निवड करा. परमेश्वरापुढे जा आणि म्हणा, "पिता, येशूच्या नावाने मी (त्या व्यक्तीचे नाव) व्यक्तीसाठी आशीर्वाद बोलतो. त्यांनी मला दुखावले असले तरी, मी येशूच्या नावाने त्यांच्या जीवनावर आशीर्वाद बोलतो. जीवनातील प्रत्येक क्षेत्रात त्यांच्यासाठी सर्वकाही चांगले होऊ दे. ते फलदायी आणि आशीर्वादित होऊ दे."

तुम्ही त्यांना एकदा वैयक्तिकरित्या आशीर्वाद दिल्यानंतर, त्याबद्दल बोलत राहू नका आणि, ते तुमच्यासोबत किती वाईट वागलेत आणि त्यांनी तुमचे कसे वाईट केले किंवा तुम्हाला कसे दुखावले, हे इतरांना सांगू नका. तुमच्या जिभेला वाईट बोलण्यापासून दूर ठेवा. आशीर्वाद मोकळे करण्याद्वारे, तुम्ही स्वतःला आशीर्वाद ग्रहण किंवा प्राप्त करण्यासाठी स्थापित केले आहे. परमेश्वराची दृष्टी तुमच्यावर आहे. तुम्हाला चांगले जीवन व चांगले दिवस पाहता येतील हे तो सुनिश्चित करील. नेहमी आशीर्वादाचे शब्द मोकळे करा. विश्वासाने आशीर्वादाचे शब्द बोला.

# 71
# तुमचे शब्द विजयासाठी तुमचा विश्वास मोकळा करतात

**1 योहान 5:1,4**
**[1] येशू हा ख्रिस्त आहे, असा विश्वास जो कोणी धरतो तो देवापासून जन्मलेला आहे, आणि जो कोणी जन्मदात्यावर प्रीती करतो, तो त्याच्यापासून जन्मलेल्यावरही प्रीती करतो.**
**[4] कारण जे काही देवापासून जन्मलेले आहे ते जगावर जय मिळवते; आणि ज्याने जगावर जय मिळवला तो म्हणजे आपला विश्वास.**

येशू ख्रिस्तावरील विश्वासाद्वारे आपण देवापासून जन्मलो आहोत. आपल्यामध्ये देवाचे जीवन आणि स्वभाव आहे. आपण त्याची मुले आणि कन्या आहोत. आणि आपण देवापासून जन्मलेले आहोत, त्यामुळे आपण विजयी आहोत. जगावर, देहावर आणि सैतानावर विजयी होऊन जगण्यासाठी जे काही लागते त्याने आपण भरलेले आहोत. आणि हा शास्त्रभाग स्पष्ट आहे की देवावरील आपल्या विश्वासाचा वापर केल्याने आपला विजय होतो. जय मिळवणारे, विजयी जीवन जगायचे असेल तर आपण विश्वासाने चालले पाहिजे. केवळ आपल्या इच्छेच्या बळावर किंवा आपल्या बुद्धीच्या बळावर आपण जय मिळवणारे आणि विजयी असे जगू शकत नाही. देवाने आपल्याला सांगितले आहे की जगावर विजय मिळवण्याचा मार्ग म्हणजे आपला विश्वास आहे.

विश्वासाच्या मुख्य तत्त्वांपैकी एक जे आपण पवित्र शास्त्रात पाहतो आणि जे आपण या पुस्तकात ठळकपणे मांडले आहे ते म्हणजे ‘विश्वास बोलतो’. विश्वास शब्दांतून व्यक्त होतो. आपण विश्वासाचे शब्द बोलले पाहिजेत, ते शब्द जे देवावर, त्याच्या वचनावर आणि येशू

ख्रिस्ताने आपल्यासाठी पूर्ण केलेल्या सर्व गोष्टींवर, आपला विश्वास व्यक्त करतात. असे करणे जगावर, देहावर आणि सैतानावर मात करून विजयी जीवन जगण्याचा एक मार्ग आहे.

तुमचा विश्वास जाहीर करा. जय प्राप्त करून विजयी जीवन जगण्याची ही गुरुकिल्ली आहे.

# 72
# आपण देवाचे आहोत, म्हणून आपण देवाकडून बोलतो

**1 योहान 4:4-6**

**4 मुलांनो, तुम्ही देवाचे आहात आणि त्यांच्यावर तुम्ही जय मिळवला आहे; कारण जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुमच्यात जो आहे तो मोठा आहे.**
**5 ते तर जगाचे आहेत म्हणून त्यांचे बोलणे जगाविषयी असते, आणि जग त्यांचे ऐकून घेते.**
**6 आपण देवाचे आहोत; जो देवाला ओळखतो तो आपले ऐकतो; जो देवाचा नाही तो आपले ऐकत नाही. ह्यावरून सत्याचा आत्मा कोणता व भ्रांतीचा आत्मा कोणता हे आपण ओळखतो.**

प्रेषित योहान दोन प्रकारच्या लोकांचा विरोधाभास करीत आहे. ते जे *"जगाचे"* आहेत आणि ते जे *"देवाचे"* आहेत. तो म्हणतो की जे जगाचे आहेत ते याद्वारे ओळखले जातात— *"त्यांचे बोलणे जगाविषयी असते."* ते जगाची भाषा, सांसारिक बाबी बोलतात आणि जगिकतेचा आत्मा व्यक्त करतात. त्यामुळे जग त्यांचे ऐकून घेते. परंतु, आपण जे *"देवाचे"* आहोत, त्याचे तात्पर्य असे आहे की, आपण *"देवाकडून"* बोलतो, आणि जे देवाला ओळखतात, ते ऐकतात, समजून घेतात आणि आपण काय बोलत आहोत त्याकडे लक्ष देतात.

आपण *"देवाचे"* आहोत, म्हणून आपण *"देवाकडून"* बोलतो. आपण एक वेगळी भाषा बोलतो. आपण देवाच्या वचनाची भाषा बोलतो. आपण देवाच्या वचनाच्या सत्याशी सुसंगत राहून बोलतो.

तुम्ही *"देवाचे"* आहात हे लक्षात ठेवा. जे *"जगाचे"* आहे त्यासभोवती जेव्हा तुम्ही असता, तेव्हा *"जगाप्रमाणे"* होण्याचा आणि

त्याप्रमाणे बोलण्याचा दबाव तुम्हाला जाणवेल. पण तुम्हाला या जगाच्या दबावापुढे झुकण्याची गरज नाही. तुम्ही देवाचे आहात. तुम्ही जय मिळवणारे आहात. तुम्ही दोषभावनेच्या आत्म्यावर, या युगातील आत्म्यावर, ख्रिस्ताच्या विरुद्ध असलेल्या आत्म्यावर मात केली आहे. जगात जो आहे त्याच्यापेक्षा तुमच्यात जो आहे तो मोठा आहे. तुम्हाला जगाच्या भाषेशी किंवा *"जगाप्रमाणे"* बोलल्या जाणाऱ्या गोष्टींशी सहमत असण्याची गरज नाही. तुम्ही तुमचे शब्द निवडा. तुम्ही *"देवाकडून"* बोला. तुम्ही देवाच्या वचनाशी सुसंगत राहून बोला. तुमचा विश्वास जाहीर करा.

# 73
# कोकऱ्याच्या रक्तामुळे आणि आपल्या साक्षीच्या वचनामुळे आपण विजयी होतो

**प्रकटीकरण 12:11**
**त्याला त्यांनी कोकऱ्याच्या रक्तामुळे व आपल्या साक्षीच्या वचनामुळे जिंकले; आणि त्यांच्यावर मरायची पाळी आली तरी त्यांनी आपल्या जिवावर प्रीती केली नाही.**

सैतान आपला शत्रू आहे. सैतान आणि त्याचे दुरात्मे पराभूत झाले आहेत आणि त्यांना अधिकारशून्य केले गेले आहे. त्यांच्या कमकुवत अवस्थेत त्यांच्याकडे फक्त खोटेपणा, फसवणूक, दोषारोप आणि दहशतीचा वापर करून मानवी विचारांशी खेळण्याची क्षमता उरली आहे. म्हणूनच सैतानाला बंधूंना दोष देणारा असे म्हणण्यात आले आहे, जो सतत आपल्या मनावर दोषारोपांचे ओझे लादीत असतो, आणि अशा प्रकारे आपल्या मनात देवासमोर आपल्यावर दोषी ठरवतो. देवासमोर आपण कुचकामी, दोषी आणि अप्रिय आहोत असे आपल्याला भासवण्याचा प्रयत्न तो करीत असतो.

योहान, प्रकटीकरण 12 मध्ये, आपण जे विश्वासणारे ते या शत्रूवर आणि त्याच्या दोषारोपांवर कशी मात करतो याबद्दलचे एक प्रभावी सूत्र आपल्यासमोर आणतो. कोकऱ्याच्या रक्तामुळे आणि आपल्या साक्षीच्या वचनामुळे आपण सैतानावर विजयी होतो. येशूच्या रक्ताने आपल्यासाठी जे केले आहे त्यावर आपला विश्वास आहे, आणि आपण आपली साक्ष बोलतो व ती घोषित करतो, म्हणजेच, येशूच्या रक्ताने वैयक्तिकरित्या आपल्यासाठी काय केले आहे याची घोषणा आपण

करतो. येशूच्या रक्ताने आपल्यासाठी काय केले आहे याची साक्ष देणारे शब्द आपण बोलले पाहिजेत, त्याची घोषणा आपण केली पाहिजे. येशू ख्रिस्ताने त्याच्या वधस्तंभाद्वारे आपल्यासाठी जे कार्य पूर्ण केले आहे त्याचे आणि त्याच्या पूर्ण झालेल्या कार्यावर आपल्या विश्वासाची घोषणा आपल्या मुखाने आपण केली पाहिजे. कोकऱ्याच्या रक्ताने आपल्यासाठी काय केले आहे याची आपली घोषणा शत्रूला चिरडून टाकते. वधस्तंभाद्वारे ख्रिस्ताने तुमच्यासाठी जे केले आहे त्यावर असणाऱ्या तुमच्या विश्वासाची घोषणा करा. तुमचा विश्वास जाहीर करा.

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"* (रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"* (रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# विषयी ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक/भावनिक अडचणी** |
| **शैक्षणिक क्षेत्रात यशाची उणीव** | **तणाव/आघात** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **आध्यात्मिक समस्या** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "All Peoples Church" बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout,
Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवाः*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्‌त कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

संपूर्ण पवित्र शास्त्रात, देव त्याच्या लोकांना त्याचे वचन बोलण्यास सांगतो. आपल्या अंतःकरणातील विश्वासाने भरून आपल्या मुखावाटे बोललेले त्याचे वचन त्याचे सर्जनशील, अद्भुत कार्य करणारे सामर्थ्य आपल्या नैसर्गिक क्षेत्रात मोकळे करते. आपल्या मुखावाटे बोललेले त्याचे वचन शत्रूविरूद्ध आपले शस्त्र बनतात.

आपल्या वर्तमान आणि भविष्यावर देवाचे वचन बोलून आपण आपल्या जगाला आकार देऊ शकतो. आपण प्रत्येक वेळी आणि सर्व परिस्थितीत विश्वासाने भरलेले शब्द बोलायला शिकले पाहिजे. विश्वासाने बोलणे म्हणजे डोंगराचे अस्तित्व नाकारणे किंवा प्रचलित वादळाची भीषणता नाकारणे नव्हे. उलट, विश्वास डोंगराशी बोलतो आणि मार्गात उभे राहण्याचा त्याचा अधिकार नाकारतो. विश्वास वारा आणि वादळांशी बोलतो आणि त्यांचा विनाश करण्याचा त्यांचा हक्क हिरावून घेतो, आणि त्याऐवजी, देवापासून येणाऱ्या शांततेचा व स्थिरतेचा मार्ग मोकळा करतो. विश्वास हा आजाराशी बोलतो व त्याला सोडून जाण्याची आज्ञा देतो आणि देवाकडून येणारे आरोग्य व संपूर्णता मिळवून देतो.

हे पुस्तक तुम्हाला पवित्रशास्त्र-आधारित सत्यामध्ये स्थापित करेल आणि तुम्हाला नेहमी तुमचा विश्वास जाहीर करण्यासाठी प्रेरित करेल!

All Peoples Church & World Outreach
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org